
CMYK



सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, ७ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १८९ | पाने १२+८ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



सर्व हिंदू समान आहेत, हीच संघाची भूमिका आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव सर्व बांधवांना आला पाहिजे. स्वयंसेवकांच्या संपर्कात आल्यानंतर नैसर्गिक एकतेची अनुभूती आली पाहिजे. तरच संघाकडे सर्व समाजाचा कल वाढू शकतो. सर्व समस्येवरचा उपाय, जो इतरत्र मिळणे कठीण आहे, तो केवळ संघातच मिळतो, असा विश्वास समाजाच्या मनात रुजेल.

**स्व. यादवराव कृष्ण जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### बारावीच्या फेरमूल्यांकनास सीबीएसईकडून मुदतवाढ

**नवी दिल्ली** : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी फेरमूल्यांकन आणि उत्तरपत्रिका पडताळणीसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत वाढवली आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी हा निर्णय घेण्यात आला असून, आता हे पोर्टल ७ जूनपर्यंत खुले राहणार आहे. मंडळाने यापूर्वी फेरमूल्यांकनासाठी ६ जून ही अंतिम तारीख निश्चित केली होती. मात्र, अनेक विद्यार्थ्यांनी पोर्टलवर लॉगिन, उत्तरपत्रिका पाहणे तसेच शुल्क भरण्याच्या प्रक्रियेत अडचणी येत असल्याची तक्रार केल्यानंतर मुदत वाढवण्यात आली. विद्यार्थ्यांना अतिरिक्त २४ तासांचा वेळ देण्यात आला असून, अर्ज प्रक्रिया ७ जून मध्यरात्रीपर्यंत सुरू राहणार आहे. आतापर्यंत सुमारे ७०,४३३ विद्यार्थ्यांनी फेरमूल्यांकनासाठी अर्ज केला आहे. यामध्ये ७,३१४ विद्यार्थ्यांनी गुण पडताळणीसाठी तर ६३,११९ विद्यार्थ्यांनी फेरमूल्यांकनासाठी अर्ज सादर केला आहे.

## बरूर येथे ५ वर्षांच्या बालकाचा खून

**सोलापूर, दि. ६ जून -**
अज्ञात कारणावरून एका ५ वर्षांच्या बालकाचा गळा आवळून खून करण्यात आला. दक्षिण सोलापूर तालुक्यातील बरूर येथे ही घटना घडली.



समर्थ यालाप्पा कासतर असे मृत बालकाचे नाव आहे. समर्थ हा लहानपणापासून आपल्या आजीकडे राहत होता. शुक्रवारी दुपारी तो खेळण्यासाठी घराबाहेर गेला होता. मात्र बराच वेळ होऊनही तो घरी न परतल्याने नातेवाईकांनी त्याचा शोध सुरू केला. दरम्यान, तो गंभीर अवस्थेत आढळून आला. त्याला तातडीने दोन खाजगी रुग्णालयांत दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्यानंतर त्याचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल करण्यात आला. त्या अहवालात समर्थचा गळा आवळून खून झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी मंद्रूप पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. हत्येमागील नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## पंढरपूरमध्ये रोहित पवारांचे १२ जूनपासून अन्नत्याग आंदोलन

**मुंबई** : महायुती सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत अनेक अटी शर्ती घातल्या आहेत. त्यामुळे बहुतांश शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहेत. सरकारने अटी शर्ती काढून सरसकट कर्जमाफी द्यावी, या मागणीसाठी १२ जूनपासून पंढरपूरमध्ये अन्नत्याग आंदोलन करणार आहे, अशी घोषणा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेश सरचिटणीस, आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

# महाराष्ट्रात मान्सून दाखल

## पुढील वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल



**मुंबई, ६ जून**
देशात वेगाने पुढे सरकणारा नैऋत्य मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला, अशी माहिती शनिवारी हवामान विभागाने दिली. केरळम्‌मध्ये नेहमीपेक्षा उशिरा आगमन होऊनही तो नेहमीच्या वेळापत्रकानुसारच महाराष्ट्रात पोहोचला. हवामान विभागाने गोवा, दक्षिण महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ, मुसळधार पाऊस आणि ताशी ४०-५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवली आहे.

देशभरात नैऋत्य मान्सूनची आगेकूच वेगाने सुरू आहे. केरळम्‌मध्ये दाखल झाल्यानंतर मान्सूनने गोव्यात प्रवेश केला. त्यानंतर त्याने आता तळ कोकणात प्रवेश करून महाराष्ट्रात हजेरी लावली आहे. काही तासांत मान्सून अजून पुढे आगेकूच करणार आहे. त्यामुळे कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील अनेक भागांत पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**अनेक ठिकाणी 'यलो अलर्ट'**
हवामान विभागाने रविवारी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशीम, यवतमाळ जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' दिला आहे. या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी हलका ते मध्यम स्वरूपाची पाऊस होण्याची शक्यता आहे.

### गत सहा वर्षांतील मान्सूनचा आढावा

| वर्ष | आगमन | तुलना |
|---|---|---|
| २०२६ | ६ जून | वेळेवर आला |
| २०२५ | २५ मे | १९९० नंतर सर्वांत लवकर |
| २०२४ | २६ मे | लवकर |
| २०२३ | २५ जून | सर्वांत उशिरा |
| २०२२ | १३ जून | साधारण वेळेत |
| २०२१ | ६ जून | वेळेवर |

**मंगळवारी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस**
मंगळवारी अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे.

मान्सूनचे वेळेवर आगमन झाल्यामुळे महाराष्ट्राच्या अनेक भागांत व्यापक पाऊस पडण्याची आणि उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेपासून दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या पावसामुळे पेरणीच्या कामांना मदत होऊन शेतकऱ्यांना लाभ होईल आणि संपूर्ण राज्यातील खरीप हंगामासाठी आशादायक परिस्थिती निर्माण होईल, अशी अपेक्षा आहे. (वृत्तसंस्था)

### सोमवारी विदर्भात ऑरेंज अलर्ट

सोमवारी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी हलका ते मध्यम स्वरूपाची पाऊस होण्याची शक्यता आहे. गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा,वाशीम, यवतमाळ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

# 'कॉक्रोच' पक्षाचे जंतर-मंतरवर आंदोलन

## केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

**नवी दिल्ली, ६ जून**
'कॉक्रोच' पक्षाचे संस्थापक अभिजित दिपके यांच्या नेतृत्वात शनिवारी विद्यार्थी आणि युवकांनी जंतरमंतरवर धरणे दिले. लडाखमधील नेते सोनम वांगचुकही या आंदोलनात सहभागी झाले होते.केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करीत पाच दिवसांची मुदत दिली. राजीनामा न दिल्यास पुन्हा शनिवारी आंदोलन केले जाईल, असा इशारा दिला आहे.

अभिजित दिपके यांचे शनिवारी सकाळी अमेरिकेतून राजधानी दिल्लीत आगमन झाले. विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठी युवकाची गर्दी होती. विमानतळावरूनच ते थेट जंतर-मंतरवर पोहोचले. बराच वेळ मला विमानतळाच्या बाहेर निघू दिले जात नव्हते, मला आतमध्ये अडवून ठेवले होते, असा आरोप त्यांनी बाहेर आल्यावर केला.



जंतर-मंतर येथे निदर्शनांदरम्यान घोषणाबाजी करताना कॉक्रोच पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके, प्रवक्ता आशुतोष रांका (डावीकडे) आणि इतर कार्यकर्ते

जंतर-मंतरवरील धरणे आंदोलनाला पोलिसांनी सकाळी दहा ते सायंकाळी पाच अशी सात तासांची परवानगी दिली होती. या ठिकाणी मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आमच्या मागण्यांची दखल घेण्याऐवजी सरकार आमच्या संघटनेच्या समाज माध्यम मंचावर नजर ठेवून आहे, असा आरोप दिपके यांनी केला. नीट आणि अन्य परीक्षेत होत असलेल्या गैरप्रकाराच्या विरोधात धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी या संघटनेची मागणी आहे. प्रधान राजीनामा देणार नाही, तोपर्यंत आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

जंतर-मंतरवरील धरणे आंदोलनासाठी महाराष्ट्रासह देशाच्या काही भागांतून युवक आले होते. धरणे आंदोलनात दिल्लीतील प्रचंड तापमानामुळे दिपके यांची प्रकृती बिघडली, त्यामुळे त्यांना बाजूला नेण्यात आले.

आपल्या मुलाला सरकार तुरुंगात टाकेल, अशी भीती माझ्या आईला वाटत होती. सरकारविरुद्ध आवाज उठवणाऱ्या देशातील प्रत्येक मुलाच्या आईला आज अशी भीती वाटत आहे. पण, सरकारला घाबरून आपण किती दिवस जगायचे, हा प्रश्न आहे. आपल्या प्रश्नांसाठी युवक आवाज उठवतीलच, असे ते म्हणाले. अनेकांनी तुरुंगात जाण्याच्या भीतीमुळे शरणागती पत्करली, एकप्रकारे त्यांनी स्वत:ला विकून टाकले असा आरोप त्यांनी केला. मात्र, या देशातील विद्यार्थी आणि युवा कोणत्याही स्थितीत विकला जाणार नाही, असा विश्वासही यांनी व्यक्त केला. शिस्तीत वागण्याचे आणि आंदोलन शांततेत करण्याचे आवाहन दिपके यांनी उपस्थित युवकांना केले. जंतरमंतरवर आलेले युवक झुरळाचा मुखवटा घालून होते. (वृत्तसंस्था)



# रायगड झाला 'शिवमय'

## ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनाचा दिमाखदार सोहळा

**रायगड, ६ जून**
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडवर आज इतिहास, परंपरा आणि असीम शिवभक्तीचा एक अभूतपूर्व संगम अनुभवायला मिळाला. शिवराज्याभिषेकाच्या सोहळ्याने संपूर्ण रायगड परिसर मंत्रमुग्ध झाला होता. संभाजीराजे छत्रपती, त्यांच्या पत्नी संयोगिताराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून आणि देशभरातून हजारो शिवप्रेमींनी रायगडावर हजेरी लावली होती. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या जयघोषाने आणि भगव्या पताकांच्या दिमाखात अवघा गड परिसर दुमदुमून गेला होता.

या ऐतिहासिक सोहळ्याला आ. संजय चव्हाण, आ. अभिजित पाटील, नवनिर्वाचित आ. अनिकेत तटकरे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोहळ्याची सुरुवात सकाळी ७ वाजता नगारखान्यात युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते पारंपरिक वाद्यांच्या गजरात झालेल्या ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर सकाळी ७.३० वाजता राजसदर येथे शाहिरी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीचे राजसदरावर आगमन होताच वातावरणात भक्तिमय चैतन्य पसरले. त्यानंतर युवराज संभाजी छत्रपती महाराज आणि युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे आगमन झाले. त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या उत्सवमूर्तीवर अभिषेक करण्यात आला. राजसदरेवरील सिंहासनाधिष्ठित मूर्तीवर सुवर्ण मुद्रांचा अभिषेक करण्यात आला. यानंतर पोलिस दलाच्या वतीने शासकीय मानवंदना देण्यात आली. (तभा वृत्तसेवा)

### शिवकालीन वातावरणाचा जागर

सकाळच्या सत्रात पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम पथके, मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके आणि भगव्या पताकांनी सजलेल्या मिरवणुकीने शिवभक्तांमध्ये उत्साह संचारला होता. दुपारच्या सत्रात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, पोवाडे, कीर्तन आणि शिवचरित्रावर आधारित व्याख्यानांतून शिवरायांच्या पराक्रमाला उजाळा देण्यात आला. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमांना शिवभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### वारकरी संप्रदायाचा सन्मान

युवराज संभाजी छत्रपती महाराज यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित केले. शिवराज्याभिषेक पालखी सोहळा जगदीश्वर मंदिरापर्यंत पोहोचला, जिथे एक अत्यंत महत्त्वपूर्ण क्षण अनुभवायला मिळाला. युवराज संभाजी छत्रपती यांच्या हस्ते पंढरपूर वारीसाठी निघालेल्या वारकरी संप्रदायाला मानाचा ध्वज प्रदान करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांना सामूहिक अभिवादन करण्यात आले.

# पाकिस्तानच्या प्रस्तावावर अमेरिकेचा नकाराधिकार

## बीएलएवर बंदी घालण्याचा डाव उधळला ● दहशतवादी घोषित करण्याचा प्रस्ताव रोखला

**न्यू यॉर्क, ६ जून**
संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेत बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) आणि माजीद ब्रिगेडवर बंदी घालण्याचा आणि दहशतवादी घोषित करण्यासाठी पाकिस्तानने आणलेला प्रस्ताव अमेरिकेने नकाराधिकाराचा वापर करीत उधळून लावला. इराण-अमेरिकेत शांतता करारासाठी मध्यस्थी करणाऱ्या पाकिस्तानला हा मोठा दणका मानला जात आहे.

बीएलए, माजीद ब्रिगेडला संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवादी निर्बंध प्रणालीअंतर्गत दहशतवादी संघटना घोषित करण्याचा प्रस्ताव पाकिस्तानने सुरक्षा परिषदेत सादर केला. या प्रस्तावाला चीनने पाठिंबा दिला. पाकिस्तानच्या प्रतिनिधीने सादर केलेल्या प्रस्तावात या संघटनांचे अल-कायदा, इसिसशी संबंध असल्याचा कोणताही पुरावा नाही. अधिकारासाठी आंदोलन करणाऱ्या संघटनेला दहशतवादी घोषित करून बंदी घालणे कोणत्याही लोकशाही राष्ट्रासाठी कलंक ठरेल, अशी भूमिका मांडत संयुक्त राष्ट्रातील अमेरिकेच्या स्थायी प्रतिनिधीने नकाराधिकाराचा वापर करत प्रस्ताव फेटाळून लावला. भारत आणि फ्रान्सच्या प्रतिनिधीने या प्रस्तावाला विरोध केला. सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य असलेल्या फ्रान्सच्या पाठिंब्याने, भारताने बीएलएचे अल-कायदा किंवा इसिसशी कोणतेही स्पष्ट संबंध नसल्याचे सांगितले. अमेरिकेच्या प्रतिनिधीने भारताने मांडलेल्या भूमिकेचे समर्थन केले. (वृत्तसंस्था)

# जागतिक आव्हानांवर मात करण्यासाठी कृती आराखडा

## पंतप्रधान मोदींचे आर्थिक सल्लागार परिषदेत मंथन

**नवी दिल्ली, ६ जून**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्यांची बैठक घेतली. यावेळी मध्यपूर्वेतील संघर्षामुळे निर्माण झालेल्या संकटावर मात करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्यावर चर्चा झाली.

सध्याच्या संकटात लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि व्यवसाय सुरळीत ठेवण्यासाठी विविध सुधारणांवरही चर्चा झाली. जागतिक पुरवठा साखळीत आलेल्या व्यत्ययाचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम टाळण्याच्या उद्देशाने बैठकीचे आयोजन करण्यात आले. मोदींच्या अध्यक्षतेत झालेल्या बैठकीत मध्यपूर्वेतील तणावामुळे निर्माण झालेल्या इंधन संकटातून मार्ग काढण्यावर चर्चा झाली. देशाच्या आर्थिक विकासाला गती देणे आणि सध्याच्या जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी एक नवीन आराखडा विकसित करणे, या बैठकीचे मुख्य उद्दिष्ट होते, अशी माहिती सूत्रांनी दिली. भारताच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी अनेक महत्त्वाच्या कल्पना आणि उपाययोजना सदस्यांनी सादर केल्या. बैठकीत नागरिक आणि व्यवसाय या दोघांसाठीही महत्त्वाच्या सुधारणांवर भर देण्यात आला. मोदी आणि परिषदेच्या सदस्यांनी देशातील जीवन सुलभता आणि व्यवसाय सुलभता अधिक बळकट करण्यावर चर्चा केली. (वृत्तसंस्था)

### आर्थिक सुधारणांवर भर

आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्यांनी पश्चिम आशिया संघर्षाचा भारत आणि भारतासह जगावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचे मूल्यांकन सादर केले. हे मूल्यांकन सरकारला भविष्यातील आर्थिक आव्हानांना तोंड देण्यासाठी, धोरणे तयार करण्यास मदत करेल. बदलत्या जागतिक परिस्थितीत भारताची भूमिका आणि देशासमोरील आर्थिक परिणाम कसे कमी करता येतील यावर सदस्यांनी मत मांडले.

# भगवान भरोसे काम नको

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा रुद्रावतार

### कंत्राटदार-अधिकाऱ्यांना फटकारले

**मुंबई, ६ जून**
राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या कामात होणारी दिरंगाई कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही. प्रकल्प लांबल्यामुळे राज्य आणि देशाचे मोठे आर्थिक नुकसान होते, अशा कठोर शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय यंत्रणांना आणि कंत्राटदारांना फटकारले आहे.

मुंबईतील 'सह्याद्री' अतिथीगृहावर आयोजित पायाभूत सुविधा वॉर रूमच्या अत्यंत महत्त्वाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. महाराष्ट्रातील सर्व मोठे आणि महत्त्वाचे प्रकल्प येत्या साडेतीन वर्षांच्या आत पूर्ण करण्याचा निर्देश देत त्यांनी प्रगतीबाबत कोणतीही ढिलाई सहन केली जाणार नसल्याचा कडक इशारा मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

**कंत्राटदारांचा 'पास्ट रेकॉर्ड' तपासण्याचा आदेश**
यापुढे निविदेच्या अटींमध्ये कंत्राटदारांचा पूर्वीचा रेकॉर्ड अनिवार्यपणे तपासला जावा. आधीच्या प्रकल्पांना विनाकारण विलंब करणाऱ्या कंत्राटदारांना नवीन पायाभूत सुविधांचे प्रकल्प देऊ नयेत, असे फडणवीस यांनी सांगितले.

धारावीतील स्थानिक उद्योजकांना बळ देण्यासाठी आणि तेथील अनौपचारिक अर्थव्यवस्थेला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य वस्तू आणि सेवा कर सवलत देण्याबाबत तत्काळ कारवाई करण्याचा निर्देश दिला.

दुसरा मोठा करार दुबईस्थित 'आरएसए ग्लोबल' या नामांकित कंपनीसोबत झाला आहे. या करारांतर्गत रायगड जिल्ह्यातील उरण येथील जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण परिसरात २५ हेक्टर विस्तीर्ण क्षेत्रावर अत्याधुनिक 'अल्ट्रा मेगा लॉजिस्टिक्स पार्क' साकारले जाणार आहे. या प्रकल्पासाठी २,५८० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार असून, यातून ७५० जणांना रोजगार मिळेल. (तभा वृत्तसेवा)

### पुण्यात ५-जी, एआय प्रकल्प

उद्योग जगताने राज्य शासनाला केवळ एक प्रशासन न समजता आपला हक्काचा भागीदार समजावे. भारतीय अर्थव्यवस्थेचे शक्तिकेंद्र असलेल्या महाराष्ट्राला आता इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि आधुनिक लॉजिस्टिक्स क्षेत्रात देशात अव्वल बनवणे हेच आमचे ध्येय आहे, अशी ग्वाही देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत दोन अत्यंत महत्त्वपूर्ण सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारांमुळे राज्यात ४ हजार ८० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, तब्बल ४,७५० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग सर्व्हिसेस क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनी 'जबिल' पुण्यात आपला भव्य विस्तार प्रकल्प उभारणार आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचा वेग पकडत कंपनी ५-जी उपकरणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित नेटवर्किंग स्विचगिअर्सच्या उत्पादनासाठी तब्बल १,५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करीत आहे. महाराष्ट्रात गेल्या २३ वर्षांपासून कार्यरत असलेल्या या कंपनीची ही नवी उत्पादन सुविधा १७ जूनपासून सुरू होणार आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# फ्लॅट देतो म्हणून चार्टर्ड अकाउंटंटची दीड कोटींची फसवणूक

## 'पनाश'च्या विकासक महिलेसह सहा जणांविरूध्द फसवणुकीचे दोन गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

पनाश अपार्टमेंटमध्ये फ्लॅट देतो अशी थाप मारून १ कोटी ५७ लाख २५ हजार रूपये घेऊन दोघा चार्टर्ड अकाउंटंट ची फसवणूक केल्याप्रकरणी 'पनाश ' च्या विकासक महिलेसह ६ जणांविरूध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात फसवणुकीचे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मोनाली थेपडे, अमित थेपडे, दीपक गुगले, शितल देशमुख, शंकर लोंढे आणि सागर शहा (सर्व रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत चार्टड अकाउंटंट चेतन नंदकिशोर नोगजा (रा. सनश्री अपार्टमेंट ,वामन नगर, जुळे सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.



यातील फिर्यादीच्या लहान भावाने गॅलक्सी पनाशमध्ये २०२० मध्ये फ्लॅट घेऊन तो भाडेतत्वार दिला होता. तेथेच फिर्यादीलाही फ्लॅट घेण्याची इच्छा झाली, त्यामुळे त्यांनी डिसेंबर २०२० पनाश अपार्टमेंटच्या कार्यालयात जाऊन चौकशी केली. तेथील सागर शहा याच्याशी बोलणे झाले, त्याने प्रोजेक्टची माहिती दिली. प्रोजेक्ट आवडल्याने त्यांनी मोनाली थेपडे व अमित थेपडे यांची भेट घेतली.

भेटी दरम्यान अपार्टमेंटच्या ए-२ मधील १३०५ क्रमांकाचा टू-बीएचके फ्लॅट घेण्याचे ठरले. फ्लॅटची किंमत ४४ लाख ४६ हजार रूपये इतकी ठरली. ३० लाख होम लोनद्वारे देण्यात आले. राहिलेले ६ लाख ८८ हजार रूपये आई सुशीला नंदकिशोर नोगजा यांच्या बँक खात्यातून पाठविले. स्टॅम्प ड्युटीसह ३९ लाख रूपये दिले. दरम्यान बी-विंगमधील १४.४ क्रमांकाच्या दुसऱ्या फ्लॅटसाठी ७० लाख ५० हजार रूपये देण्याचे ठरले, त्यापैकी ४५ लाख ७७ हजार होम लोनद्वारे दिले. पत्नीच्या खात्यातील पैसे व स्टॅम्प ड्युटीद्वारे एकूण ६५ लाख ६७ हजार दिले.

यामध्ये फिर्यादीने २ फ्लॅट घेण्यापोटी आरोपींना १ कोटी ५ लाख १३ हजार रुपये दिले. मात्र आरोपींनी ठरल्याप्रमाणे आपणास अद्याप पर्यंत दोन्ही फ्लॅटचा ताबा न देता आपली फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे .आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक लकडे हे करीत आहेत.

### सचिन कट्टे या चार्टर्ड अकाउंटंटनाही ५२ लाखांना फसवले

वरील आरोपींनी यातील फिर्यादी चार्टर्ड अकाउंटंट सचिन अशोक कट्टे (रा. राघवेंद्र नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांनाही पनाश अपार्टमेंटमधील बी-विंगमधील १२०३ क्रमांकाचा फ्लॅट देतो म्हणून त्यांच्याकडून २७ व २८ जानेवारी २०२२ रोजी ५२ लाख १२ हजार रूपये घेतले . आरोपींनी त्यांनाही एक वर्षात फ्लॅटचा ताबा देतो असा शब्द दिला होता, मात्र आरोपींनी त्यांना देखील ठरल्याप्रमाणे फ्लॅटचा ताबा न देता त्यांची ही ५२ लाख १२ हजार रुपयाची फसवणूक करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याही गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक लकडे हेच करीत आहेत.

## महत्वाचे...



### नुकसानीचे पंचनामे व वीज पुरवठा पूर्ववतबाबत संजयमामा शिंदे यांचे पालकमंत्र्यांना निवेदन

**जेऊर, दि. ६ जून-**

करमाळा मतदार संघामध्ये गेल्या दोन महिन्यांपासून कमी दाबाने होत असलेल्या वीज पुरवठ्यामुळे शेतीपंप जळणे, सतत बंद पडणे अशा बाबीमुळे शेतकरी मेटाकुटीला आलेला असतानाच ८ तासांचा वीज पुरवठा ६ तास व ५ तास केला जात आहे. त्यातही वादळी पावसामुळे होणाऱ्या नुकसानामुळे वीज दिवस-दिवस गायब होत आहे. या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील वीजपुरवठा सुरळीत ठेवावा तसेच १ जून च्या दरम्यान मतदारसंघामध्ये झालेल्या वादळी पावसामुळे शेतकऱ्यांचे केळी,आंबा,सिताफळ,पेरू अशा फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. सदर नुकसानीचे पंचनामे करून त्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी यासंबंधीची निवेदन मा.आ.संजयमामा शिंदे यांनी पालकमंत्री ना. जयकुमार गोरे यांना आज दिले.



### गौडगावमध्ये महिलांकडून वृक्ष संगोपनाची शपथ

**वैराग, दि. ६ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत शुक्रवार दि. ५ जून रोजी एकता महिला मंचतर्फ बार्शी तालुक्यातील गौडगाव येथे सदस्यांनी घरासमोरील मोकळ्या जागेत वृक्षारोपण केले.तसेच वृक्षाचे पूर्ण संगोपन करण्याची सामूहिक शपथ घेतली.यावेळी सदस्या कविता दसवंत,शितल काजळे, वैष्णवी सुरवसे, सुनंदा सुरवसे, सविता दसवंत यांच्यासह गाव परिसरातील इतर अनेक महिला सदस्यांनी या मोहिमेत हिरिरीने भाग घेतला.

### कोल्डिंक्स गोडाऊन चोरीचा अवघ्या चार दिवसांत छडा; दोन आरोपी जेरबंद

**बार्शी, दि. ६ जून-**

बार्शी शहरातील एका कोल्डिंक्स गोडाऊनमधून चोरीस गेलेल्या स्टिंग कोल्डिंक्सच्या बॉक्स प्रकरणाचा बार्शी शहर पोलिसांनी अवघ्या चार दिवसांत यशस्वी छडा लावत दोन आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीस गेलेल्या मालापैकी ६१ स्टिंग कोल्डिंक्सचे बॉक्स जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. फिर्यादी संदीप राजेश जगताप (रा. सुभाष नगर, बार्शी) यांच्या गोडाऊनमधून दिनांक ३१ मे २०२६ रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी ८२ स्टिंग कोल्डिंक्सचे बॉक्स चोरी करून नेले होते. या घटनेप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात कलम ३०३(२) व ३३४(१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपासाची सूत्रे वेगाने फिरवले. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक अभय माकणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण तसेच गुप्त माहितीच्या आधारे तपास केला. सखोल तपासादरम्यान पोलिसांनी अनिकेत राजू कॅगार आणि किरण मारुती पोठे (दोघेही रा. पंकजनगर, बार्शी) यांना संशयित म्हणून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता त्यांनी चोरीची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेल्या मालापैकी ६१ स्टिंग कोल्डिंक्सचे बॉक्स जप्त केले. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना कृष्णा आणि पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक अभय माकणे, पोहेकॉं अमोल माने, पोहेकॉं साठे, पोलीस कॉन्स्टेबल बहिरे, मुठाळ, उदार, पवार, नितनात, जाधव, देशमुख, राऊत, शेख, उघडे, जाधवर, अकुलवार, सोमवाड, भांगे आणि म ळवी यांनी विशेष परिश्रम घेतले. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस कॉन्स्टिबल बहिरे करीत आहेत.

### दैनिक तरुण भारतचे ज्येष्ठ प्रतिनिधी बळीराम जगताप यांचे निधन

**धाराशिव, दि. ६ जून-**



दैनिक तरुण भारतचे वाशी तालुका प्रतिनिधी बळीराम जगताप यांचे शनिवार, दि. ६ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.जगताप यांनी दीर्घकाळ दैनिक तरुण भारतमध्ये कार्य करताना आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. निःपक्षपाती वृत्तांकन, समाजातील विविध प्रश्नांबाबतची संवेदनशीलता आणि पत्रकारितेप्रती असलेली निष्ठा यामुळे त्यांनी वाचकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले होते. तरुण भारतच्या सुरुवातीच्या काळापासून ते संस्थेशी जोडलेले होते. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी अनेक विषयांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. ७ जून रोजी सकाळी ९ वाजता वाशी येथे अंत्यसंस्कार होणार आहेत. दैनिक तरुण भारत परिवारासह पत्रकार, सामाजिक, राजकीय आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

### शांताबाई दिंडोरे यांचे निधन

**सोलापूर, दि. ६ जून-**



येतनाळ (ता. दक्षिण सोलापूर) येथील शांताबाई शरणाप्पा दिंडोरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. ग्रामपंचायत कर्मचारी धनप्पा दिंडोरे यांचे ते मातोश्री होते.

# सांगोल्यात अवकाळी पावसामुळे फळबागांचे नुकसान

## त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी : आ.डॉ.बाबासाहेब देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.६ जून-**

सांगोला तालुक्यातील जुजारपूर, सोमेवाडी, गौडवाडी, बुद्धेहाळ, जुनोनी, करांडेवाडी, तिप्पेहळ्ळी, कोळा, ह.मंगेवाडी, गुणापवाडी, हतीद, सावे, सोनंद, चोपडी, नवी लोटेवाडी, किडेबिसरी तसेच सांगोला शहरात झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे घरांची पडझड होऊन आर्थिक नुकसान तसेच डाळिंब, पेरू व इतर फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बागांचे तातडीने पंचनामे करून शासनाकडून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केली आहे.

सांगोला तालुका हा डाळिंब आणि पेरू उत्पादनासाठी राज्यात ओळखला जातो. हजारो शेतकरी या फळबागांवर अवलंबून असून मोठ्या खर्चातून त्यांनी बागा जोपासल्या आहेत. मात्र ऐन उत्पादनाच्या काळात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबत आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी प्रशासनाने तात्काळ नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत तसेच शासनाने विशेष मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, कृषी व महसूल विभागाने संयुक्त सर्वे क्षण करून नुकसानाचा अहवाल तातडीने शासनाकडे पाठवावा, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.



सांगोला तालुक्यातील अर्थव्यवस्थेमध्ये डाळिंब आणि पेरू उत्पादनाचा मोठा वाटा असून हजारो शेतकरी या फळबागांवर अवलंबून आहेत. त्यामुळे अवकाळी पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाने त्वरित मदतीचा हात देऊन दिलासा द्यावा, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# चारित्र्यावर संशय घेऊन विवाहितेचा छळ

## पतीसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

चारित्र्यावर संशय घेऊन विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी आंबेजोगाई येथील पती, सासू आणि सासऱ्याविरुद्ध विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पती अशोक चव्हाण, सासू शामल चव्हाण आणि सासरे बाळासाहेब चव्हाण (सर्व रा. विवेकानंद नगर, हिंदमाता चौक, शेपवाडी, ता. आंबाजोगाई) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत मनाली अशोक चव्हाण (वय २८, रा. पडवळ नगर, थेरगाव, पिंपरी-चिंचवड; सध्या रा. जुळे सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादी २७ डिसेंबर २०२० ते १ मार्च २०२६ या कालावधीत सासरी नांदत असताना आरोपींनी वारंवार चारित्र्यावर संशय घेऊन विवाहितेचा छळ केला. किरकोळ कारणांवरून तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. तसेच तिचे भूतकाळातील फोटो एडिट करून बदनामी करण्याची धमकी देण्यात आली. याशिवाय स्वतः च्या कंपनीत काम करून पैसे कमवून दे, माझ्या आई-वडिलांचा सांभाळ करावा लागेल, असे सांगून तिच्यावर दबाव टाकण्यात आला. तसेच, पैसे कमवून दे, अन्यथा मी आत्महत्या करेन, अशी धमकीही पतीकडून देण्यात आली. लग्नावेळी आई-वडिलांनी सोफा व टीव्ही दिला नाही, तसेच हिंजवडी येथील घराचे बांधकाम करण्यासाठी माहेरहून पैसे आणावेत म्हणून आरोपींनी शारीरिक व मानसिक छळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस हवालदार फुलारी हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# तुकाराम मुंढे यांच्या धडाकेबाज कारवाईचा परंड्यात पहिलाच दणका!

### १ कोटी २ लाखांचा गुटखा जप्त; पानटपऱ्यांवर शुकशुकाट, गुटखा माफियांचे धाबे दणाणले

**तभा वृत्तसेवा,**
**परंडा, दि. ६ जून-**

अन्न व औषध प्रशासनाचे नवनियुक्त आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारताच परंडा शहरातील गुटखा माफियांवर मोठा दणका दिला आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या विशेष पथकाने शहरातील चार ठिकाणी धाड टाकून तब्बल १ कोटी २ लाख रुपयांचा अवैध गुटखा जप्त केला असून या कारवाईमुळे गुटखा विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

आयुक्त तुकाराम मुंढे व सहाय्यक आयुक्त श्रीकांत कराळे यांच्या मार्गदर्शनाखाली ५ जून रोजी पहाटे ही विशेष मोहीम राबविण्यात आली. धाराशिव, लातूर आणि सोलापूर येथील विशेष पथकांनी संयुक्तरीत्या कारवाई करत परंडा शहरातील विविध ठिकाणांवर अचानक छापे टाकले.

बावची चौक परिसरातील तीन वेगवेगळ्या गोदामांमध्ये समाधान खुळे व प्रमोद खुळे यांनी मोठ्या प्रमाणात तंबाखूमिश्रित गुटखा साठवून ठेवल्याचे आढळून आले. तसेच बसस्थानक रोडवरील निजामपुरा भागातील एका बेकरीजवळूनही मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त करण्यात आला. या कारवाईत ७८ लाख ७५ हजार ५५५ रुपयांचा गुटखा हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी रोहित दिनेश फंदे (वय २६) यांच्या प्रथम खबरीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ तसेच भारतीय दंड संहितेतील विविध कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे. या धाडसत्रात सहाय्यक आयुक्त प्रमोदकुमार काकडे, संतोष सावंत, डॉ. सुमित खांडेकर, वीरस्वामी, उमेश भुसे, धनंजय आगाव, रोहित फंदे, गणेश दत्तू, अभिजित झोंडगे, ऋषिकेश मते यांच्यासह परंडा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

### जप्ती इतकी मोठी की दोनदा टेम्पो बोलवावा लागला!

धाडीत जप्त करण्यात आलेला गुटखा एवढ्या मोठ्या प्रमाणात होता की पंचनामा पूर्ण झाल्यानंतर तो पोलीस ठाण्यात हलविण्यासाठी मोठा टेम्पो दोन वेळा बोलवावा लागला. दरम्यान, कारवाईची माहिती शहरभर पसरताच परंड्यातील एकही पानटपरी दिवसभर उघडी दिसली नाही. या धाडसत्रामुळे गुटखा विक्रेते व साठेबाजांचे धाबे चांगलेच दणाणले असून शहरात याची जोरदार चर्चा सुरू आहे.

# बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा निवडणूक; ॲड. मिलिंद थोबडे विजयी

**सोलापूर, दि. ६ जून-**

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा निवडणुक २०२६ चा निकाल आज मुंबई येथे जाहीर करण्यात आला व त्यामध्ये सोलापुरचे जेष्ठ विधीज्ञ मिलिंद थोबडे यांना विजयी घोषित करण्यात आले आहे.

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवाच्या सदस्य पदाकरिता नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीस उभारलेल्या एकूण १५५ उमेदवारांपैकी १८ पुरुष व ५ म हिला सदस्यांच्या निवडीकरिता पसंतीक्रम ने सुमारे एक लाख वकिलांनी दि. २४ मार्च रोजी मतदान केले होते. ॲड.मिलिंद थोबडे यांनी पहिल्या पसंतीची ३८२९ मते मिळवून पाचव्या स्थानी निवडून आल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. अजय नाथानी यांनी जाहीर केले.यापूर्वी सन २०१० व २०१९ मधे झालेल्या बार कौन्सिलच्या निवडणुकीत ॲड.मिलिंद थोबडे यांनी सर्वाधिक मताधिक्याने विजय मिळवला होता व यंदाच्या निवडणुकीत त्यांनी विजयाची हॅट्रिक केली आहे. यापूर्वी देखील ॲड.मिलिंद थोबडे यांनी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा चे सन २०११ व २०२२ मधे अध्यक्षपद भूषविले आहे.



### स्थानिक वकील उमेदवार पराभूत

निवडणुक लढवणारे सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक उमेदवारांपैकी ॲड. हेमा शिंदे, ॲड. प्रदीपसिंग राजपूत, ॲड. असीम बांगी, ॲड. संतोष न्हावकर, ॲड. धनश्री घाडगे, ॲड. महेश कसबे हे पराभूत झालेले आहेत.

# पाणीपुरवठा सुरळीत करा अन्यथा आंदोलन करु : अक्कलकोटे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ जून-**

बार्शीत सध्या १०-११ दिवस झाले पाणीपुरवठा विस्कळीत झालेला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्याधिकारी तैमूर मुलाणी आणि पाणीपुरवठा अभियंता अजय होनखांबे यांना इशारा दिला. दोन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करा अन्यथा मुख्याधिकारी यांच्या दालनात विरोधी पक्षाच्या नगरसेवकांना नागरिकांसमवेत ठिय्या आंदोलन करावे लागेल, असा इशारा दिला. अक्कलकोटे पुढे बोलताना म्हणाले की, या दिवसात अतिवृष्टी वादळ या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यास किमान २१ प्रभागात २१ टँकरची व्यवस्था करावीत. बंद पडलेले बोअर ठेकेदार वेळेत दुरुस्त करत नाहीत, बिलाअभावी दिरंगाई होते. लिकेजबाबत ही अशीच परिस्थिती आहे. टंचाई काळातील पर्यायी व्यवस्था सक्षम करा अन्यथा आंदोलनास सामोरे जावा अशा कडक भाषेत इशारा दिला आहे. याबाबत हयगय सहन केली जाणार नाही. करसुली वेळी दारोदारी कुदळ फावडे घेऊन हिंडणारी पालिका पाणी टंचाई काळात का टाळाटाळ करते असा ही प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

# उंदरगाव येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान टीमचे बैलगाडी मधून स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.६ जून -**

उंदरगाव (ता.करमाळा) येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत मूल्यमापनासाठी आलेल्या टीमचे ग्रामस्थांच्या वतीने जंगी स्वागत गावात राबवत असलेले विविध उपक्रम पाहून अधिकारी झाले प्रभावीत करमाळा तालुक्यातील उंदरगाव ग्रामपंचायत येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबवले जात असून याची पाहणी करण्यासाठी जिल्हास्तरीय मूल्यमापन समिती यांनी भेट देऊन मूल्यमापन केले.



यावेळी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान (भा प्र से) पाटोदा पंचायत समिती गटविकास अधिकारी उद्धव सानप, पंचायत समिती पाटोदाचे आधीकारी बापूराव राख , उद्धव नेटके ,आकाश बनसोडे आर्शद शेख, बांधकाम विभागाचे संतोष खाटने या अधिकाऱ्यांच्या टीमने गावाला भेट देऊन गावात राबवत असलेल्या विविध उपक्रम ची पाहणी केली.

उंदरगाव ग्रामस्थांच्या वतीने बैलगाडी मधून मिरवणूक काढून टीमचे जंगी स्वागत केले. यावेळी गावातील प्रत्येक घरावर मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानाची गुढी ग्रामस्थांनी उभारली होती.

ग्रामपंचायतच्या वतीने शासनाच्या विविध योजनांची गावामध्ये केलेली प्रभावी अंमलबजावणी प्रत्येक घराच्या परिसरात तयार केलेली सेंद्रिय परसबाग , गावातील अभ्यासिका आधुनिक व्यायाम शाळा, बचत गटाच्या माध्यमातून होत असलेले काम ग्रामपंचायतीने निर्माण केलेल्या विविध सुविधा तसेच सेंद्रिय शेती, गावात मोठ्या प्रमाणात शेतकरी पिकवत असलेली वेलची केळी शेती, याची पाहणी यावेळी टीमने केली.

संपूर्ण गावाची एकी पाहून सर्व अधिकारीवर्ग प्रभावित झाला. यावेळी करमाळा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सहाय्य गट विकास अधिकारी सर्वाधिकारी वर्ग सरपंच उपसरपंच ग्राम सेवक व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





अंगाची काहिली करणाऱ्या उन्हापासून कोलकातावासीयांना किंचित दिलासा मिळाला आहे. येथे शनिवारी मुसळधार पाऊस झाला. पावसात मार्ग काढताना दुचाकीस्वार

# इराणने उधळला संघर्षविराम

## कुवेत, बहरीन, होर्मुझमधील अमेरिकी नौदलावर हल्ले ● बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे, ड्रोनचा मारा ● लष्करी, हवाई तळ लक्ष्य

◆ **दुबई, ६ जून**

शांतता कराराच्या वाटाघाटीसाठी सुरू असलेले प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर इराणने शनिवारी होर्मुझ जलमार्गात नाकाबंदीसाठी तैनात असलेल्या अमेरिकेचे नौदलावर आणि आखाती देश कुवेत, बहरीनवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे, ड्रोनचा मारा केला. कुवेत, बहरीनमधील अमेरिकेचे लष्करी तळ आणि पायाभूत सुविधांवर हल्ले करण्यात आले. दुसरीकडे लेबनॉनमधील दहशतवादी गट हिजबुल्लाहने इस्रायली वायुदलाच्या विमानांवर क्षेपणास्त्राचा मारा केल्याने मध्यपूर्वेत पुन्हा संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली आहे.



अमेरिकेने ६० दिवसांच्या संघर्षविरामाची घोषणा केली असतानाही इराणने आक्रमकता दाखवत संघर्षविराम उधळला आणि आखाती देशांसह अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य केले. प्रत्युत्तरात अमेरिकेच्या सैन्याने इराणच्या समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या लष्करी तळांवर हल्ले चढविले. होर्मुझमधील नाकाबंदीविरोधात कुवेत आणि बहरीनसह अमेरिकेच्या नौदलावर हल्ले चढविल्याची माहिती इराणचे लष्करी प्रवक्ते इब्राहिम झोल्फघारी यांनी निवेदनातून दिली.

तणावासाठी अमेरिकेला जबाबदार धरत कुवेतला जाणाऱ्या प्रवासी विमानांना मार्ग बदलण्याचा सल्ला झोल्फघारी यांनी दिला. त्यांनी नागरिकांना विमानतळ आणि पायाभूत सुविधांपासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे. त्यांनी म्हटले की, इराणचे नियंत्रण असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीत अमेरिकेच्या नौदलाने इराणी जहाजांना रोखल्याने शनिवारी बहरीन, कुवेत आणि अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य करण्यात आले. होर्मुझ सामुद्रधुनीच्या दिशेने अनेक बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा मारा करण्यात आला. अमेरिकेचा संरक्षण विभाग पेंटागॉनने हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा देत म्हटले की, हवाई संरक्षण प्रणालीने इराणचे सहा क्षेपणास्त्रे आणि २५ ड्रोन नष्ट करण्यात आले.

**हिजबुल्लाहचे इस्रायली सैन्यावर हल्ले**

दक्षिण लेबनॉनमध्ये हिजबुल्लाहने इस्रायलची लष्करी तळ आणि वायुदलाच्या ताफ्यावर हल्ले चढविले. याशिवाय किरयात शमोना शहरात आणि लेबनीज सीमेवर लढाऊ विमानावर हिजबुल्लाहने क्षेपणास्त्राचा मारा केल्याची माहिती इस्रायलच्या संरक्षण विभागाने दिली. तथापि या हल्ल्यात जीवित अथवा मालमत्तेची हानी झाली नाही. हिजबुल्लाहच्या हल्ल्याला इस्रायली सैन्याने जोरदार प्रत्युत्तर दिले. ◀(वृत्तसंस्था)

### केशम बेटांवरील रडार नष्ट

अमेरिकेच्या वायुदलाने गोरूक आणि केशम बेटांवरील इराणी लष्करी रडार तळांवर हल्ला केला, यात संपूर्ण रडार यंत्रणा नष्ट करण्यात आल्याचे पेंटागॉनने म्हटले आहे. होर्मुझ जलमार्गात इराणने केलेल्या हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. इराणची चार तेलवाहू जहाजे रोखल्यानंतर इराणच्या इस्लामिक रिव्हाल्युशनरी गार्ड कार्प्सने (आयआरजीसी) कुवेतमधील अली अल सालेम हवाई तळ आणि बहरीनमधील अमेरिकी नौदलाच्या मुख्यालयाला लक्ष्य केले. ■

### युद्धातून लवकरच बाहेर पडणार : ट्रम्प

इराणसोबत सुरू असलेल्या संघर्षातून अमेरिका लवकरच बाहेर पडेल. युद्ध टाळण्यासाठी तडजोड किंवा कठोर मार्गाच अवलंब केला जाईल. कठीण मार्ग कदाचित सोपा असेल, पण कसेही करून आम्ही यातून बाहेर पडू असे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी माध्यमांना सांगितले. ■

### संघर्ष नको शांतता हवी : जोसेफ औन

लेबनॉनचे राष्ट्राध्यक्ष जोसेफ औन यांनी म्हटले की, अमेरिका आणि इराण यांच्यातील सौदेबाजीसाठी लेबनॉनचा वापर करणे सहन केले जाणार नाही. लेबनॉनची जनता युद्धाला कंटाळली असून, तिला शांतता हवी आहे. लेबनॉन आणि इस्रायल यांच्यातील संघर्षावर केवळ संवादातूनच तोडगा निघू शकतो. ■

# आयआयटीसाठी ७५ टक्क्यांची अट शिथिल

## कमी गुण मिळाले तरी प्रवेशासाठी अर्ज करण्याची संधी

◆ **नवी दिल्ली, ६ जून**

आयआयटी प्रवेश प्रक्रियेबाबत आयआयटी रुडकीने महत्त्वाचा खुलासा केला आहे. बारावीत ७५ टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळाले तरीही विद्यार्थ्यांना आयआयटीमध्ये प्रवेशासाठी अर्ज करण्याची संधी मिळणार आहे. या निर्णयामुळे हजारो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आयआयटी रुडकीने स्पष्ट केले आहे की, सर्वसाधारण आणि ओबीसी-एनसीएल प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी बारावीत किमान ७५ टक्के गुणांची अट आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी किमान ६५ टक्के गुण आवश्यक आहेत. मात्र, काही विशेष परिस्थितीत विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची संधी दिली जाणार आहे, असेही संस्थेने सांगितले आहे.

**सुधारित गुणपत्रिका सादर करणे बंधनकारक**

सीबीएसई बारावी निकालानंतर अनेक विद्यार्थ्यांनी गुणांमध्ये त्रुटी असल्याच्या तक्रारी करीत फेरमूल्यांकन आणि फेरतपासणीची मागणी केली होती. या पृष्ठभूमीवर विद्यार्थ्यांना संधी देण्यासाठी आयआयटीने काही नियमांमध्ये शिथिलता दिल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

संस्थेच्या अधिकृत पत्रकानुसार, पात्रता अटी पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही त्यांच्या पसंतीक्रम भरण्याची परवानगी असेल. तथापि, अंतिम प्रवेशासाठी सुधारित गुणपत्रिका १५ जुलैपर्यंत सादर करणे बंधनकारक असेल. ती गुणपत्रिका संबंधित ई-मेलवर पाठवावी लागेल आणि चौथ्या फेरीअखेर प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाईल. ◀(वृत्तसंस्था)

# भांगर बॉम्बस्फोट प्रकरणी तृणमूलच्या नेत्याला अटक

◆ **कोलकाता, ६ जून**

पश्चिम बंगालच्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील भांगर बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास करणाऱ्या राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) कॅनिंग ईस्टमधील माजी तृणमूल काँग्रेसचा माजी आमदार आणि भांगरमधील पक्षाचा उमेदवार शौकत मोल्लाला शुक्रवारी रात्री अटक केली.

शौकत मोल्ला गत काही दिवसांपासून फरार होता आणि त्याने बांगलादेशात पळून जाण्याचा प्रयत्नही केला होता. मात्र, या दाव्यांवर एनआयएकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. गुरुवारी सकाळी जीवनतळा येथील शौकत मोल्लाच्या निवासस्थानी छापा टाकण्यात आला, परंतु तो तिथे उपस्थित नव्हता. एनआयएने त्याचा मुलगा, इम्रान मोल्लाची चौकशी केली आणि शोधमोहीम राबवली. विधानसभा निवडणुकीच्या काही दिवसांपूर्वी भांगरच्या दक्षिण बामुनिया परिसरात झालेल्या बॉम्बस्फोटाच्या तपासाच्या संदर्भात ही कारवाई करण्यात आली आहे. स्फोटात एका व्यक्तीचा मृत्यू तर, अनेक जण जखमी झाले. सूत्रांनुसार, शौकत मोल्लाच्या जवळच्या काही लोकांना गुरुवारी न्यायालयात हजर करून त्यांची चौकशी करण्यात आली. ◀(वृत्तसंस्था)



# लोकमंगल को-ऑप बँकेच्या अत्याधुनिक डेटा सेंटरचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अत्याधुनिक व अद्ययावत डेटा सेंटरचे उद्घाटन बँकेचे अध्यक्ष तथा दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात झाले.

ग्राहकांना अधिक जलद, सुरक्षित, विश्वासार्ह व अखंडित बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे अत्याधुनिक डेटा सेंटर उभारले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या या डेटा सेंटरमुळे बँकेच्या डिजिटल सेवा अधिक सक्षम होणार आहेत. व्यवहारांची गती, सुरक्षितता आणि कार्यक्षमता यामध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. तसेच भविष्यातील वाढत्या डिजिटल गरजा पूर्ण करण्यासाठीही हे सेंटर महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

यावेळी बँकेचे संचालक देवानंद चिलवंत, सतीश लामकाने, जॉन चोप्रा, अनंता चव्हाण, निलेश पटेल, अभिजीत टाकळीकर, विजय कुलकर्णी, सिद्धार्थ सर्जे, जितेंद्र नाईक, प्रल्हाद कांबळे, अशोक सापटणेकर, , उज्वला चेळेकर, तज्ज्ञ संचालक डॉ. नरेंद्र काटीकर, सीए सौरभ अंबुरे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकमंगल को-ऑप बँक ही आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत ग्राहककेंद्री सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून, या डेटा सेंटरच्या माध्यमातून बँकेच्या डिजिटल परिवर्तनाला नवी दिशा मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## चित्रपट वार्ता

### राम चरणच्या 'पेद्दी'चा बॉक्स ऑफिसवर धमाका



**मुंबई** : अभिनेता राम चरणचा बहुचर्चित स्पोर्ट्स ड्रामा 'पेद्दी' चित्रपटगृहांमध्ये जोरदार यश मिळवत असून, अवघ्या दोन दिवसांत या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई करीत चर्चेत स्थान मिळवले आहे. बुची बाबू सना दिग्दर्शित हा पॅन इंडिया चित्रपट ४ जून रोजी प्रदर्शित झाला असून, ३ जून रोजी त्याचा पेड प्रीव्ह्यू पार पडला होता. चित्रपटाला पहिल्या दिवसापासूनच प्रेक्षकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळत असून, भारतात पहिल्याच दिवशी सुमारे ५० कोटींची कमाई झाली होती. दुसऱ्या दिवशीही चित्रपटाने मजबूत पकड कायम ठेवत २६.९० कोटी रुपयांचे कलेक्शन केले आहे. पेड प्रीव्ह्यूमधूनही १८.५० कोटींची कमाई झाली होती. 'पेद्दी'ने केवळ दोन दिवसांत एकूण ९६.४० कोटी रुपयांचे नेट कलेक्शन करीत जवळपास १०० कोटींच्या क्लबच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. ■


### रिचा चड्ढाचा 'कॉक्रोच पार्टी'ला सल्ला



**मुंबई** : बॉलिवूड अभिनेत्री ऋचा चड्ढाने सोशल मीडिया हँडलवर पोस्ट शेअर करून कॉक्रोच जनता पार्टीला पाठिंबा दर्शवत एक सल्लाही दिला आहे. अभिनेत्रीने पोस्टमध्ये म्हटले की, मी आता सुंदर अशा ऑकलँड या जागेवर आहे. येथे कदाचित जगातील सर्वांत स्वच्छ हवा आहे. पण, माझे मन अजूनही दिल्लीत अडकले आहे. मी माझ्या देशातील तरुणांना माझे प्रेम पाठवते. मला आशा आहे की, तुम्ही बेगडी देशभक्त होण्यापेक्षा खरे देशभक्त व्हाल. तुम्ही दयाळू, शांत आणि समजूतदार व्हा. मी मनापासून तुमच्यासोबत आहे. ऋचा चड्ढाची पोस्ट समाज माध्यमावर व्हायरल होत आहे. ■

### महेश बाबू प्रभू रामाच्या भूमिकेत!

**नवी दिल्ली** : दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांच्या आगामी 'वाराणसी' या चित्रपटाबाबत नवी आणि अत्यंत उत्सुकता वाढवणारी माहिती समोर आली आहे. या चित्रपटात रामायणावर आधारित एक भव्य युद्धदृश्य दाखवले जाणार असून, प्रभू राम आणि कुंभकर्ण यांच्यात तब्बल ३० मिनिटांचा अत्यंत तीव्र संघर्ष दाखवला जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. राजामौली यांचे वडील आणि प्रसिद्ध पटकथालेखक विजयेंद्र प्रसाद यांनी याला दुजोरा दिला. हे दृश्य केवळ छोटा भाग नसून चित्रपटाचा सर्वांत महत्त्वाचा आणि भव्य भाग असेल, असे त्यांनी सांगितले. या प्रसंगामुळे प्रेक्षकांना थिएटरमध्ये थरारक अनुभव मिळेल, असा दावा केला जात आहे. या चित्रपटात अभिनेता महेश बाबू प्रभू रामाची भूमिका साकारणार असल्याचे आधीच निश्चित झाले आहे. मात्र, कुंभकर्णाच्या भूमिकेत कोण दिसणार याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पृथ्वीराज सुकुमारन यांचे नाव चर्चेत आहे. मात्र, त्यावर अद्याप शिक्कामोर्तब झालेले नाही. ■



# मध्यवर्ती बँकांकडून १७ टन सोन्याची खरेदी

**रशियाकडून विक्रीचा सपाटा**

## चीन, पोलंड जगात अव्वलस्थानी



◆ **वॉशिंग्टन, ६ जून**

जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता वाढत असताना, सोने जगातील सर्वांत विश्वासार्ह मालमत्ता बनल्याचे 'वर्ल्ड गोल्ड कौन्सिल'च्या अहवालातून समोर आले आहे.

भूराजकीय आव्हान आणि संघर्षाच्या पृष्ठभूमीवर जगभरातील मध्यवर्ती बँकांनी सोन्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणून मोर्चा वळवला आहे. जगातील मध्यवर्ती बँकांनी एप्रिल महिन्यात १७ टन सोन्याची खरेदी केली. यात चीन आणि पोलंड आघाडीवर आहे, तर भारताच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) सोने खरेदीपासून लांब राहणे पसंत केले. या काळात रशियाने सोन्याची सर्वाधित विक्री केली. मार्चमध्ये मोठ्या प्रमाणावर सोन्याची विक्री केल्यानंतर, मध्यवर्ती बँकांनी एप्रिल महिन्यात विक्री थांबवत सोन्याच्या खरेदीला प्राधान्य दिले. पोलंडची राष्ट्रीय बँक १४ टन सोने खरेदीसह जगातील सर्वांत मोठी खरेदीदार ठरली. पीपल्स बँक ऑफ चायनाने आपल्या साठ्यात आठ टन सोन्याची भर घातली. डिसेंबर २०२४ नंतरची ही चीनची सर्वांत मोठी मासिक खरेदी आहे. झेक प्रजासत्ताकने दोन टन सोन्याची भर घातली, ही त्यांची सलग ३८ वी मासिक खरेदी आहे, तर रशियाने सहा टन सोन्याची विक्री केली. ◀(वृत्तसंस्था)

### रिझर्व्ह बँकेची खरेदीला कात्री

**भारतीय रिझर्व्ह बँकेने एप्रिलमध्ये कोणतीही खरेदी केली नाही. रिझर्व्ह बँकेने एप्रिल महिन्यात सोन्याची खरेदी केली नाही. मार्च २०२६ मध्ये केवळ २०० किलो सोन्याची खरेदी केली होती. यापूर्वी, २०२५ मध्ये ४.२ टन आणि २०२४ मध्ये विक्रमी ७२.६ टन सोन्याची खरेदी केली होती. सध्या, रिझर्व्ह बँकेचा सोन्याचा साठा ८८०.५२ टन इतका स्थिर आहे.** ■

### डॉलर्सवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न

**जेपी मॉर्गनच्या मते, चीन एका हेतुपुरस्सर धोरणाचा भाग म्हणून सोन्याची खरेदी करीत आहे. अमेरिकन डॉलरवरील अवलंबित्व कमी करणे हे चीनचे मुख्य उद्दिष्ट आहे. रशिया-युक्रेन युद्धानंतर अमेरिकेने रशियाचा डॉलरचा साठा गोठवल्यामुळे चीन सावध झाला आहे. दुसरीकडे रशियाने सलग चौथ्या महिन्यात एप्रिलमध्ये सहा टन सोन्याची विक्री केली, त्यामुळे या वर्षातील त्यांची एकूण सोन्याची विक्री आतापर्यंत २२ टन झाली आहे.** ■



रत्नागिरी जिल्ह्यात मासेमारांच्या जाळ्यात अडकलेल्या 'सी-हॉर्स'ची सुटका करण्यात आली. त्याला परत नैसर्गिक अधिवासात सोडले जाणार आहे. समुद्रात राहणारा हा इवलासा जीव सध्या संकटग्रस्त प्रजातींपैकी एक आहे

# दूषित अन्न बनले जागतिक संकट

**जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल**

## दरवर्षी ८६ कोटी लोक आजारी

## १५ लाख लोकांचा बळी

◆ **जीनिव्हा, ६ जून**

दूषित आणि असुरक्षित अन्नामुळे जगभरात दरवर्षी अंदाजे ८६.६ कोटी लोक आजारी पडतात आणि १५ लाख नागरिकांचा अकाली मृत्यू होत असल्याची माहिती जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालातून समोर आली.



सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे, या संकटाचा सर्वाधिक फटका पाच वर्षांखालील मुलांना बसत आहे. सुरक्षित अन्न सुनिश्चित करण्यासाठी तातडीच्या आणि समन्वित जागतिक प्रयत्नांची गरज असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने अहवालात म्हटले आहे. पाच वर्षांखालील मुले जगाच्या लोकसंख्येच्या नऊ टक्के आहेत, परंतु अन्नामुळे होणाऱ्या आजारांचा परिणाम यातील एक तृतीयांश मुलांवर होत आहे. रोगप्रतिकारशक्ती पूर्णपणे विकसित झालेली नसल्यामुळे, त्यांना संसर्ग आणि विषारी पदार्थांचा सहज धोका असतो.

दूषित अन्नामुळे अतिसारासारखे संसर्ग मुलांमध्ये वेगाने पसरतात आणि त्यांच्या मृत्यूचे कारण ठरत आहे. दूषित अन्नातील शिसे आणि मिथाईलमर्क्युरीसारखे विषारी घटक मुलांच्या मेंदूच्या विकासावर परिणाम करू शकतात. यामुळे त्यांच्या शिकण्याच्या क्षमतेवर, मानसिक विकासावर आणि दीर्घकालीन आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो.

**अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान**

असुरक्षित अन्नाचा परिणाम केवळ आरोग्यापुरता मर्यादित नाही. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, अन्नजन्य आजारांमुळे दरवर्षी अंदाजे ३१० अब्ज अमेरिकन डॉलर्सचे आर्थिक नुकसान होते. विविध देशांमधील राहणीमानाचा खर्च आणि क्रयशक्ती विचारात घेतल्यास, हे नुकसान अंदाजे ६४७ अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत वाढते. हा आर्थिक भार वैद्यकीय खर्च, कामातील व्यत्यय आणि उत्पादकतेतील घट या स्वरूपात दिसून येतो. ◀(वृत्तसंस्था)

### बॅक्टेरिया, रसायनांचा धोका

अहवालात अन्नजन्य आजारांची दोन प्रमुख कारणे सांगितली आहेत, त्यात जैविक आणि रासायनिक धोके यांचा समावेश आहे. जैविक धोक्यांमध्ये बॅक्टेरिया, व्हायरस आणि परजीवींचा समावेश होतो, जे बहुतांश आजारांसाठी जबाबदार असल्याचे आढळले आहे. अभ्यासात ८६० दशलक्ष प्रकरणे अशा संसर्गांशी संबंधित होती. दूषित अन्नामुळे झालेल्या एकूण मृत्यूंपैकी अंदाजे ७३ टक्के मृत्यू रसायनांमुळे झाले. ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# एथिकल हॅकिंगची अद्भुत दुनिया

**विशेष**

कर्नल अभय पटवर्धन (निवृत्त)

सीबीएसईच्या २०२६ मध्ये झालेल्या १२ वीच्या परीक्षा निकालानंतर असंख्य असंतुष्ट विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करवले. मूळ आणि पुनर्मूल्यांकनातील तफावतीमुळे स्टँडर्ड ऑन स्क्रीन मार्किंग पोर्टल (ओएसएम) प्रक्रियेतील त्रुटी उजागर झाल्यात. २०२६ चा निकाल २०२५ मधील निकालापेक्षा ३.१० टक्क्यांनी कमी झाला. ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आणि विद्यार्थ्यांना मिळालेले गुण त्यांच्या अपेक्षेनुसार नसल्यामुळे ओएसएम प्रणालीवर प्रश्नचिन्ह उभे झाले. देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड मोठा असंतोष निर्माण होऊन देशात सर्व दूर मोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू झालीत आणि अजूनही होताहेत. ही परीक्षा झाल्यानंतर भारतातीलच निसर्ग अधिकारी आणि सार्थक सिद्धांत या दोन तरुण नैतिक तांत्रिक तज्ज्ञ (एथिकल हॅकर्स) विद्यार्थ्यांनीच सीबीएसईच्या ओएसएम पोर्टलमधील त्रुटींचा पर्दाफाश केला.

आजमितीला डिजिटल युगातील सतत बदलत्या संगणकीय धोक्यांच्या (सायबर थ्रेट्स) वातावरणात, संवेदनशील विदा रक्षणासाठी (सेन्सेटिव्ह डेटा प्रोटेक्शन) एथिकल हॅकर्सच तांत्रिक कौशल्य आणि नैतिक मूल्यांचं महत्त्व निर्विवाद आहे. एथिकल हॅकिंग ऊर्फ पेनिट्रेशन टेस्टिंग ऊर्फ व्हाईट हॅट हॅकिंगमध्ये संगणक प्रणाली, अनुप्रयोग/ॲप, संगणक सॉफ्टवेअर किंवा विदेत (डेटा) अनधिकृत प्रवेश मिळविणे, त्यातील त्रुटींचा आढावा घेणे आणि सुरक्षेच्या उपाययोजना केल्या जातात. एथिकल हॅकर्स संगणकीय सुरक्षिततेला भेदण्यासाठी सायबर गुन्हेगारांची पद्धत आणि साधनांचा वापर करतात. एथिकल हॅकिंग सर्वमान्य असून अपरिहार्य आहे. कारण हे हॅकर्स अ) विदा चोरी रोखण्यासाठी, संगणकीय गुन्हेगारांनी विदा पद्धतीला भेदून चोरण्याआधीच संस्थेला प्रतिबंधात्मक उपाययोजना अंगीकारण्यास मदत करतात. ब) संस्थेच्या विद्यमान सुरक्षा उपायांच्या परिणामकारकतेबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करीत असल्यामुळे संस्थांना नवीनतम/अद्ययावत, संगणकीय संरक्षण प्रोटोकॉल्स अंगीकारता येतात आणि क) एथिकल हॅकिंगचा वापर करणाऱ्या संस्थांनी अंगीकारलेल्या सायबर सुरक्षा प्रणालीमुळे ग्राहक, भागीदार आणि हितधारकांची विश्वास वृद्धी होते.

सूत्रांनुसार निसर्ग अधिकारीने सीबीएसई ट्रेल्थ स्टँडर्ड ओएसएममधील त्रुटी आणि सार्थक सिद्धांतने कोएम्प्ट एज्यु टेक या संस्थेलाच कॉन्ट्रॅक्ट देण्यासाठी सीबीएसईने केलेल्या ढळढळीत नियम फेरबदलांना उजागर केले आहे. या दोन्ही बाबींमुळे लाखो विद्यार्थ्यांना तांत्रिक आणि प्रक्रियात्मक त्रुटींचा सामना करावा लागला आणि डिजिटल सुधारणांमुळे परीक्षेची/परीक्षेतील सचोटी, निःपक्षता आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत माहिती सुरक्षेचे धिंडवडे निघाले. सीबीएसईने याच वर्षी अंगीकारलेले ओएसएम पोर्टल, परीक्षकांसाठी एक नवीन डिजिटल प्रणाली होती/आहे. मे २०२६ च्या चौथ्या आठवड्यात निसर्ग अधिकारीने पोर्टल कोड हॅक करून त्यातील त्रुटी उजागर केल्यात. ओएसएममुळे परीक्षकांना ऑनलाईन पोर्टलवर लॉग-इन करून उत्तरपत्रिकांच्या स्कॅन्ड प्रतींचे मूल्यांकन करता येते. हा बदल प्रामुख्याने लांबलचक मूल्यांकन प्रक्रियेला सुव्यवस्थित करण्यासाठी करण्यात आला. दुसरीकडे ऑनस्क्रीन मार्किंग प्रणाली तयार करून ती होस्ट करण्यासाठी सीबीएसईने हैदराबादच्या कोएम्प्ट एज्यु टेकला या नवीन पद्धतीसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा तयार करून राबविण्याची जबाबदारी दिली होती. कोएम्प्ट एज्यु टेकलाच ही जबाबदारी देण्यासाठी सीबीएसईने आपल्या नियमांत कोणते बदल कसे केलेत हे सार्थक सिद्धांतने दाखवून दिले.

या किस्स्याचा ओनामा वेदांत श्रीवास्तवने केला. त्याने १० वी सीबीएसई भौतिकशास्त्राच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळविण्यासाठी अर्ज केला होता. ती मिळाल्यावर त्याच्या लक्षात आले की, सीबीएसईने अपलोड केलेली भौतिकशास्त्राची उत्तरपत्रिका त्याची नव्हती. दुर्दैवाने हा अपवाद नव्हता. अनेक विद्यार्थ्यांना असेच अनुभव आलेत. त्यामुळे निसर्ग आणि सिद्धांतने हे प्रकरण स्वतःच हाताळण्याचा निर्णय घेतला असावा, असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही.

निसर्ग अधिकारी हा २०२६ सीबीएसई १२ परीक्षेला बसलेला विद्यार्थी, सायबर सुरक्षा संशोधकही आहे. २०२६ फेब्रुवारीमध्ये त्याने संगणकावर सहज फिरता फिरता मनोरंजनास्तव सीबीएसई ओएसएम प्लॅटफॉर्म हॅक केला आणि भारतीय संगणक आपत्कालीन प्रतिसाद टीमला (इंडियन कॉम्प्युटर इमरान रिस्पॉन्स टीमः सर्ट इन) त्याची माहिती दिली. हॅकिंगमध्ये मिळालेल्या माहितीच्या विश्लेषणानंतर त्याच्या समोर ओएसएम सॉफ्टवेअरमधील अनेक कमतरता, दोष, उजागर झाले. निसर्ग अधिकारीने केवळ उत्सुकतेपोटी सीबीएसईच्या नवीन सुरू झालेल्या ओएसएम मूल्यांकन प्लॅटफॉर्मच्या बॅकएंड कोडची तपासणी केली असता त्याला केवळ ३० मिनिटांत त्या पोर्टलमधील गंभीर सुरक्षा त्रुटी मिळाल्या.



अ) सर्वांत गंभीर त्रुटी म्हणजे फ्रंट एंड सोर्स कोडमध्ये थेट एम्बेड केलेल्या हार्ड कोडेड मास्टर पासवर्डमुळे परीक्षकाचा युजर आयडी असलेल्या कोणाही अनधिकृत व्यक्तीला वन टाईम पासवर्ड, ओटीपी पडताळणी टाळून पोर्टलमध्ये प्रवेश मिळविणे शक्य होत होते.

ब) पोर्टलमध्ये शिरल्यावर ती अनधिकृत व्यक्ती कोणत्याही खऱ्या शिक्षकाच्या नावाने लॉग-इनद्वारे मूल्यमापनकर्त्यांच्या डॅश बोर्डमध्ये प्रवेश करून कोणत्याही विद्यार्थ्यांचे गुण बदलू शकते.

क) बोर्डाची ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस स्टोरेज बकेट संपूर्ण चुकीच्या पद्धतीने कॉन्फिगर केलेली असल्यामुळे अनधिकृत वापरकर्त्यांना १८ लाखांहून अधिक स्कॅन केलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका आणि प्रश्नपत्रिका सहजपणे ॲक्सेस करून डाउनलोड करता येणार होत्या.

ड) पोर्टलमध्ये कार्यक्षम पासवर्ड रीसेट पडताळणीची सोय नव्हती. एखादा अनधिकृत/अप्रमाणित वापरकर्ता केवळ स्वतःच्या युजर आयडीचा वापर करून दुसऱ्याच्या खात्याचा पासवर्ड बदलू शकत होता, ज्यामुळे जुन्या पासवर्डची पडताळणी पूर्णपणे टाळली जात होती. सीबीएसई १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर निसर्ग अधिकारीने सोशल मीडियावर ही बाब सार्वजनिक केली.

त्याच्या हे लक्षात आले की, सर्वप्रथम संगणक हल्लेखोर, लक्षित व्यक्तीचा सार्वजनिक असलेला युजर आयडी आणि स्कूल कोड डाऊनलोड करेल. त्यानंतर कोड स्क्रिप्टमधील हार्डकोडेड मास्टर पासवर्ड मिळवून तो पोर्टलमध्ये एक परीक्षक म्हणून लॉग-इन करू शकेल. हा पासवर्ड शोधताना अधिकारीला पासवर्ड संरक्षण व्यवस्थेला तोंडच द्यावे लागले नाही. कारण ती अस्तित्वातच नव्हती. जर निसर्ग अधिकारीसारखा तरुण मुक्तछंदी हे सहजपणे करू शकला तर व्यावसायिक संगणक हल्लेखोराला कुठल्याही विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिकेत किंवा मार्क लिस्टमध्ये मुक्तपणे बदल करण सहज शक्य होईल. निसर्गने ही सर्व माहिती लगेच सर्ट-इनला दिली. उत्तरात त्याला 'याची तपासणी केली जाईल' हा प्रतिसाद मिळाला. मात्र, वेदांत श्रीवास्तवची कहाणी कळल्यानंतर निसर्ग अधिकारीने त्याच्या हॅकिंग आणि सीबीएसईच्या उत्तराची ब्लॉग पोस्ट प्रकाशित केली आणि वातावरण तापणे सुरू झाले.

दुसरीकडे सार्थक सिद्धांतने ओएसएम पोर्टलमधील डिजिटल पायाभूत सुविधा तयारीच्या व्यावसायिक आणि कायदेशीर बाजूंचा अभ्यास करून सोशल मीडियावर, सीबीएसईच्या रिक्वेस्ट फॉर प्रपोजल/आरएफपी निविदा दस्तावेजांचे (टेंडर सिस्टिम) सार्वजनिक विश्लेषण प्रकाशित केले. वेदांत श्रीवास्तवची कहाणी कळल्यानंतर सार्थक सिद्धांतनेदेखील या शोधाची ब्लॉग पोस्ट टाकली आणि त्यात; अ) सीबीएसई ही एक सार्वजनिक संस्था असल्यामुळे ओएसएम व्यवस्थापनासाठी स्वतःच्या पसंतीच्या खाजगी विक्रेत्याची निवड न करता सार्वजनिक प्रस्ताव विनंती/आरएफपी जारी करून स्पर्धात्मक निविदा मागवायला पाहिजे होत्या. ब) संचालक मंडळाने कंपनीच्या इतिहासाशी संबंधित कलम काढून टाकले. क) संचालक मंडळाने कॅपॅबिलिटी मॅच्युरिटी मॉडेल इंटिग्रेशन स्तर ५ वरून ३ पर्यंत खाली आणल्यामुळे सॉफ्टवेअर इंजिनीअरिंगची गुणवत्ता वांध्यात येऊन विद्यार्थ्यांची संवेदनशील माहिती खुली झाली आणि स्कॅनरच्या गुणवत्तेतही घट केल्याचे स्पष्ट केले. सार्थक सिद्धांतनुसार हा केवळ एक योगायोग नाही. या ब्लॉगनंतर सोशल मीडियावर स्फोट होणे स्वाभाविक होते. दोन्ही ब्लॉगच्या उत्तरादाखल 'आम्ही सायबर सुरक्षा व्यावसायिकांची एक टीम तैनात केली असून ती ओएसएम पोर्टलमधील त्रुटींची तपासणी करेल. यासाठी सूचना द्यायच्या असल्यास नागरिकांनी संपर्क साधावा' असे आवाहन सीबीएसई संचालक मंडळाने केले आहे.

संगणकीय हॅकिंग, अनधिकृत घुसखोरी, चोरीमुळे सामान्यतः उत्पादक हेतूंसाठी वैयक्तिक आणि गोपनीय माहिती उघड करता येते. संगणकात नैतिक घुसखोरी (एथिकल हॅकिंग) करणारी व्यक्ती किंवा संस्था, नेटवर्क किंवा सिस्टिमच्या माध्यमातून चाचणी करून, नेटवर्कमधील त्रुटी शोधून त्यात दुरुस्ती करण्यासाठी एखाद्या उपकरणात (सिस्टिम किंवा नेटवर्क) प्रवेश करू शकते. बहुतेक नैतिक हॅकर्स, विविध दृष्टिकोन, कार्यपद्धती आणि साधनांच्या वापराद्वारे सिस्टिमची चाचणी करून सायबर हल्ल्यांपासून आपल्या गोपनीयतेचे रक्षण करतात. असे करताना त्यांना सायबर सुरक्षा कायदे आणि नियमांचे पालन करून, संगणक गुन्हे कायदे, विदा संरक्षण नियम आणि बौद्धिक संपदा हक्क यांसारख्या कायदेशीर चौकटींशी परिचित व्हावे लागते. वाढत्या इंटरनेट वापरामुळे सांप्रत काळात संगणकीय गोपनीयता सुनिश्चित करण्याची प्रचंड गरज निर्माण झाली आहे. वापरकर्ते आणि उद्योगांच्या नेटवर्कची विश्वसनीयता आणि सुलभता अत्यंत महत्त्वाची बनल्यामुळे वापरकर्त्यांची ओळख व गोपनीय माहितीच्या रक्षणासाठी सुरक्षित पायाभूत सुविधांचा विकास अत्यावश्यक झाला आहे. इंटरनेटचा विकास आणि लोकप्रियतेमुळे हॅकिंग, फिशिंग, स्पॅमिंग करत सायबर घुसखोरी/चोरी करता येते. व्यक्ती आणि संस्थांनी आपला डेटा क्लाऊड आर्किटेक्चरवर स्थलांतरित केल्यामुळे डेटा संरक्षणाचे नवीन प्रश्न आणि धोके निर्माण झाले आहेत.

सीबीएसई आणि नीट परीक्षांमधील प्रचंड गोंधळानंतर दस्तुरखुद्द पंतप्रधानांनी यात लक्ष घालत संचालक मंडळाचे अध्यक्ष व सचिव तडकाफडकी बदललेत. मे २६ मध्येच उजागर झालेली नीट परीक्षेतील प्रश्नपत्रिका गळती आणि सीयूईटी परीक्षेतील तांत्रिक अडचणींच्या पृष्ठभूमीवर परीक्षांच्या सद्यस्थितीबद्दल देशात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

निसर्ग अधिकारी आणि सार्थक सिद्धांते केलेली हॅकिंग सीबीएसईच्या ऑन स्क्रीन मार्किंग पोर्टलमध्ये उघड झालेल्या सायबर सुरक्षा त्रुटी आणि टेंडरच्या विसंगती शोधण्यासाठी झालेले दुर्भावनापूर्ण सायबर हल्ले नव्हते तर १२ वीच्या उत्तरपत्रिकांचे डिजिटल मूल्यांकन कसे होईल याबद्दल संगणकीय तंत्रज्ञान कुशल, किशोरवयीन मुलांनी केलेल्या तपासाचा हा एक भाग होता, असे माझे मत आहे. मात्र, सरकारने आता याची पुनरावृत्ती होणार नाही, याची ग्वाही लोकांना देणे अनिवार्य आहे. केवळ संबंधित अधिकाऱ्यांची बदली करून काहीही साध्य होणार नाही. नीट आणि सीबीएसई मिळून अंदाजे ४१ लाख विद्यार्थ्यांच्या आकांक्षांवर या गलथानपणामुळे पाणी फेरले गेले आहे. या विद्यार्थ्यांच्या मनात धुमसत असलेल्या असंतोषाचा फायदा कॉक्रोच जनता पार्टी, असंतुष्ट विरोधक आणि अर्बन नक्षल्यांनी घेतल्यास त्यात काहीच नवल नसेल. राजा, सावध हो, रात्र वैऱ्याची आहे...!

नागपूर/९४२२१४९८७६

# समन्वय साधणारे व्यापक धोरण हवे

**चिंतन**

ॲड. शिवाजी कराळे

**राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या ताज्या अहवालानुसार गुन्हेगारी ही केवळ कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या नसून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि मानसिक आरोग्याशी जोडलेला प्रश्न आहे. त्यासाठी कठोर शिक्षा किंवा पोलिसांची संख्या वाढवण्याबरोबरच मूल्यसंस्कार, रोजगारनिर्मिती, महिलांसाठी सुरक्षित वातावरण, मानसिक आरोग्य सेवा आणि तंत्रज्ञानाधारित पोलिसिंगचा समन्वय साधणारे व्यापक शैक्षणिक धोरण आवश्यक आहे.**

नवीन भारतीय न्याय संहिता (बीएनएस) लागू झाल्यानंतर काही गुन्हे संज्ञेय गुन्ह्यांच्या यादीतून वगळल्यामुळे काही अपराधांची आकडेवारी कमी झालेली दिसते; परंतु केवळ कागदोपत्री घट झाली म्हणून वास्तव बदलले, असे मानणे धोकादायक ठरेल. गुन्ह्यांची नोंद कमी झाली म्हणजे गुन्हे कमी झाले, असा सरधोपट निष्कर्ष काढता येत नाही. अनेकदा भीती, सामाजिक दबाव किंवा प्रशासनावरील अविश्वासामुळे गुन्हे नोंदवलेही जात नाहीत. आज भारत एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. एका बाजूला डिजिटल आणि आर्थिक महासत्ता होण्याची महत्त्वाकांक्षा आहे, तर दुसऱ्या बाजूला वाढती गुन्हेगारी, सामाजिक असुरक्षितता आणि मानसिक तणाव आहे. या दोन्ही चित्रांमधील दरी कमी करायची असेल, तर आकडेवारीकडे केवळ माहिती म्हणून नव्हे तर समाजाला दिशा देणारा इशारा म्हणून पाहावे लागेल. अन्यथा, विकासाच्या प्रकाशामागील अंधार गडद होत जाईल. भारत आज एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. एकीकडे जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होण्यासाठी आपली घोडदौड सुरू आहे, तर दुसरीकडे आपण 'विश्वगुरू' म्हणून जगाला मार्गदर्शन करण्याची आकांक्षा बाळगत आहोत. अंतराळ मोहिमेतील यश, डिजिटल क्रांती आणि जागतिक मंचावर वाढलेला भारताचा दबदबा ही आपल्या प्रगतीची लक्षणे आहेत; मात्र या चकाकत्या चित्राच्या पाठीमागे गुन्हेगारीच्या वाढत्या आलेखाचे एक गडद सावट पसरलेले दिसते. आर्थिक महासत्ता होण्याच्या वाटेवर 'गुन्हेगारी' हा शाप ठरत आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता आली आहे.

कोणत्याही देशाची प्रगती केवळ जीडीपीच्या आकड्यांवर मोजली जात नाही. त्या देशातील नागरिक किती सुरक्षित आहेत, यावर ती अवलंबून असते. भारताने उत्पादक क्षेत्र, पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानात मोठी झेप घेतली आहे; मात्र समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत या समृद्धीचे फायदे पोहोचण्यापूर्वीच गुन्हेगारीची कीड अर्थव्यवस्थेला पोखरू लागली आहे. 'डिजिटल इंडिया'च्या युगात सायबर गुन्हे हे सर्वांत मोठे आव्हान बनले आहे. आर्थिक फसवणुकीमुळे सर्वसामान्यांचा बँकिंग व्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत होत आहे. मोठ्या बँकिंग फसवणुकी आणि भ्रष्टाचारामुळे परकीय गुंतवणुकीवर परिणाम होतो. व्यवस्थेत पारदर्शकता कमी होते, तेव्हा गुंतवणूकदार पाठ फिरवतात. रिअल इस्टेट, रस्तेबांधणी आणि स्थानिक उद्योगांमध्ये आजही संघटित टोळ्यांचा हस्तक्षेप दिसून येतो, जो विकासाचा वेग मंदावतो. भारत स्वतःला 'विश्वगुरू' म्हणवून घेतो, तेव्हा त्याचा अर्थ केवळ लष्करी किंवा आर्थिक शक्ती असा नसून 'नैतिक शक्ती' असा असतो. प्राचीन काळी नालंदा आणि तक्षशिला ही ज्ञानाची केंद्रे होती. कारण तिथे चारित्र्यसंपन्न समाज घडत होता. आज आपण महिलांवरील अत्याचार, अल्पवयीन मुलांमधील वाढती गुन्हेगारी आणि अमली पदार्थांच्या विळख्यातील तरुणाई पाहतो, तेव्हा आपल्या नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाची जाणीव होते. नागरिक सुरक्षित नसतात आणि न्यायव्यवस्था वेळखाऊ असते, त्या देशाकडे जागतिक स्तरावर केवळ 'बाजारपेठ' म्हणून पाहिले जाते, 'मार्गदर्शक' म्हणून नाही.

गुन्हेगारी वाढण्यामागे केवळ पोलिसांचे अपयश नसून सामाजिक आणि आर्थिक कारणेही आहेत. वाढती महागाई आणि हाताला काम नसलेल्या तरुणाईचे गुन्हेगारीकडे वळणे ही चिंतेची बाब आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी गुन्हेगारीला खतपाणी घालते. न्यायाला होणारा विलंब हा न्याय नाकारण्यासारखाच आहे. वर्षानुवर्षे चालणारे खटले गुन्हेगारांचे मनोबल वाढवतात. 'एआय' आणि डीपफेकसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून सामाजिक सलोखा बिघडविण्याचे प्रयत्न होत आहेत. भारताला खऱ्या अर्थाने महासत्ता व्हायचे असेल, तर 'कठोर कायद्यांसोबतच प्रभावी अंमलबजावणी' या सूत्रावर काम करावे लागेल. केवळ मनुष्यबळ वाढवून चालणार नाही, तर पोलिसांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करणे गरजेचे आहे. केवळ पदव्या देणारे शिक्षण नको, तर नैतिक मूल्ये आणि कायद्याचा आदर शिकवणारे शिक्षण हवे. जलदगती न्यायालयांची संख्या वाढवून गुन्हेगारांना जरब बसेल अशा पद्धतीने निकालांचा वेग वाढवावा लागेल. जगातील महासत्तांच्या रांगेत स्थान मिळविण्याचे स्वप्न देश पाहत आहे; परंतु या झगमगत्या चित्रामागे एक काळी छाया सातत्याने गडद होत चालली आहे- ती म्हणजे वाढती गुन्हेगारी. आर्थिक प्रगतीच्या रथाला सामाजिक असुरक्षिततेचा शाप लागला असेल, तर तो विकास टिकाऊ ठरू शकत नाही. कारण कोणतीही महासत्ता केवळ अर्थव्यवस्थेच्या बळावर घडत नाही; ती घडते समाजातील सुरक्षितता, न्याय, नैतिकता आणि नागरिकांच्या विश्वासाच्या पायावर. राष्ट्रीय गुन्हे नोंद नोंदणी विभागाच्या ताज्या आकडेवारीने पुन्हा एकदा हे वास्तव उघड केले आहे.

आज देशात दर काही मिनिटांनी होणारे खून, बलात्कार, अपहरण, आर्थिक फसवणुकीचे गुन्हे आणि झपाट्याने वाढणारे सायबर अपराध ही केवळ आकडेवारी नाही, तर भारतीय समाजातील वाढत्या अस्थैर्याची चिन्हे आहेत. एका बाजूला आपण कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल इंडिया आणि स्टार्टअप इकॉनॉमीच्या घोषणा करतो आहोत, तर दुसऱ्या बाजूला सामान्य नागरिक स्वतःच्या सुरक्षिततेबाबत अस्वस्थ आहेत. रात्री महिलांना सुरक्षितपणे बाहेर फिरता येणे, वृद्धांनी ऑनलाईन व्यवहार करताना फसवणुकीची भीती न बाळगणे किंवा तरुणांनी उज्ज्वल भविष्यासाठी आत्मविश्वासाने जगणे ही मूलभूत हमी समाजात उरली नाही, तर विकासाची भाषा कितीही मोठी असली तरी पोकळ ठरते. गुन्हेगारीवाढीचे स्वरूपही आता बदलत चालले आहे. पूर्वी गुन्हे म्हणजे रस्त्यावरची चोरी, दरोडे, मारामाऱ्या किंवा स्थानिक टोळ्यांचा दहशतवाद असे चित्र होते. आज गुन्हेगारांचा चेहरा अधिक आधुनिक झाला आहे. हातात शस्त्राऐवजी आता त्यांच्याकडे संगणक, मोबाईल आणि डेटा आहे. सायबर फसवणूक, डिजिटल आर्थिक गुन्हे, ओटीपी घोटाळे, ऑनलाईन ब्लॅकमेलिंग आणि 'सोशल मीडिया'द्वारे होणारे मानसिक शोषण या नव्या गुन्हेगारीने समाजाला वेढले आहे. गुन्हेगार आता रस्त्यावर धोका पत्करत नाहीत, तर इंटरनेटच्या आडून लाखो लोकांना लुबाडत आहेत. दुर्दैवाने आपल्या पोलिस यंत्रणा आणि न्यायव्यवस्था अजूनही मोठ्या प्रमाणावर पारंपरिक पद्धतींमध्ये अडकलेल्या दिसतात. आधुनिक गुन्हेगारांशी लढण्यासाठी आवश्यक असलेली डिजिटल फॉरेन्सिक क्षमता, डेटा विश्लेषण, सायबर सज्जता आणि तांत्रिक मनुष्यबळ अद्याप अपुरे आहे.

महिलांविरुद्ध वाढणारे अपराध ही तर अधिक गंभीर बाब आहे. समाजाची सभ्यता त्याने महिलांना दिलेल्या सुरक्षिततेवर मोजली जाते; परंतु देशातील अनेक राज्यांमध्ये बलात्कार, छेडछाड, घरगुती हिंसा, अपहरण आणि लैंगिक अत्याचाराच्या घटना सातत्याने वाढताना दिसत आहेत. ही केवळ कायद्याची समस्या नाही, तर समाजाच्या मानसिकतेची समस्या आहे. आर्थिक प्रगती झाली, शहरे स्मार्ट झालीत, इंटरनेट गावोगावी पोहोचले, तरी स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत नसेल, तर तो विकास अपूर्णच राहणार. विश्वगुरू होण्याचा दावा करणाऱ्या राष्ट्रात महिलांना अजूनही भीतीच्या सावटाखाली जगावे लागत असेल, तर आत्मपरीक्षणाची आवश्यकता आहे.

याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे वाढती मानसिक अस्थिरता. विद्यार्थ्यांच्या आणि बेरोजगारांच्या आत्महत्या वाढत आहेत. स्पर्धेच्या दबावाखाली करीअरच्या अनिश्चिततेत आणि बेरोजगारीच्या छायेत तरुण पिढी तुटत चालली आहे. देशातील तरुणाई आत्मविश्वासाने आणि सुरक्षिततेच्या भावनेने जगत असेल तरच आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न साकार होऊ शकते, परंतु आज अनेक तरुणांना भविष्य धूसर दिसते आहे. उच्च शिक्षण असूनही रोजगार नाही, रोजगार असला तरी स्थैर्य नाही आणि स्थैर्य नसल्याने मानसिक शांतता नाही. ही साखळी समाजात असंतोष निर्माण करते. अनेकदा हाच असंतोष गुन्हेगारीचे रूप धारण करतो. गुन्हेगारी वाढीमागे केवळ आर्थिक कारणे नाहीत, तर सामाजिक आणि नैतिक अधःपतनाचाही त्यात मोठा वाटा आहे.

समाजात झपाट्याने वाढणारी भौतिकतावादी मानसिकता, 'सोशल मीडिया'वरून निर्माण होणारी दिखाऊ जीवनशैली, जलद श्रीमंत होण्याची हव्यासपूर्ण स्पर्धा आणि नैतिक मूल्यांची होत असलेली घसरण यामुळे अनेक जण चुकीच्या मार्गाकडे वळत आहेत. भ्रष्टाचार, राजकीय हस्तक्षेप, न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब आणि गुन्हेगारांविषयीची भीती कमी होणे हेही गुन्हेगारीला खतपाणी घालणारे घटक आहेत. समाजात कायद्याचा धाक कमी होतो आणि पैशाच्या किंवा सत्तेच्या जोरावर गुन्हेगार सुटू शकतात, अशी भावना निर्माण होते, तेव्हा गुन्हे वाढणे अपरिहार्य ठरते. भारताला खऱ्या अर्थाने महासत्ता व्हायचे असेल तर केवळ जीडीपी वाढवून चालणार नाही. महासत्ता होण्यासाठी समाजात सुरक्षिततेची भावना, न्यायव्यवस्थेवर विश्वास, महिलांचा सन्मान, युवकांसाठी संधी आणि नागरिकांमध्ये नैतिक जबाबदारीची जाणीव आवश्यक असते. अमेरिका, जपान किंवा युरोपीय देशांची ताकद केवळ त्यांच्या अर्थव्यवस्थेत नाही, तर संस्थात्मक शिस्तीत, कायद्याच्या अंमलबजावणीत आणि नागरिकांच्या सुरक्षिततेत आहे. भारतानेही विकासाचा अर्थ केवळ आर्थिक आकड्यांपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक आरोग्याशी जोडण्याची गरज आहे.

**रविवारची पत्रे**

## युद्ध, होर्मुझ आणि नफा : देश संकटात, खाजगी कंपन्या सुरक्षित?

मे २०२६ मध्ये जागतिक राजकारणात अस्थिरतेचे ढग गडद होत असताना इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष उघड युद्धाच्या उंबरठ्यावर पोहोचला. त्याचा थेट परिणाम जागतिक तेल पुरवठ्यावर झाला. विशेषतः जगातील सर्वांत संवेदनशील सागरी मार्ग असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीमधून होणारी तेल वाहतूक धोक्यात आली. जगातील सुमारे २० टक्के कच्च्या तेलाची वाहतूक या एकाच मार्गावर अवलंबून आहे. या मार्गात अडथळे, हल्ल्यांची भीती आणि विमा खर्चातील प्रचंड वाढ यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात इंधन दर उसळले. परिणामी अनेक देशांमध्ये इंधन पुरवठा कमतरतेची भीती निर्माण झाली. अशा वेळी भारतासारख्या आयात-निर्भर देशाने अत्यंत सावध धोरण अवलंबणे अपेक्षित होते; पण वास्तव वेगळेच होते. देशांतर्गत गरज, संभाव्य तुटवडा आणि भविष्यातील संकटाचा अंदाज असतानाही रिलायन्स पेट्रोलियम कंपनीसारख्या खाजगी कंपन्यांनी संधी साधली. होर्मुझ संकटामुळे आशियाई बाजारात डिझेल व विमान इंधनाला मोठे प्रीमियम मिळत असताना, भारतातून मोठ्या प्रमाणावर इंधन निर्यात करण्यात आले. देशाला भविष्यात इंधन टंचाईचा धोका असताना, परदेशात इंधन विकून नफा कमावला गेला, ही वस्तुस्थिती अस्वस्थ करणारी आहे.

एका बाजूला सरकारी तेल कंपन्या नफा न पाहता देशातील पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी झगडत आहेत. युद्धजन्य परिस्थितीत साठे वाढविणे, दर नियंत्रणात ठेवणे आणि जनतेत घबराट न पसरू देणे ही जबाबदारी त्यांच्यावरच येते. दुसऱ्या बाजूला खाजगी कंपन्या मात्र बाजाराचा नियम सांगत इंधन परदेशात वळवतात. हा फरक केवळ व्यावसायिक धोरणांचा नाही, तर राष्ट्रीय जबाबदारीचा आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीतून तेल वाहतूक विस्कळीत होण्याची शक्यता असताना देशांतर्गत इंधन साठवण आणि पुरवठ्याला प्राधान्य देणे गरजेचे होते. मात्र, स्पेशल इकॉनॉमी झोन सवलतींच्या आडून निर्यातींना प्रोत्साहन दिले गेले. परिणामी देशाला भविष्यातील संकटासाठी कमी साठा, सामान्य जनतेसाठी महाग इंधन आणि खाजगी कंपन्यांसाठी सुरक्षित नफा हे चित्र गंभीर धोरणात्मक अपयश दर्शवते.

इराण-इस्रायल-अमेरिका संघर्ष आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील अस्थिरता ही केवळ परदेशी बातमी नाही; ती भारताच्या ऊर्जा सुरक्षेशी थेट जोडलेली आहे. अशा काळात जर खाजगी कंपन्यांना मोकळे रान दिले, तर देश संकटात आणि कॉर्पोरेट नफ्यात हीच खाजगीकरणाची ओळख बनेल. ऊर्जा क्षेत्रात नफा नव्हे, राष्ट्रहित प्रथम हा स्पष्ट नियम नसेल, तर पुढील युद्ध किंवा संकटात देश अधिक असुरक्षित बनेल आणि त्याची किंमत नेहमीप्रमाणे सामान्य नागरिकालाच मोजावी लागेल.

**मुकेश अग्रवाल**/तिरोडा/९३२६८८०३८०

## देहाकडून देवाकडे...

'देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि आपण या देशाचे देणे लागतो.' ही ओळ अत्यंत गूढ, विचारप्रवर्तक आणि जीवनमूल्य सांगणारी आहे. यात व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम दिसून येतो. मनुष्य जन्माला येतो तेव्हा तो फक्त एक देह असतो. त्याचे आयुष्य हळूहळू अनुभवांनी, संस्कारांनी आणि कर्तृत्वाने समृद्ध होत जाते. शेवटी प्रत्येकाचा प्रवास देवाकडे म्हणजेच सत्य, चिरंतनता आणि आत्मिक समाधानाकडे सुरू असतो. पण या दोन टोकांच्या प्रवासात एक महत्त्वाचा दुवा असतो, तो म्हणजे देश. आपला जन्म ज्या मातीत होतो, ज्या भूमीत आपण वाढतो, शिक्षण घेतो, संस्कार मिळवितो, त्या देशाचे आपल्यावर अनंत उपकार असतात. आपल्या आई-वडिलांप्रमाणेच देश ही आपल्याला ओळख, भाषा, संस्कृती, सुरक्षितता आणि अस्तित्व देतो. म्हणूनच आपण या देशाचे देणे लागतो, ही भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात असली पाहिजे. देशाचे देणे फेडणे म्हणजे केवळ युद्धात शौर्य दाखवणे नव्हे. प्रामाणिकपणे काम करणे, समाजहित जपणे, पर्यावरणाची काळजी घेणे, कायद्याचे पालन करणे, दुसऱ्यांच्या हक्कांचा आदर करणे हीसुद्धा देशसेवाच आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना घडवतो, शेतकरी अन्न उगवतो, सैनिक सीमांचे रक्षण करतो, डॉक्टर जीव वाचवतो. प्रत्येक जण आपल्या कार्यातून देशाचे ऋण फेडत असतो. आजच्या काळात अनेकदा व्यक्ती स्वतःच्या सुखात, स्वार्थात आणि स्पर्धेत इतकी गुंतून जाते की, देशाप्रति असलेली जबाबदारी विसरते. लक्षात ठेवायला हवे की, आपल्या वैयक्तिक प्रगतीमागे देशाची सामूहिक शक्ती उभी असते. आपण वापरत असलेले रस्ते, शिक्षण व्यवस्था, संविधान, संस्कृती हे सर्व देशाने दिलेले अमूल्य दान आहे. 'देहाकडून देवाकडे' हा प्रवास फक्त आध्यात्मिक नसून सामाजिकही आहे. कारण देव मिळविण्याचा खरा मार्ग मानवसेवा आणि राष्ट्रसेवा यातूनच जातो. स्वामी विवेकानंदांनी सांगितले होते की, 'देशसेवा हीच ईश्वरसेवा आहे.' जेव्हा माणूस स्वतःपुरता विचार न करता समाज आणि देशासाठी जगतो, तेव्हा त्याचा देह अर्थपूर्ण होतो आणि त्याचा आत्मा देवत्वाकडे वाटचाल करतो. शेवटी, देश ही केवळ भौगोलिक सीमा नसते; ती आपल्या अस्तित्वाची ओळख असते. म्हणून प्रत्येकाने मनात देशभक्ती, कृतज्ञता आणि कर्तव्यभावना ठेवून जगले पाहिजे. कारण 'मातीचे ऋण फेडल्याशिवाय मोक्षाचा मार्ग पूर्ण होत नाही.'

**संजय करगुटकर**/नागपूर / ९८९०७५९००५

# लाल दिव्याचा माणूस आणि पालावरची शाळा

"सर, आज वस्तीत येऊ नका, दोन गटांत भांडणं सुरू झाली आहेत. वस्तीतील वातावरण बरोबर नाही" मी काळजीपोटी भ्रमणध्वनीवरून शब्द वदलो. पलीकडून अतिशय संयमी स्वरात उत्तर आलं, "प्रशांतजी, तुम्हाला सांगायचंच विसरलो, माझी पदोन्नतीने बदली झाली. आजच मी अल्पसंख्यक विभागाचा सचिव म्हणून मुंबईला रुजूही झालोय." क्षणभर काळजाचा ठोका चुकला. सभोवतालची शांतता अधिकच गडद झाली. ज्यांच्या येण्याने पालावरच्या पोरांच्या आयुष्यात प्रकाशाची एक नवी तिरीप आली होती, ते मिनाज मुल्ला आता या वस्तीच्या चिखलात आपल्या ई-स्कूटरवर स्वार होऊन येणार नाहीत, हे सत्य पचवणं कठीण होतं. कंठ दाटून आला. फक्त इतकंच बोलू शकलो, "सर, माझ्या उपेक्षित मुलांचं अतोनात नुकसान झालं. तुमच्यासारखा शिक्षक त्यांना पुन्हा लाभणार नाही." साधारण वर्षभरापूर्वीची गोष्ट. महाराष्ट्र शासनाने दूध भेसळीविरुद्ध मोठी मोहीम हाती घेतली होती. भेसळखोरांविरुद्ध अचानक तपासणी आणि धडक कारवाया करण्यासाठी जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. या पथकात अपर पोलिस अधीक्षक, सहआयुक्त (अन्न व औषध प्रशासन) आणि उपायुक्त (पशुसंवर्धन) यांचा समावेश होता. याच एका महत्त्वाच्या समितीच्या बैठकीत अपर जिल्हाधिकारी मिनाज गनी जन्नत मुल्ला हे अध्यक्ष होते आणि मी सचिव.

एक महत्त्वाची बैठक संपल्यावर प्रोसिडिंगवर स्वाक्षरी घेताना मी सहज भटक्या विमुक्त परिषदेचा भटक्या समाजाच्या वस्त्यांमध्ये जाऊन त्यांच्याशी एकरूप होऊन त्यांच्याच वस्तीत चालविला गेलेला शैक्षणिक उपक्रम पालावरच्या शाळेच्या प्रकल्पाबद्दल त्यांना माहिती दिली. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून तुटलेल्या त्या भटक्या समाजाची व्यथा मांडली. ते फक्त इतकंच म्हणाले, "प्रशांतजी, छान संकल्पना आहे. वेळ मिळाला तर नक्की येईल गोंदिया येथील पालावरची शाळा बघायला." जिल्ह्याचं इतकं व्यापाचं पद सांभाळणारा माणूस खरोखर या उपेक्षित वस्तीत येईल, यावर माझा फारसा विश्वास नव्हता. पण त्याच दिवशी सायंकाळी वस्तीत अचानक लाल दिव्याची गाडी उभी राहिली. सरांनी भटक्या वस्तीचे भीषण वास्तव पाहिले, समाजाची मागासलेली अवस्था पाहिली, मुलांची शिक्षणाची गोडी पाहिली आणि थेट विचारलं, "मी या मुलांना शिकवलं तर चालेल काय?" जिल्ह्याचा एवढा मोठा अधिकारी जेव्हा स्वतःहून वंचितांच्या पोरांना शिकवण्याची विचारणा करतो, तेव्हा ते त्या मुलांचं आणि आमच्या पालावरच्या शाळेचं मोठं भाग्यच असतं. पण मनात एक शंका होतीच; कारण कचरा गोळा करणाऱ्या, भीक मागणाऱ्या आणि भटक्या समाजाच्या या वस्तीत येणं सोपं नसतं आणि समजा कुणी आलं तरी इथे निरंतरता टिकवणं त्याहून कठीण.

आजवरचा अनुभव असा की, अनेक जण सुरुवातीला मोठ्या उत्साहाने येतात. पण इथल्या मुलांच्या सामाजिक वातावरणामुळे होणारी ओढाताण, अभ्यास न करण्याची वृत्ती आणि मुलांच्या उपस्थितीतील अनियमितता पाहून त्यांचा तो उत्साह लवकरच ओसरतो. पुन्हा पुन्हा तेच शिकवावं लागल्यामुळे शिकवणाऱ्याचा धीर सुटतो आणि हळूहळू त्यांचं येणं बंद होतं. मलाही असंच वाटलं... मुल्ला सर येतील आणि मुलांच्या या अवखळपणामुळे, इथल्या प्रतिकूल परिस्थितीमुळे चार दिवसांत निघून जातील; पण मुल्ला सर वेगळ्या मातीचे निघाले.

ते रोजच नियमित शाळेवर येऊ लागले. शाळेवर आल्यावर सरांची नजर केवळ पुस्तकावर नसायची, तर ती मुलांच्या प्रक्रियेवर आणि त्यांच्या प्रगतीवर असायची. पालावरच्या शाळेत आपण शासनाची कुठलीही मदत न घेता परिषदेमार्फत समाज जागृती करून समाजातील दानशूर व्यक्तींमार्फत आलेल्या मदतीमुळे मुलांना सर्व शैक्षणिक गरजेच्या वस्तू पुरवत होतोच; पण त्या पलीकडे जाऊन काही लहान-लहान गोष्टींची उणीव सरांच्या चाणाक्ष नजरेला जाणवली की, कुठलाही बडेजाव न मिरवता, जणू घरच्याच एखाद्या जबाबदार माणसाने आपल्या लेकरांच्या कौतुकासाठी काहीतरी मायेने आणावे, अगदी त्याच हक्काने आणि आपुलकीने दुसऱ्याच दिवशी त्या वस्तू सरांच्या हातात असायच्या.

अशाच एका वनभोजनाच्या वेळी सरांचे एक वेगळेच रूप पाहायला मिळाले. तिथे ते अधिकारी नव्हते, तर मुलांमध्ये मुलगा बनलेले दोस्त होते. तळ्यात-मळ्यात आणि वाघ-बकरीसारख्या खेळांत ते मुलांसोबत सामील झाले आणि मुलांचा नेता ओळखा या खेळात तर ते स्वतः मुलांचे नेता बनले. त्यांच्या लाल दिव्याच्या गाडीमुळे वस्तीत चलबिचल होते, हे लक्षात आल्यावर त्यांनी शासकीय गाडी बाजूला ठेवली आणि स्वतः ई-स्कूटरवरून वस्तीत येऊ लागले. न चुकता, अगदी घरच्या माणसासारखं! वस्तीतल्या खांबांवर लाईट नाहीत त्यामुळे रात्री वस्ती पूर्ण अंधारात असते, हे पाहिल्यावर कोणालाही आदेश न देता, स्वतः पुढाकार घेऊन १०-१२ खांबांवर लाईट लावून घेतले. मधल्या काळात हायकोर्टातील वरिष्ठ प्रशासकीय न्यायाधीश ए. एस किल्लोर व एम. डब्ल्यू. चांदवानी गोंदिया येथे आले होते. त्या कार्यक्रमाला विधि व न्याय विभागामार्फत मुले आमंत्रित होती. अर्थातच इतक्या मोठ्या कार्यक्रमाला सर स्टेजवर अध्यक्ष म्हणून होते. स्टेजवरूनही आपल्या मुलांची उपस्थिती त्या कार्यक्रमाला लक्षात आल्यानंतर सरांनी आवर्जून सर्व मुलांना स्टेजवर बोलावले. हायकोर्टाच्या दोन्ही न्यायाधीशांना सर्व मुलांचा परिचय करून दिला. भाविक परिषदेच्या पालावरच्या शाळेच्या नावीन्यपूर्ण प्रकल्पाची सर्व माहिती दिली. माझी ओळख जवळ बोलावून भटक्यांसाठी तळमळीने काम करणारा कार्यकर्ता म्हणून सर्वांशी करून दिली. हा सन्मान माझ्या एकट्याचा नव्हता; आमच्या सर्व वंचित समाजाचा होता. अगदी परवाच तर ते वर्गात बोडोमासचे नियम शिकवत होते. सर फळ्यावर लिहीत असताना एखादं पोरगं खाली बसल्या बसल्या त्यांची पँट ओढून हक्काने म्हणायचं, "सर, बाजूला व्हा ना, फळा दिसत नाहीये!" अगदी जिल्ह्याचा सर्वोच्च अधिकारी मुलांच्या त्या ओढाओढीतही हसून बाजूला व्हायचा. आज त्या निरागस मुलांना कदाचित समजणार नाही की त्यांचा शिक्षक किती मोठा अधिकारी होता, पण त्यांना हे नक्कीच आठवेल की एक माणूस होता, जो त्यांच्यासाठी चिखल तुडवत यायचा. मुल्ला सरांची बदली ही केवळ एका सनदी अधिकाऱ्याची बदली नाही, तर पालावरच्या अंधाराशी दोन हात करणाऱ्या एका ध्येयवेड्या सैनिकाची ही रजा आहे. त्यांनी मुलांना केवळ गणित शिकवलं नाही, तर सन्मानाने जगण्याची उमेद दिली.

"ऐकताय ना?" फोनवर सरांचा आवाज पुन्हा आला आणि माझी विचारशृंखला तुटली. डोळ्यांतून टचकन पाणी आलं. केवळ 'बाय सर' म्हणालो आणि जड अंतःकरणाने फोन कट केला. बाहेर रस्त्यावर गाड्यांचा आवाज सुरू होता; माझ्या मनात मात्र एकच हळवा प्रश्न रुंजी घालत होता... उद्यापासून पालावरची ती मुलं कुणाची पँट ओढून हक्काने सांगतील... 'सर, फळा दिसत नाहीये, थोडे बाजूला व्हा ना?'

प्रशासकीय खुर्चीवर बसणारा प्रत्येक माणूस अधिकारी असतोच, पण नियमांच्या पलीकडे जाऊन माणुसकीची ऊब देणारा मिनाज मुल्ला सरांसारखा 'वाली' होणे ऋषी होणं प्रत्येकाला जमेलच असे नाही.

**प्रशांत सुरेश बोरसे**
पालावरची शाळा, भटके विमुक्त
कल्याणकारी परिषद, विदर्भ प्रांत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### अक्कलकोट येथील हिंदू धर्म-संस्कार शिबिरास आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची सदिच्छा भेट

**सोलापूर, दि. ६ जून-**

हिंदु जनजागृती समिती यांच्या वतीने अक्कलकोट येथील प्रियदर्शनी सभागृहात ४ ते ६ जून या कालावधीत आयोजित तीन दिवसीय निवासी 'हिंदू धर्म-संस्कार शिबिरास अक्कलकोट मतदारसंघाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी युवक-युवतींशी संवाद साधताना त्यांनी धर्मरक्षण ही प्रत्येक हिंदूची जबाबदारी असल्याचे सांगत युवकांनी राष्ट्र आणि धर्मासाठी आवश्यक ज्ञान, संस्कार व मूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. सोलापूर, लातूर, बीड आणि धाराशिव जिल्ह्यांतील १५० हून अधिक युवक-युवती या शिबिरात सहभागी झाले होते. शिबिरात धर्मशिक्षण, भारतीय संस्कृती, राष्ट्रनिष्ठा, व्यक्तिमत्त्व विकास, स्वसंरक्षण प्रशिक्षण तसेच समर्थ रामदास स्वामी आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी आमदार कल्याणशेट्टी यांना विविध विषयांवरील निवेदनेही सादर करण्यात आली. शिवराजेश्वर मंदिराला मिळणाऱ्या अल्प अनुदानाचा प्रश्न, हिंदू धार्मिक वारसा स्थळांचे संवर्धन तसेच विनायक दामोदर सावरकर स्मृतीस्थळांच्या जतनाची मागणी करण्यात आली.


### कोल्ड्रिंक्स गोडाऊन चोरीचा अवघ्या चार दिवसांत छडा; दोन आरोपी जेरबंद

**बार्शी, दि. ६ जून-**

बार्शी शहरातील एका कोल्ड्रिंक्स गोडाऊनमधून चोरीस गेलेल्या स्टिंग कोल्ड्रिंक्सच्या बॉक्स प्रकरणाचा बार्शी शहर पोलिसांनी अवघ्या चार दिवसांत यशस्वी छडा लावत दोन आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीस गेलेल्या मालापैकी ६१ स्टिंग कोल्ड्रिंक्सचे बॉक्स जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. फिर्यादी संदीप राजेश जगताप (रा. सुभाष नगर, बार्शी) यांच्या गोडाऊनमधून दिनांक ३१ मे २०२६ रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी ८२ स्टिंग कोल्ड्रिंक्सचे बॉक्स चोरी करून नेले होते. या घटनेप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात कलम ३०३(२) व ३३४(१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपासाची सूत्रे वेगाने फिरवले. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक अभय माकणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण तसेच गुप्त माहितीच्या आधारे तपास केला. सखोल तपासादरम्यान पोलिसांनी अनिकेत राजू केंगार आणि किरण मारुती पोठे (दोघेही रा. पंकजनगर, बार्शी) यांना संशयित म्हणून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता त्यांनी चोरीची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेल्या मालापैकी ६१ स्टिंग कोल्ड्रिंक्सचे बॉक्स जप्त केले. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना कृष्णा आणि पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक अभय माकणे, पोहेकॉ अमोल माने, पोहेकॉ साठे, पोलीस कॉन्स्टेबल बहिरे, मुठाळ, उदार, पवार, नितनात, जाधव, देशमुख, राऊत, शेख, उघडे, जाधवर, अकुलवार, सोमवाड, भांगे आणि माळी यांनी परिश्रम घेतले. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल बहिरे करीत आहेत.

# वादळी वाऱ्यामुळे माळशिरसमध्ये फळबागा अन् घरांचे नुकसान

## पाहणी करून अहवाल सादर करण्याच्या तहसीलदार सुरेश शेजूळ यांच्या सूचना



**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ६ जून-**

दि ५ जून रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास झालेल्या वादळी वाऱ्यामुळे महाळुंग, बाभूळगाव, मेडद, माळिशरस, बागेचीवाडी, संगम, अकलूज, खंडाळी, माळेवाडी, लोंढे, मोहीतेवाडी यांसह अनेक गावातील शेतकऱ्याचे फळबागा, शेतीपीक, घरे यांचे नुकसान झाले आहे तर कण्हेर, रेडे, भांब या भागात समाधानकारक पाऊस झाला असून तलाठी मंडळ अधिकारी यांनी कृषी सहाय्यक यांच्यासह नुकसानीची पाहणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना तहसीलदार सुरेश शेजूळ यांनी दिल्या आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतरच नुकसानीचा अंदाज येणार असून नुकसान झालेल्या गावात पाहणी सुरु असल्याची माहिती महसूल विभागाचे गणेश खैरे यांनी दिली.

तालुक्याच्या पश्चिम भागातील कण्हेर, रेडे, भांब, गिरवी या भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला आहे. नाले, ओढ्यांना थोड्या प्रमाणात पाणी आले आहे.

तालुक्यातील पूर्व भागात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी केळी पिक केले आहे. या वादळी वाऱ्यामुळे केळीची झाडे उन्मळून पडली आहेत. काही केळी पिकाची वेण झाली आहे त्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचबरोबर शेतीपिकाचे नुकसान झाले आहे. चारापिके जमीनदोस्त झाली आहेत. झाडे उन्मळून पडली आहेत.

**केळी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान**

माझे तीन एकर क्षेत्रात केळीचे पिक असून सात महिने झाले आहेत .केळींची वेण सुरु झाली या ३० टक्के झाडे उन्मळून पडली आहेत. ५० टक्के झाडे वाकली आहे. मोठ्या कष्टाने जोपासलेले पिकाचे नुकसान झाले असून शासनाने नुकसान भरपाई द्यावी.

- **वैशाली पाटील,**
शेतकरी, माळिशरस

**विज वितरण यंत्रणेचे नुकसान**

मोठ्या प्रमाणात झालेल्या वादळामुळे अनेक झाडे तारावर पडली आहेत. काही झाडांच्या फांद्या तारावर पडल्या आहेत त्यामुळे काही ठिकाणचे खांब मोडून पडले आहेत. लाईट पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर सरू असून काही भागात रात्रीच विज पुरवठा सुरु केला आहे.

- **शीतल डोळे,**
शाखा अभियंता माळिशरस

## जय शिवराय प्रतिष्ठानतर्फे शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त जलाभिषेक, मिठाई वाटप

**बारकुल कुटुंबाला १ लाख ३७ हजारांची मदत**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ६ जून-**

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त सालाबादप्रमाणे या १५ व्या वर्षीदेखील जय शिवराय प्रतिष्ठानकडून अठरा पगड जाती व बारा बलुतेदार मावळ्यांकडून पवित्र नद्यांच्या पाण्यानी जलाभिषेक व मिठाई वाटप करण्यात आली.

कार्यक्रमासाठी माजी आमदार राजेंद्र राऊत, पंचायत समिती सभापती मिनाक्षी रोंगे, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, नगरसेवक सर्वश्री. विजय राऊत, संदेश काकडे, दीपक राऊत, मदन गव्हाणे, मराठा सेवा संघाचे संतोष मोळवणे, प्रा. किरण गाढवे, रावसाहेब यादव, कल्याण घळके, महेश देशमुख, किरण कोकाटे, छत्रपती ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष अजय पाटील, वसंत हवालदार, शंकर वाघमारे, शैलजा गिते, शीतल मांजरे पाटील, मराठा



सेवा संघाचे सर्व पदाधिकारी, शिवप्रेमी संघटनेचे पदाधिकारी, प्रत्येक समाज घटकातील प्रतिनिधी, पत्रकार, पोलीस बांधव, महिला, युवक, इतर मान्यवरांच्या उपस्थितीत जलाभिषेक करुन पुष्पहार घालून जय शिवराय प्रतिष्ठानकडून छत्रपती शिवरायांना मानवंदना देण्यात आली. तसेच मिठाई वाटप करण्यात आली. याचबरोबर सामाजिक क्षेत्रामध्ये व जय शिवराय प्रतिष्ठानमध्ये कार्य करणाऱ्या बाबासाहेब बारकुल यांचे निधन झाल्याने त्यांच्या परिवारावर दुःखातून सावरण्यासाठी १,३७,००० रुपये एक वर्षाच्या उदरनिर्वाहासाठी कर्तव्य मदत निधी देण्यात आला.



यावेळी अठरा पगड जाती आणि बारा बलुतेदार समाजातील अनेक समाजबांधव उपस्थित होते, यावेळी माजी आमदार राऊत यांनी मनोगत व्यक्त केले. छत्रपती शिवरायांचा विचार समाजात रुजला पाहिजे आणि १८ पगड जाती, १२ बलुतेदार यांना एकत्र करुन ज्या पद्धतीने जय शिवराय प्रतिष्ठान काम करत आहे, त्याच पद्धतीने समाजातील सर्व समाज बांधवांनी समाज हिताच्या प्रत्येक गोष्टीमध्ये एकत्र आले पाहिजे, अशी भावना व्यक्त करत जय शिवराय प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमासाठी कार्याध्यक्ष राहुल वडेकर, उपाध्यक्ष सुमित नागटिळक, सचिव गणेश वाणी, सहसचिव किरण नान्नजकर, कोषाध्यक्ष विनायक हांडे, संचालक संकेत वाणी, कार्यकारिणी उपाध्यक्ष सुहास गुंड, सचिव विनीत नागोडे व जय शिवराय प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## मंदिर हिताच्या लढ्याला मोठे यश

**देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप २०२६ कायदा स्थगित**

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. ६ जून-**

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप २०२६' हा प्रस्तावित कायदा स्थगित करण्याची घोषणा केल्याने मंदिर विश्वस्त व हिंदुत्ववादी संघटनांच्या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. या निर्णयाचे स्वागत करत महाराष्ट्र मंदिर महासंघचे संघटक सुनील घनवट यांनी हा विजय राज्यातील मंदिर विश्वस्त, विश्व हिंदु परिषद, अष्टविनायक मंदिर समिती आणि विविध हिंदुत्ववादी संघटनांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित असल्याचे सांगितले.

घनवट यांनी सांगितले की, देवस्थानच्या इनाम जमिनी मंदिरांना परत देणे, अतिक्रमणे हटविण्यासाठी शासनाने पुढाकार घेणे, न्यायालयीन लढ्यासाठी तज्ज्ञ वकिलांचा सल्ला उपलब्ध करून देणे तसेच जुन्या वहिवाटीमुळे मंदिरांचे नुकसान झाल्यास समान मूल्याचा भूखंड देण्याची तरतूद करणे हे निर्णय मंदिर हिताचे आहेत. तसेच अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन होणाऱ्या १५ सदस्यीय समितीत देवस्थान प्रतिनिधींना स्थान देण्याचेही स्वागत करण्यात आले. यासोबतच मंदिरांचा निधी केवळ धर्मकार्य, जीर्णोद्धार आणि धार्मिक गरजांसाठी वापरणे, लहान मंदिरांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करणे तसेच गुरव, पुजारी व सेवेकऱ्यांना मासिक निर्वाह निधी देण्याची मागणीही महासंघाने केली आहे.

**जाहीर नोटीस**

माढा तालुका व विशेषतः कुर्डूवाडी येथील तमाम लोकांना आमचे अशिल, रा. कुर्डूवाडी यांनी दिलेल्या कागदपत्रावरून सांगितलेवरून जाहीर नोटीस देण्यात येते की, डी. सोलापूर सब डी व ता. माढा पैकी मौजे कुर्डूवाडी येथील म्यु हद्दीतील नगरभूमापन क्र. ४०० अ क्षेत्र २८४ चौ.मी यासी चतुःसिमा, पूर्वेला- श्रीपाळ धोका यांची घरजागा, दक्षिण- जगन्नाथ ढवळसकर यांची घरजागा, पश्चिम- मधुकर भोसले यांची जागा व पंजाब तालीम, उत्तर- रस्ता हि मिळकत मयत महेंद्रकुमार भलाणी मयत माधुरी महेंद्रकुमार भलाणी, मयत मयुर भलाणी यांचे वाली वारस व मनिष महेंद्रकुमार भलाणी यांचे मालकी कब्जे वहिवाटीची मिळकत होती व आहे. त्याबाबत मे. दिवाणी न्यायालय क स्तर माढा यांनी हुकुमचंद व विक्रांत भलाणी यांनी केलेला रे.मु.नं ९९२/२०१९ रद्द करून महेंद्रकुमार भलाणी यांचे वारसांचाच मालकी व कब्जा असल्याचे स्पष्ट केले आहे. सदर मिळकत हि आमचे अशिशल मयत महेंद्रकुमार भलाणी, मयत माधुरी भलाणी व मयत मयूर भलाणी यांचे वाली वारसकडून व मनिष महेंद्रकुमार भलाणी यांचे कडून खरेदी घेणार असून, सदर मिळकत निर्वेध निजोखमी असल्याचे खात्री दिल्याने सदर मिळकत आमचे अशिल हे खरेदी घेणार आहेत.

तरी वर नमूद मिळकती संदर्भात दावा प्रलंबित असल्यास, कुणाचे गहाण, दान, लीन, खरेदीखत, साठेखत, लिलाव, बक्षीसपत्र, पोटगी इ. तत्सम पद्धतीचे दस्तऐवजे वर नमूद मिळकती मध्ये हक्क अधिकार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाचे आत कुणाची काही हरकत असल्यास तसे लेखी कळवावे. विहित मुदतीनंतर आमचे अशील सदर मिळकत खरेदी घेतील. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून हि खरेदीपूर्व सावधानतेची जाहीर नोटीस दिली.

ता. ६/६/२६

सही/-
आमचे अशिल
**दिलीप प्रभूआप्पा लामगुंडे**
**चैतन्य नंदकुमार चिवटे तर्फे ॲड.**
**ॲड. रुपाली डी तारके**
बी.एससी.एल.एल.एम.
ॲडव्होकेट
मो. ८६६९१३३१३२ बार्शी

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम जनतेस विशेषतः तालुका बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

दि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील जमीन जुना गट नं. ८५९/१ याचा नविन गट नं. ८६५/१ याचे क्षेत्र ०१ हे. ९२ आर, यापैकी उत्तर बाजूचे जमिनीत पडलेल्या प्लॉट पैकी प्लॉट नं. ६ पैकी उत्तर बाजूकडील ०१ आर, याचे क्षेत्र चौ.फुट १०८०, आकार रु. ००-०२ पैसे, याची लांबी पूर्व पश्चिम- ४० फुट, याचे मी. १२.१९, दक्षिण उत्तर रुंदी २७ फुट, याचे मी. ८.२३, सदरचा प्लॉट खुला आहे. याची वागणूक व पाणी पूर्व बाजूने आहे. यासी चतुःसिमा पूर्वेस- २० फुट रुंदीचा जाणेयेण्यासाठी सोडलेला रस्ता, दक्षिणेस- सदर प्लॉट नंबर पैकी राहिलेला भाग, पश्चिमेस- मस्तुद यांची जमीन, व उत्तरेस- प्लॉट नं. ५ येणेप्रमाणे मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह, व वहिवाटीच्या हक्कासह.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही सौ. सुषमा शिवाजी काशीद, रा. पाटील प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे स्वसंपादीत खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल असून त्यांनी सदर मिळकत त्यांचे कौटुंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायमखुश खरेदी देण्याचा ठराव करून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत हि निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध निजोखमी खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे.

याही उपर सदर मिळतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, पोटगी, चोळीबांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही स्वरूपाचे कायदेशीर हक्कअधिकार असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रांनिशी व पुराव्यासह खालील नमूद पत्त्यावर हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसात लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमूद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आलेस आमचे पक्षकार हे सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याचे प्रामाणिकपणे गृहीत धरून खरेदी देणार यांचे बरोबर ठरलेल्या अटी व शर्ती प्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसवगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

ता. ०६/०६/२०२६

सही/-
**ॲड गणेश मोहन फावडे**
बी.ए. एल.एल.बी
मो.नं. ९५४५१७०४७४
**ॲड. हर्षवर्धन हरिश्चंद्र बोधले**
बी.ए. एल.एल.बी.
मो.नं. ८४५९४७८३३१
अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर
खरेदी घेणार तर्फे ॲडव्होकेट्स



## योगी आदित्यनाथ यांच्या वाढदिवसानिमित्त 'हिंदू स्वाभिमान दिवस' साजरा

**विश्व हिंदू महासंघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गौरव सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

हिंदू समाजाचे संघटन, संस्कार आणि राष्ट्रनिर्माणाच्या कार्याला समर्पित विश्व हिंदू महासंघ (भारत) महाराष्ट्र प्रदेश, सोलापूर जिल्हा शहर कार्यकारणी यांच्या वतीने उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री महंत योगी आदित्यनाथ यांच्या वाढदिवसानिमित्त 'हिंदू स्वाभिमान दिवस' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सोलापूर शहरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक सभागृह येथे पार पडला.

कार्यक्रमात हिंदुत्व, राष्ट्रप्रेम, संस्कार आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये हिंदू संस्कृतीचा अभिमान, राष्ट्रनिष्ठा आणि समाजसेवेची प्रेरणा जागृत करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

कार्यक्रमाला तुषार बोहरा - राष्ट्रीय मंत्री व महाराष्ट्र प्रदेश प्रभारी, राहुल बोहरा - युवा प्रकोष्ठ राष्ट्रीय अध्यक्ष व प्रदेश सहप्रभारी, नंदकिशोर झंवर - प्रदेशाध्यक्ष, सतीश आनंदकर - प्रदेश संघटन महामंत्री, महेश जिंदम - प्रदेश कार्यकारणी सदस्य सुयश खानापुरे - जिल्हाध्यक्ष, कपिल कोळी - जिल्हा संघटन महामंत्री, सागर तांबोळकर - शहर संघटन महामंत्री आदी हजर होते. डॉ. सूर्यप्रकाश कोठे, श्रीनिवास संगा (समाजसेवक), गौरीशंकर वर्मा हे विशेष निमंत्रित होते.

प्रमुख वक्ते - प्रा. डॉ. शिवरत्न शेटे यांनी यश हे अंतिम नसते आणि अपयश हे कायमस्वरूपी नसते. हिंदू संस्कृती आपल्याला संकटांशी लढण्याची शक्ती देते. त्यामुळे जीवनात कितीही अडचणी आल्या तरी ध्येयापासून विचलित न होता पुढे जात राहणे हेच खरे यश असल्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद आणि राष्ट्रासाठी जीवन समर्पित करणाऱ्या महापुरुषांच्या विचारांचे स्मरण करून राष्ट्रकार्यात योगदान देण्याचे आवाहन केले. राहुल बोहरा यांनी योगी आदित्यनाथ महाराज हे आजच्या काळातील निर्भय हिंदुत्व, सुशासन आणि राष्ट्रहिताचे प्रतीक आहेत. त्यांचे कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. सतीश आनंदकर यांनी आज गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान म्हणजे उद्याच्या राष्ट्रनिर्मात्यांचा गौरव आहे. ज्ञान, चारित्र्य आणि राष्ट्रनिष्ठा या त्रिसूत्रीवर उभा राहणारा युवकच भारताला विश्वगुरू बनवू शकतो, असे सांगितले. कार्यक्रमास सोलापूर शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांतील गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते व हिंदुत्वनिष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सभागृह राष्ट्रभक्ती, हिंदू स्वाभिमान आणि संस्कारमय वातावरणाने भारावून गेले होते.

### सुलेरजवळगेत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

जागतिक दृष्टीदिनानिमित्त अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगे येथे बुधवारी दि. १० जून रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. यावेळी शिबिराबरोबरच अन्यही सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. अवयव दान फॉर्म भरणे, विविध योजना आरोग्य विषयी मार्गदर्शन, बॅक बचत खाते धारकासाठी विमा योजना गुणवंत विद्यार्थ्यांचे सन्मान आदींचा त्यात समावेश आहे. यासाठी ग्रामस्थ, सरपंच, पदाधिकारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, दानशूर व्यक्ती, समाज सेवक यांच्या सहकार्याने हे उपक्रम राबवत आहेत. जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन ग्राम पंचायतीतर्फे केले आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**नवीन पिट लाईनसाठी इलेक्ट्रिकल काम (विद्युत काम)**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंटसंकेतस्थळावर www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाईन ई-निविदा मागवित आहेत. निविदा क्रमांक SUR/L/T2025/37R1 कामाचे नाव: सोलापूर विभागांतर्गत कलबुर्गी स्टेशनवर नवीन पिट लाईनच्या तरतुदीच्या अनुषंगाने इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिसेसच्या भागाचे काम (पुन्हा आमंत्रित). अंदाजित खर्च: १,८६,२३,७०८.३० बयाणा रक्कम : ३,७२,५००/- काम पूर्ण करण्याचा कालावधी: ०९ महिने ऑफरची वैधता: ६० दिवस संकेतस्थळावर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: २९.०६.२०२६ रोजी १५:०० वाजता. बयाणा रकमेचा खर्च www.ireps.gov.in या संकेतस्थळावर ई-पेमेंटद्वारे (-) भरणे आवश्यक आहे.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य)**
**मध्य रेल्वे, सोलापूर**
DE/Sur-31

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

## राजू आलोरे यांचा कट्टर समर्थकांसह शिंदे गटात प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

भाजपचे कार्यकर्ते राजू आलोरे यांनी शुक्रवारी शिवसेना (एकनाथ शिंदे गट) मध्ये प्रवेश केला. सोलापूर शहरातील हॉटेल ऐश्वर्या येथे झालेल्या कार्यक्रमात संपर्कप्रमुख तथा खासदार धैर्यशील माने आणि खा. ज्योती वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला.

प्रवेश सोहळयास जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे, मनीष काळजे, माजी आ. सिद्धाराम म्हेत्रे, रमेश बारस्कर, निवृत्त पोलीस अधिकारी नागनाथ पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आलोरे यांचे शिवसेनेत स्वागत करत त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव केला. नागनाथ पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक ५ मधील शेकडो कार्यकर्त्यांनीही शिवसेना (एकनाथ शिंदे गट) मध्ये प्रवेश केला.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, डिा व सब डिा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील मौजे मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं. ३३७, यांसी नवीन सर्व्हे नं. ९९/१बी यापैकी "रेणुका नगरी शिक्षक सोसायटी" या नावाने ओळखले जाणाऱ्या नगरातील प्लॉट नं. ७२४ (सो.म.पा. मिळकत क्रमांक ६२८६१५) यांसी एकूण क्षेत्र १०२.३९ चौ. मी. असते असून सदर जागेत लिव्हींग, किचन, बेडरुम, संडास, असे एकूण बांधकाम ४८.८३ चौ.मी. क्षेत्रात आर.सी.सी. स्वरुपाचे आहे. यांसी चतुःसिमा पुर्वेस : प्लॉट नं. ७२५, पश्चिमेस : प्लॉट नं. ७२३, दक्षिणेस : प्लॉट नं. ७०४, उत्तरेस : अंतर्गत रस्ता. येणेप्रमाणे वर नमुद केलेली मिळकत व त्यातील तदंगभुत वस्तुसह. ही मिळकत सौ. शितल मिलींद महिमाने यांचे मालकी व कब्जे वहिवाटीचे आहे. त्यांनी सदरील मिळकत आमचे अशिल श्री. दिपक शिवशरण हडपद यांना विक्री करण्याचे ठरवुन त्यांचे कडून इसारापोटी रक्कम स्विकारुन इसारा पावती लिहून दिलेले आहे. व तसेच सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲण्ड लायसेन्स, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती, या व इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचे बोजा, हक्क व हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीसंबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत आम्हांस खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी वैध हरकती नोंदवावीत. मुदतीत कोणाचीही कसलीही तक्रार व हरकत न आल्यास सदरची मिळकत ही संपुर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. ०६/०६/२०२६.

सही/-
**ॲड. अमोल कल्याणी कोटीवाले**
६०, शांती नगर, मार्केट यार्ड जवळ, सोलापूर
मो.नं. ९८९०९१०९६०,
अशिला तर्फे ॲडव्होकेट

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले प्रज्ञानंद, हॉकी संघाचे अभिनंदन

**नवी दिल्ली** : प्रतिष्ठेची नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू ठरलेल्या भारतीय



ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केले. जागतिक स्तरावरील त्याच्या सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीचे हे यश म्हणजे एक प्रतिबिंब असल्याचे त्यांनी म्हटले आहे. हा खरोखरच एक अविश्वसनीय टप्पा आहे, जो त्याच्या सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीला अधोरेखित करतो. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रज्ञानंदचे अभिनंदन व त्याच्या पुढील वाटचालीस माझ्या शुभेच्छा! असे मोदींनी एक्सवर लिहिले. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी भारतीय १८ वर्षांखालील पुरुष हॉकी संघाचे आशिया चषक स्पर्धेचे विजेतेपद पटकावल्याबद्दल अभिनंदन केले. त्यांनी या कामगिरीचे वर्णन 'अत्यंत शानदार यश' असे केले आणि संपूर्ण स्पर्धेत संघाचे उत्कृष्ट सांघिक खेळाचे कौतुक केले.

### कोरियाला नमवून भारतीय महिलांनी मिळविले कांस्यपदक

**काकामिगाहारा** : येथे शनिवारी झालेल्या १८ वर्षांखालील महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेत कांस्यपदकाच्या सामन्यात भारतीय महिला हॉकी संघाने कोरियावर ३-० असा दणदणीत विजय मिळवत कांस्यपदक पटकावले. संदीपा कुमारी (२), कर्णधार स्वीटी कुजूर (१६) आणि नौशीन नाझने (३३) गोल करत भारताच्या मोहिमेची सांगता शानदाररीत्या पदकासह केली. उपांत्य फेरीत चीनविरुद्ध शूटआउटमध्ये झालेल्या निसटत्या पराभवानंतर पुनरागमन करण्याच्या निर्धाराने उतरलेल्या भारताने सामन्याची स्वप्नवत सुरुवात केली आणि पहिल्या दोन मिनिटांतच आघाडी घेतली. संदीप कुमारीने (२) गोलसमोर संयम राखत उत्कृष्ट फिनिशिंग केले आणि भारताला पहिली आघाडी मिळवून देत सामन्याची दिशा निश्चित केली. कर्णधार स्वीटी कुजूरने मैदानी गोल करत भारताची आघाडी दुप्पट केली आणि संघ दुसऱ्या सत्रात अधिक आत्मविश्वासाने उतरला. दोन गोलची सुरक्षित आघाडी मिळाल्यानंतर, विश्रांतीनंतरही भारताने सामन्यावरील नियंत्रण कायम राखले आणि ३३ व्या मिनिटाला आपली आघाडी आणखी वाढवली. स्पर्धेतील सर्वाधिक गोल करणारी खेळाडू नौशीन नाझने (३३) आणखी एक मैदानी गोल नोंदविला.

### इव्हेरेव्हला ग्रॅण्ड स्लॅम जेतेपदाची आशा

**पॅरिस** : कोबोलीविरुद्ध यापूर्वी तीन वेळा अंतिम फेरीत धडक मारूनही अ‍ॅलेक्झांडर इव्हेरेव्हला अद्याप एकदाही ग्रॅण्ड स्लॅम जेतेपद जिंकता आलेले नाही. रविवारचा फ्रेंच ओपन स्पर्धेतील अंतिम सामना ही त्याची चौथी ग्रॅण्ड स्लॅम अंतिम फेरी असेल. रविवारी इटलीचा अनपेक्षित दावेदार फ्लाव्हिओ कोबोली याच्याकडून या जर्मन खेळाडूच्या जिद्दीची कसोटी घेतली जाईल. रॉजर फेडरर, राफेल नदाल आणि नोव्हाक जोकोविच यांसारख्या दिग्गज खेळाडूंच्या सुवर्ण पिढीमुळे आणि अलीकडच्या काळात कार्लोस अल्काराझ व यानिक सिनर यांसारख्या युवा खेळाडूंच्या वर्चस्वामुळे इव्हेरेव्हला जेतेपदापासून दीर्घकाळ वंचित राहावे लागले आहे. आता २९ वर्षीय इव्हेरेव्हला आशा आहे की, त्याच्या कारकिर्दीतील ही चौथी ग्रँड स्लॅम अंतिम फेरी अखेर त्याच्यासाठी ऐतिहासिक विजयाची ठरेल.

### जाणीवपूर्वक फटक्यांवर मर्यादा न घालण्याचा प्रयत्न : राहुल

**मुल्लानपूर** : टी-२० क्रिकेटमधून कसोटी फॉरमॅटमध्ये प्रवेश करताना मी आपली नैसर्गिक फलंदाजीची शैली (स्ट्रोकप्ले) बदलण्याचा किंवा रोखण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक टाळला. याच मानसिकतेमुळे मला अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटीच्या पहिल्या दिवशी संयमी शतक साकारण्यास मदत झाली, असे भारताचा सलामीवीर केएल राहुल याने शतक झळकावल्यावर सांगितले.फलंदाजांसाठी अति-विचार करणे ही अनेकदा एक सापळा ठरू शकते. कधीकधी तुम्ही बसून गोष्टींचे अति-विश्लेषण करता आणि टी-२० क्रिकेटपेक्षा पूर्णपणे वेगळ्या पद्धतीने खेळण्याचा प्रयत्न करतो.

### मीरा आंद्रीयेव्हा फ्रेंच ओपन विजेती

**पॅरिस, ७ जून**


अंतिम सामन्यात रशियाच्या मीरा आंद्रीयेव्हाने माजा च्वालिनस्कानवर ६-३, ६-२ असा विजय नोंदवून फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. पॅरिस माझ्या हृदयात एक विशेष स्थान निर्माण करेल. गत दोन आठवड्यांत इथे खेळाडूंना प्रोत्साहन देऊन आणि त्यांचा उत्साह वाढवून सहकार्य केल्याबद्दल मी प्रेक्षकांचे आभार मानते, असे फ्रेंच ओपन विजेती मीरा आंद्रीयेव्हा म्हणाली. तसेच, मी स्वतःचेही आभार मानू इच्छिते.

# भारताचे वर्चस्व; राहुल, गिलची शतके

**मुल्लानपूर, ६ जून**

येथे शनिवारपासून प्रारंभ झालेल्या अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी क्रिकेट सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पहिल्या दिवशी वर्चस्व गाजविले. कर्णधार शुभमन गिल (नाबाद १०३) व केएल राहुलची (१००) दमदार शतके तसेच बी. साई सुदर्शन (८१) व ऋषभ पंतच्या (नाबाद ५०) अर्धशतकांच्या बळावर भारताने दिवस अखेर पहिल्या डावात ३ बाद ३६८ धावांचा डोंगर रचला. भारताच्या डावाची सुरुवात थोडी निराशाजनक झाली. सलामीवीर यशस्वी जयस्वाल लवकरच बाद झाला. मोहम्मद सलीमच्या गोलंदाजीत तो अफसर झाझईकडून झेलबाद झाला. जयस्वालने ३२ चेंडूंत २४ धावा केल्या आणि केएल राहुलसोबत ४१ धावांची सलामी





भागीदारी केली. मात्र त्यानंतर केएल राहुलने बी. साई सुदर्शनच्या साथीने अफगाणिस्तानच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत भारताची धावसंख्या वाढविली. साई सुदर्शनने राहुलसोबत दुसऱ्या गड्यासाठी १३९ धावांची भागीदारी केली, याच वेळी मोहम्मद सलीमने सुदर्शनच्या रुपाने आपला दुसरा बळी मिळविला. साई सुदर्शनने १०४ चेंडूंत १३ चौकारांच्या मदतीने ८१ धावांची भर घातली. पुढे राहुलने शानदार फलंदाजी करणाऱ्या शुभमन गिलच्या साथीने आपले शतक साजरे केले. ६१ व्या षटकात राहुलने पॅडच्या दिशेने आलेल्या चेंडूवर फ्लिक करत आपले जिगरबाज शतक पूर्ण केले. कसोटी क्रिकेटमधील हे त्याचे १२ वे शतक ठरले. १०० धावांवर खेळत असतानाच केएल राहुलला झियाऊर रहमानने रहमनुल्लाह गुरबाजकडून झेलबाद केले. केएल राहुलने १६५ चेंडूंचा सामना करीत ११ चौकारांसह १०० धावा केल्या. राहुलने गिलसोबत तिसऱ्या गड्यासाठी ६७ धावांची भागीदारी करून संघाला २४७ धावांचा टप्पा गाठून दिला. पुढे गिल व ऋषभ पंत ही जोडी खेळपट्टीवर चांगलीच जमली. या दरम्यानच्या काळात अफगाणिस्तानच्या गोलंदाजीचा मारा काहीसा थकला होता. त्याचा फायदा उचलत गिल व पंतने चौफेर फटकेबाजी केली आणि संघाची धावसंख्या आणखी वाढविली. यादरम्यान गिलने १३८ चेंडूंत आपले शतक साजरे केले. दोघांनी दिवस अखेरपर्यंत नाबाद खेळी करीत भारताला ८५ षटकांत ३ बाद ३६८ धावांचा डोंगर रचून दिला. खेळ थांबला तेव्हा गिल नाबाद १०३ धावांवर, तर पंत नाबाद ५० धावांवर खेळत होते. गिलने १४३ चेंडूंत ११ चौकार व एका षट्काराच्या मदतीने नाबाद १०३ धावा केल्या. गिलचे हे अफगाणिस्तानविरुद्धचे पहिले व कारकीर्दीतील ११ वे कसोटी शतक ठरले, तर पंतने ७० चेंडूंत २ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद ५० धावांची खेळी केली. अफगाणिस्तानकडून वेगवान गोलंदाज मोहम्मद सलीमला ६७ धावांत २ बळी, तर झियाऊर रहमानला ६१ धावांत एक बळी टिपण्यात यश मिळाले.



सोलापूर : महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सहकार्यवाह बाळ तोरसकर यांनी दैनिक तरुण भारतच्या कार्यालयात सदिच्छा भेट दिली. त्यांचे स्वागत मुख्य संपादक प्रशांत माने यांनी केले. यावेळी वृत्तसंपादक अजितकुमार संगवे व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे उपस्थित होते.

# पत्रकारांच्या लेखणीतील स्पर्धा आता थेट क्रिकेटच्या मैदानावर : खा. धैर्यशील माने

### 'लोकनाथ' चषक ट्रॉफीचे दिमाखात अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

राजकारणात स्पर्धा असते, मात्र ती नेहमीच खिलाडूवृत्तीने होत नाही. पत्रकार मात्र लेखणीतील स्पर्धेबरोबरच क्रिकेटच्या मैदानावरही खेळाडूवृत्तीचे दर्शन घडवतील आणि 'लोकनाथ' मीडिया चषक २०२६ ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडेल, असा विश्वास शिवसेनेचे संपर्कप्रमुख तथा खासदार धैर्यशील माने यांनी व्यक्त केला.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवालय फाउंडेशनचे अध्यक्ष मनिष काळजे यांच्या सहकार्याने पत्रकार बांधवांसाठी १२, १३ व १४ जून रोजी



रेल्वे मैदान, सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'लोकनाथ' मीडिया चषक २०२६ स्पर्धेच्या ट्रॉफीचे अनावरण शनिवारी सकाळी सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात उत्साहात पार पडले. यावेळी खासदार माने बोलत होते. यावेळी राज्यसभेच्या खासदार प्रा. डॉ.ज्योती वाघमारे, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, सेवालय फाउंडेशनचे प्रमुख मनिष काळजे, ज्येष्ठ नेते साईनाथ अभंगराव, नगरसेवक प्रियदर्शन साठे, ज्ञानेश्वर सपाटे, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, डिजिटल मीडिया असोसिएशनचे विजयकुमार बाबर, संघाचे उपाध्यक्ष अफताब शेख आदी उपस्थित होते. या स्पर्धेत लोकमत, संचार, दिव्य मराठी, सकाळ, तरुण भारत संवाद, डिजिटल मीडिया, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, राज्य मराठी पत्रकार संघ आणि मेट्रो सोलापूर या संघांनी सहभाग नोंदविला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आप्पासाहेब पाटील यांनी केले.

# राज्य डायव्हिंग स्पर्धेत कनक शंकू हिची ३ पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

येथील मार्कंडेय जलतरण तलाव येथे झालेल्या राज्य डायव्हिंग स्पर्धेत कनक शंकू हिने २ सुवर्ण व १ रौप्य अशी ३ पदकांची कमाई केली आहे. ज्ञान प्रबोधिनी मध्ये शिकणाऱ्या कनक हिने १४ वर्षाखालील गटात हायबोर्डमध्ये रौप्य तर एक व तीन मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग मध्ये सुवर्णपदक पटकावले. तिला मनीष भावसार यांचे मार्गदर्शन लाभले.



# मॉडेल क्रिकेट अ‍ॅकॅडमी उपांत्य फेरीत

### ७९ वी रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : विजापूर क्लबला हरवले अक्षय हावळे सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

रेल्वेच्या ७९व्या स्कॉट मेमोरियलच्या प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अ‍ॅकॅडमीने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात झालेल्या अटीतटीच्या उपांत्यपूर्व सामन्यात मॉडेल क्रिकेट अ‍ॅकॅडमीने विजापूर क्रिकेट क्लबचा ३ गडी राखून पराभव केला. मॉडेलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय त्यांच्या गोलंदाजांनी सार्थ ठरवला. विजापूर क्रिकेट क्लबचा संपूर्ण संघ अवघ्या ८२ धावांवर बाद झाला. विजापूरकडून सुहास मालीपाटील याने सर्वाधिक ३२ धावा केल्या. आदर्श राठोड याने १४ आणि डी. सुमित याने ११ धावांचे योगदान दिले. मॉडेल अ‍ॅकॅडमीकडून धारदार गोलंदाजी करताना अक्षय हावळे ८ धावात ३ तर यश बोरामणी याने १८ धावात २ बळी



घेतले. सुधनव मनुर, सत्यजित जाधव, स्वराज वाले आणि सुदेश राठोड यांनी प्रत्येकी १ बळी घेत विजापूरच्या डावाला खिंडार पाडले.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना मॉडेल क्रिकेट अ‍ॅकॅडमीची सुरुवातही डळमळीत झाली होती. विजापूरच्या सलीम बेपरी याने अवघ्या ५ धावात ३ बळी घेतले. तर अक्षय बिरादार, डी. सुमित, सुहास मालीपाटील व जगदीश यांनी प्रत्येकी १ बळी घेत सामन्यात मोठी रंगत निर्माण केली. परंतु, मॉडेल अ‍ॅकॅडमीच्या संदीप राठोडने संकटसमयी संयमी फलंदाजी करत नाबाद २७ धावांची खेळी केली. त्याला सुमित आईवळे (११) आणि सुदेश राठोड (नाबाद ७ ) यांनी मोलाची साथ दिली. अखेर १७ व्या षटकात मॉडेल क्रिकेट अ‍ॅकॅडमीने ७ गड्यांच्या मोबदल्यात ८६ धावा करत ३ गडी राखून सामना जिंकला.

उत्कृष्ट गोलंदाजीचे प्रदर्शन करणाऱ्या अक्षय हावळे याला 'सामनावीर' पुरस्काराने गौरवण्यात आले. सचिन गायकवाड यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी वासुदेव दोरणाल, अंबादास तोरा, सत्यजित जाधव आणि अतुल बांदेवाडीकर उपस्थित होते. या स्पर्धेतील विजेत्यांना कै. सुरेश मालप यांच्या स्मरणार्थ सुदेश मालप आणि सुनील मालप यांनी पुरस्कृत केलेली आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार आहे. सामन्यासाठी पंच म्हणून अशोक डोंबाळे व शुभम मुतुर यांनी काम पाहिले.

**आजचा उपांत्यपूर्व सामना**

**सेंट्रल रेल्वे परेल मेकॅनिक इन्स्टिट्यूट विरुद्ध श्री स्वामी समर्थ क्रिकेट क्लब.**

# सोलापूर जिल्हा सबज्युनिअर हँडबॉल संघ निवड चाचणी उद्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

छत्रपती संभाजीनगर येथे १२ ते १४ जून दरम्यान ३८व्या सबज्युनिअर हँडबॉल राज्य मुलांच्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या राज्य स्पर्धेत सोलापूर जिल्ह्याचा संघ उतरवण्यासाठी सोलापूर शहर व जिल्हा हँडबॉल असोसिएशनच्या वतीने जिल्हा निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन केले आहे.

ही निवड चाचणी सोमवार, ८ जून रोजी सायंकाळी ५:३० वाजता येथील अश्विनी हॉस्पिटल शेजारी असलेल्या राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर होईल. सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त हँडबॉल संघांनी आणि खेळाडूंनी या निवड चाचणी स्पर्धेत वेळेवर सहभागी व्हावे, असे आवाहन असोसिएशनचे सचिव सुदेश मालप व मुख्य प्रशिक्षक डॉ. आनंद चव्हाण यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शरण वांगी (मो. ९१४६०३२४७३) यांच्याशी संपर्क साधावा.

# कुमार गटात धाराशिवची हॅटट्रिक

## ५२वी राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा : मुली गटात सांगलीचे विजेतेपद कायम

### कुमार गटात सोलापूर तृतीय तर मुली गटात चतुर्थ

### राज, धनश्री सर्वोत्कृष्ट 'विवेकानंद' व 'सावित्री' पुरस्काराचे मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून** (स्वर्गीय अजितदादा पवार क्रीडा नगरीतून ) :

कुमार व मुली गटाच्या ५२व्या राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत कुमार गटात धाराशिवने सलग तिसऱ्या वर्षी विजेतेपद पटकावीत हॅटट्रिक केली आहे. मुलींच्या गटात सांगलीने आपले विजेतेपद कायम ठेवले आहे.

लघुत्तम आक्रमणद्वारे झालेल्या सामन्यात कुमार गटात सोलापूर तृतीय, पुणे चतुर्थ तर मुली गटात धाराशिव तृतीय व सोलापूरने चतुर्थ स्थान पटकावल. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट 'विवेकानंद' व 'सावित्री' पुरस्काराचे मानकरी अनुक्रमे राज चंद्रजित जाधव (धाराशिव) व धनश्री विठ्ठल तामखडे (सांगली) हे ठरले.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, सोलापूर अ‍ॅम्युचर खो-खो असोसिएशन व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर पार पडली.

कुमार गटातील अंतिम सामन्यात धाराशिवला मुंबई उपनगरवर ३२-२६ असे ६ गुण व २. ५० मिनिटे राखून नमविताना विशेष प्रयास करावे लागले नाहीत. मध्यंतरासच



त्यांनी दोन ड्रीम गुणासह १८-१२ अशी निर्णय आघाडी घेतली होती.

मुलींच्या गटात सांगलीने आपल्याकडे विजेतेपद कायम राखताना २७-१९ असे ८ गुण व ३. ५० मिनिटे राखून ठाणेवर मात करण्यात यश मिळिवले. मध्यंतरापर्यंत ठाण्याने कडवी लढत दिली. दोन्ही संघांनीही प्रत्येकी तीन ड्रीम रन मिळवीत ११-११ अशी बरोबरी करीत प्रेक्षकांची उत्कंठा वाढवली होती. परंतु मध्यंतरानंतर सांगलीने बहारदार खेळी करीत संघाचा विजय सुकर केला.

**या स्पर्धेतील वैयक्तिक पारितोषिकेचे मानकरी**

**कुमार : संरक्षक :** जितेंद्र धर्मसिंग वसावे (धाराशिव), आक्रमक : समर्थ संजय सावंत ( मुंबई उपनगर), अष्टपैलू : राज चंद्रजीत जाधव (धाराशिव).

**मुली : संरक्षक :** धनश्री प्रकाश कंक (ठाणे) आक्रमक : अनुष्का आबासो खाडे (सांगली). अष्टपैलू : धनश्री विठ्ठल तामखडे : सांगली.

**अंतिम सामन्यातील संरक्षण व आक्रमणातील वैयक्तिक कामगिरी :**

कुमारः धाराशिव : वीरसिंग पाडवी(१.१०, १.१० मि.), जितेंद्र वसावे(३.२० मि व ८ गुण ), महेश पाडवी(१.४० मि.व २ गुण ), भिमसिंग वसावे (१.१०), राज जाधव (१.२०, २.१० मि. व २ गुण ), हरद्या वसावे (१.५० व ८ गुण ), सोट्या वळवी (१. २० नाबाद व ६ गुण ), पिंटू वळवी (२ गुण ).

**मुंबई उपनगर :** आर्यन चव्हाण(१.४० मि.), साहिल वासनिक(१.४०, १.00 मि. व २ गुण), सचिन सहानी (१.१० मि. ४ गुण ), अमेय मुर्चावडे (२ गुण), समर्थ सावंत (१.५० मि. व १० गुण), आदेश राठोड (१. ५० मि. व ८).

**मुली : सांगली**: वैष्णवी चाफे (२.४० मि. व २ गुण ), श्रावणी तामखेडे (२.१६ मि. व २ गुण), वेदिका तामखेडे (२.१० मि.), विद्या तामखेडे (१.१० मि.), अनुष्का तामखेडे (८ गुण ), धनश्री तामखेडे (२.१० मि. व ४ गुण), कृतिका आहेर (२.३0मि.), भौरम्मा उडगी(१. ४0मि. व २ गुण), पायल तामखेडे (१.५४ मि. व २ गुण).

**ठाणे :** प्राची वानगडे (१.00 मि.), स्वरा साळुंखे (१.२० मि.), धनश्री कंक (१.५० मि. ८ गुण), श्रुती चोरमुले (२ गुण), प्रणिती जगदाळे (२.२०, १.00 व २ गुण), गुड्डी राठोड(२.३० मि.), निधी जाधव (१.५० व ४ गुण ).

### मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण सोहळा

पारितोषिक वितरण सोहळ्याला शाहू शिक्षण संस्था पंढरपूरचे अध्यक्ष अब्राहमबापू आवळे, श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळ वाडीकुरोलीचे अध्यक्ष कल्याणराव काळे, एकनाथ शिंदे स्वाभिमानी शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. बापूसाहेब आडसूळ, लोकसभा संपर्कप्रमुख शिवसेना महेश साठे, शहर प्रमुख शिवसेना सचिन चव्हाण, दुग्ध विकास अधिकारी रेवन राठोड, मागास समाजसेवा दक्षिण सोलापूर मंडळाचे सचिव नागेश बिराजदार, महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, खजिनदार गोविंद शर्मा, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, स्पर्धा निरीक्षक संदीप तावडे, सहसचिव बाळ तोरसकर, कार्यालयीन सचिव डॉ. प्रशांत इनामदार, सोलापूर अ‍ॅम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, सचिव उमाकांत गायकवाड, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे, लक्ष्मी पतसंस्थेचे अंबादास जाधव, मागास समाजसेवा मंडळाचे सचिव किरण चव्हाण, क्रिस्टल डेव्हलपर्सचे लक्ष्मीकांत कोळी, सेवा फाउंडेशनचे संस्थापक प्रकाश राठोड, महाराष्ट्र राज्य वस्तीग्रह अनुदानित संघटना दत्तात्रय पाटील, रामचंद्र आलुरे गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अणदूर, क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड आदी उपस्थित होते. किरण स्पोर्ट्सच्या अध्यक्षा अलकाताई राठोड, स्पर्धा सचिव मोहन रजपूत, सहसचिव यशोदीप आठवले यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्राचार्य अंबादास पांढरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन श्री. गावडे यांनी केले. श्रीकृष्ण कोळी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## महत्वाचे...



### बार्शी बसस्थानकावर अवैध वाहतूक करणाऱ्या गाड्यांवरती कारवाई

**बार्शी, दि. ६ जून-**

महाराष्ट्र एसटी महामंडळाच्यावतीने दि. ५ ते १५ जून या कालावधीत २०० मीटर नो पार्किंग झोनमधून होणारी अवैध प्रवाशी वाहतुकीस आळा घालणे अभियान सुरु करण्यात आले आहे. महाराष्ट्र एसटी म हामंडळाच्या मुख्य सुरक्षा पोलीस उपमहानिरीक्षक तथा सुरक्षा व दक्षता अधिकारी डॉ. प्रियंका नारनवरे, रा.प. मध्यवर्ती कार्यालय मुंबई यांनी नो पार्किंग झोनचे उल्लंघन अवैध प्रवाशी वाहतुकीवर प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने रा.प. बार्शी आगारात दिनांक ५ ते १५ जून या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार शनिवारी बाजार दिवस असल्याने दि. ६ जून रोजी रा.प. बार्शी आगार व्यवस्थापक संजय भोसले, स्थानक प्रमुख विजय हांडे, वरिष्ठ लिपिक महेंद्र क्षीरसागर व वाहतूक नियंत्रक प्रशासकीय कर्मचारी व बार्शी शहर पोलीस स्टेशन, वाहतूक शाखा प्रमुख अडसूळ व त्यांची सहकारी टीम यांच्यामार्फत रा.प. बसस्थानकाच्या २०० मीटर आतील अवैध वाहतूक करणारी वाहने यांच्यावर संयुक्त कारवाई करीत रिक्षाचालक, मालवाहतूक गाड्या, प्रवासी वाहने यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. सदर संयुक्त कारवाईचे प्रवासी बांधवांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



### कर्मयोगी इन्स्टिट्यूटमध्ये केले विविध प्रकारच्या झाडांचे रोपण

**पंढरपूर, दि. ६ जून-**

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी पंढरपूर येथे दि ५ जुन २०२६ रोजी जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये विविध झाडांचे वृक्षारोपण करून विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणासाठी संदेश देण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील यांनी उपस्थितांना पर्यावरणाचे महत्व विषद करून पर्यावरण बचावासाठी समाजातील सर्व घटकांचे योगदान आवश्यक आहे असे सांगून वृक्ष लागवडीचे महत्व पटवून दिले. तसेच प्रत्येकानी घरामध्ये एक तरी झाड लावावे व त्याचे संगोपन करावे व ते इतरांना हस्तांतरित करून वृक्ष लागवडीची ही चळवळ वाढवावी असे आवाहन केले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी सर्वांना पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा देऊन वृक्ष लागवड व वृक्ष संगोपनासाठी प्रेरित केले. सदरच्या कार्यक्रमाला कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए. बी. कणसे, रजीस्ट्रार श्री. जी. डी. वाळके, उप प्राचार्य प्रा. जे. एल. मुडेगावकर, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मोरे, संशोधन अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. राहुल पांचाळ, तसेच विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एम. लंबे, डॉ. एस. व्ही. एकलारकर, डॉ.अनिल बाबर, प्रा. दीपक भोसले उपस्थित होते. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख प्रा. गणेश बागल यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

### टेंभूर्णीत कृषी भांडारच्या गोडाऊनला आग; दीड कोटींचे नुकसान

**टेंभूर्णी, दि. ६ जून-**

टेंभूर्णी (ता. माढा) येथील विपीन कृषी भांडार व महावीर अँग्रो एजन्सी या दोन दुकानांच्या गोडाऊनला लागलेल्या आगीत खते, बियाणे, मोटारी, दोन चार चाकी व दोन दुचाकींसह जवळपास दीड कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. ही घटना शुक्रवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडली. टेंभूर्णी शहरात महिन्यात मोठी आग लागण्याची दुसरी घटना असल्याने शहरासाठी स्वतंत्र अग्निशामक दलाची मागणी जोर धरत आहे. विपीन कृषी भांडारच्या मागील बाजूस गोडाऊनमध्ये शुक्रवारी सकाळी आग लागली. पहाटे फिरायला जाणाऱ्या लोकांनी व शेजाऱ्यांनी एसटीपीने आग शांत करण्याचा प्रयत्न केला. परंतु आगीने रौद्ररूप धारण केले. आगीत पार्किंगमधील एक जीप, एक मालवाहू टमटम, हौंडा आणि स्कुटी या चार गाड्या जळून खाक झाल्या. आगीने लगतच असलेल्याखतांचे गोडाऊनला लक्ष्य केले. तोपर्यंत विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याची अग्निशामक दलाची गाडी आली. तरीही आग नियंत्रणात आली नाही. नंतर विठ्ठलराव शिंदे कारखाना पिंपळनेर व करकंब, विठ्ठल कारखाना, कुर्डुवाडी नगरपरिषद, इंदापूर नगरपरिषद अशा पाच अग्निशामक दलाच्या गाड्यांनी आग आटोक्यात आणली. दुकानाचे मालक विपीन दोशी वरच्या मजल्यावर रहात होते. त्यांच्या राहत्या घराचे किरकोळ नुकसान झाले. जिवीत हानी झाली नाही. लागलेली आग ही लोकवस्तीत असल्याने परिसरात धावपळ झाली. तसेच धुराचे लोट सर्वत्र पसरले होते. घटनास्थळाला माढ्याचे तहसीलदार संजय भोसले, नायब तहसीलदार विजय कवडे, टेंभुर्णीचे मंडल अधिकारी सुजित शेळवणे यांनी भेट दिली.

### मंगळवेढ्याचे गटविकास अधिकारी विजयकुमार देशमुख झाले सेवानिवृत्त

**मंगळवेढा, दि. ६ जून-**

मंगळवेढ्याचे गटविकास अधिकारी विजयकुमार देशमुख हे दि.३१ मे रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा पदभार सहाय्यक गटविकास अधिकारी योगेश कांबळे यांनी स्विकारला आहे. मंगळवेढ्याचे तत्कालीन गटविकास अधिकारी जास्मिन शेख ह्या प्रदीर्घ वैद्यकीय रजेवर गेल्याने त्यांच्या जागी विजयकुमार देशमुख यांनी दि.२३ शज्ञनि/३/२०२६ रोजी स्विकारला होता. ते दि.३१ मे रोजी सेवानिवृत्त झाल्याने गटविकास अधिकारी यांचे पद पुन्हा रिक्त झाले असुन या पदासाठी अधिकाऱ्याची नागरिकांना प्रतिक्षा करण्याची वेळ आली आहे. देशमुख यांनी केवळ दोन महिने गटविकास अधिकारी पदाचा कार्यभार संभाळला आहे. सहाय्यक गटविकास अधिकारी कांबळे हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नवनियुक्त अधिकारी आहेत.

# कन्हेरगांव ग्रामपंचायत; भ्रष्टाचारावरुन युवक आक्रमक

## युवकांचा मोर्चा; अधिकाऱ्यांना धारेवर धरत विचारला जाब; कारवाई न झाल्यास उपोषण आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ६ जून-**

कन्हेरगांव (ता. माढा) येथील ग्राम पंचायतीमध्ये विविध विकासकामे, निधी खर्च आणि प्रशासनाच्या कामकाजाबाबत निर्माण झालेल्या शंकांच्या पार्श्वभूमीवर गावातील युवकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या बैठकीत युवकांनी संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांना थेट प्रश्न विचारत जाब मागितला.

कुर्डुवाडी पंचायत समितीच्या वतीने ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहारांची चौकशी करण्यासाठी कृषी विस्तार अधिकारी धनंजय मिसाळ, शाखा अभियंता पांडुरंग हांडे, कनिष्ठ अभियंता गणेश खत्री, ग्रामविकास अधिकारी हनुमंत देशमुख तसेच बाबासाहेब घोत्रे यांनी मंगळवारी (दि. २ जून) कन्हेरगांवला भेट दिली. यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या बैठकीत युवकांनी विकासकाम ांमधील कथित अनियमितता, निधीच्या खर्चातील पारदर्शकतेचा अभाव आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांबाबत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. युवकांच्या आक्रमक प्रश्नांमुळे अधिकाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

गावाच्या विकासासाठी आलेला कोट्यवधींचा निधी नेमका कुठे खर्च झाला? मंजूर विकासकामांची प्रत्यक्ष स्थिती काय आहे? ग्रामस्थांपासून माहिती का लपवली जाते? अशा प्रश्नांचा भडीमार युवकांनी केला. ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी म ागणी तक्रारदार सिद्धेश्वर ताटे व महेश माने यांनी केली. आता प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

> **तातडीने चौकशी व कारवाई व्हावी**
>
> कन्हेरगांव ग्रामपंचायतीतर्गत चौदावा व पंधरावा वित्त आयोगातून मंजूर विकासकामांमध्ये सरपंच, ग्रामसेवक, काही ग्रामपंचायत सदस्य आणि ठेकेदार यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. काही विकासकामे प्रत्यक्षात न होता त्यांची बिले काढल्याचाही दावा आहे. संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर तातडीने कारवाई करावी.
>
> **- सिद्धेश्वर ताटे,** तक्रारदार

> **कारवाई न झाल्यास उपोषण**
>
> कन्हेरगांवमधील कथित भ्रष्टाचाराच्या कामांची पाहणी करण्यासाठी पंचायत समितीचे अधिकारी गावात आले होते. पाहणीदरम्यान काही कामांबाबत गंभीर त्रुटी त्यांच्या निदर्शनास आल्याचा दावा केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने अहवाल सादर करून दोषींवर कारवाई करावी. अन्यथा चार दिवसांत गावातील युवकांसह उपोषण आंदोलन छेडण्यात येईल.
>
> **- महेश माने,** सामाजिक कार्यकर्ते.

# भानसळेत स्वच्छतेचा बोजवारा

## दलित वस्तीत वर्षभरापासून गटाराचे पाणी रस्त्यावर

### रस्त्यावर डबकं साचल्याने रोगराईचा धोका वाढला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ जून-**

स्वच्छ गांव, सुंदर गांव अशा घोषणा देत स्वच्छतेचे दावे करणाऱ्या प्रशासनाचा खरा चेहरा बार्शी तालुक्यातील भानसळे येथे उघड झाला आहे. गावातील दलित वस्ती जयभीमनगर आणि माता रमाईनगर परिसरात गेल्या वर्षभरापासून गटार फुटल्याने सांडपाणी थेट मुख्य रस्त्यावर साचत आहे. ग्रामस्थांना अक्षरशः घाणीतून मार्ग काढावा लागत आहे. साचलेल्या दूषित पाण्यात जनावरे पाणी पीत असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार,अनेक वेळा तक्रारी करूनही ग्रामपंचायत प्रशासनाने या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केले आहे. रस्त्याच्या मध्यभागी गटारीचे काळेकुट्ट, दुर्गंधीयुक्त पाणी साचल्याने परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. साचलेल्या गटाराच्या पाण्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

नागरिकांना दुचाकी घसरु नये याची काळजी घेत जावे लागत आहे. वयोवृद्ध, महिला आणि शालेय विद्यार्थीही दररोज यांनाही घाण पाण्यातून मार्ग काढावा लागत आहे.



याच परिसरातील भिंतींवर जल जीवन मिशन आणि शुद्ध पाण्याची शाश्वती यासारख्या शासकीय योजनांच्या जाहिराती झळकत आहेत. मात्र त्याच जाहिरातीसमोर साचलेल्या गटाराच्या पाण्यात म्हशी आणि इतर जनावरे तहान भागवत असल्याचे चित्र प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.

गटारीचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य व्यवस्था नसल्याने मुख्य रस्त्यालाच तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही सम स्या आणखी गंभीर होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

एक वर्षापासून समस्या कायम असल्याने परिसरात मोठ्या प्रम ाणावर डासांची पैदास झाली आहे. डेंग्यू, मलेरिया आणि इतर साथीच्या आजारांचा धोका वाढला आहे. तरीही ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व अधिकारी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ या भागापर्यंत पोहोचत नसल्याची खंतही ग्राम स्थांनी व्यक्त केली.

**ग्रामपंचायत कार्यालयावर काढणार मोर्चा**

साचलेल्या सांडपाण्याची तात्काळ विल्हेवाट लावून नवीन गटार बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. येत्या काही दिवसांत प्रश्न निकाली न निघाल्यास महिला व नागरिक ग्रामपंचायत कार्यालयावर धडक मोर्चा काढून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने उद्या बैलगाडी जनआक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ जून-**

येथील वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट शहर व तालुक्याच्या वतीने सोमवार ८ जून रोजी बैलगाडी जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार अक्कलकोट शहर व तालुक्याच्या वतीने देशात आणि राज्यात पेट्रोल, डिझेल, गॅस चे दर प्रचंड प्रमाणात वाढलेले असुन गोर गरीब सामान्य जनता या दरवाढी मुळे महागाईत होरपळत आहेत. त्याच्या निषेधार्थ आणि नीट पेपरफुटीमुळे २२ लाख विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असुन ते सरकारचे अपयश आहे असे अनेक विषय घेऊन सोमवार दि. ८ जून रोजी सकाळी ११ वाजता ए-वन चौक-कमलाराजे चौक फत्तेसिंह चौक-मेनरोड येथून सुरवात होऊन विजयकामागार चौक व एस-टी स्टॅन्डवर या म ोर्चाचे सांगता होणार आहे.

मोर्चेला संबोधित करण्यासाठी राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ. नितीन ढेपे, राज्य उपाध्यक्ष डॉ. अनिल अण्णा जाधव, राज्य उपाध्यक्ष अॅड. सरोजीत बनसोडे, सोलापूर जिल्हा निरिक्षक तथा राज्य उपाध्यक्ष प्रा. सोमनाथ साळुंखे, राज्याचे प्रवक्ते अॅड. अरुण अण्णा जाधव आणि सोलापूर जिल्ह्याचे नेते रवी गायकवाड, जिल्हाअध्यक्ष चंद्रशेखर मडिखांबे हे उपस्थित राहणार आहेत.

या पत्रकार परिषदेस जिल्हाअध्यक्ष चंद्रशेखर मडिखांबे, बबन गायकवाड, भारतीय बौध्द महासभा तालुका अध्यक्ष साहिल कांबळे, तालुका उपाध्यक्ष यशवंत इंगळे, तालुका अध्यक्ष विशाल ठोंबरे, अमृत सोनकांबळे, शहर उपाध्यक्ष शिवाजी चौगुले, नितीन शिवशरण उपस्थित होते.



# टाटा पॉवर यांच्याकडून ओढा खोलीकरण कामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ६ जून-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील गावालगत असलेला शिवबसप्पा खैरदे यांच्या शेतापासून ते सिमेंट बंधाराकडे ओढ्याचे खोलीकरण टाटा पावर कडून मा. दत्ता बस्तापुरे यांच्या हस्ते नारळ वाढवून सुरवात करण्यात आले याप्रसंगी गावचे माजी सरपंच सिद्धाराम कोडले, महादेव होटकर तसेच शिवबसपा खैरदे, पत्रकार अल्ताफ पटेल, अशोक खैरदे, सदन शेतकरी राजकुमार हंजगे, घाळेप्पा भूसणगी, सादीक पटेल, बास्को ग्रामीणचे गायकवाड उपस्थित होते.

# संत तुकाराम महाराज पालखी मार्गाची विभागीय आयुक्तांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ जून-**

पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली व माळशिरस तालुक्यातील बोरगाव, अकलूज येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी तळाची व मार्गाची पाहणी विभागीय आयुक्त शितल तेली उगले यांनी केली.

यावेळी त्यांच्या समवेत जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे, सहाय्यक प्रांताधिकारी सचिन इथापे, विजया पांगारकर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे श्री. औटी, कार्यकारी अभियंता अमित निमकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा नगर विकास प्रशासन अधिकारी योगेश डोके, तहसीलदार सचिन लंगुटे,गटविकास अधिकारी अमोल जाधव उपस्थित होते.



यावेळी पालखी तळाची स्वच्छता, सपाटीकरण, चिखल होऊ नये म्हणून मुरूम टाकणे आणि पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी व्यवस्था करावी. वारी काळात वारकऱ्यांना मूलभूत व आरोग्य सुविधा मिळण्यावर भर देण्यात यावा.

पालखीच्या संपूर्ण मार्गावर आणि मुक्काम च्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात तात्पुरती व फिरती शौचालये उपलब्ध करून स्वच्छतेसाठी मुबलक मनुष्यबळ तैनात ठेवावी, तसेच पालखी तळांवर अग्निशमन यंत्रणा सुसज्ज ठेवावी सूचना विभागीय आयुक्त शितल तेली उगले यांनी यावेळी दिल्या.



# पर्यावरण जागर ही काळाची गरज

## उपमहापौर देवकर; बदलते हवामान व आरोग्यावर होणारे परिणाम या विषयावर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

बदलते हवामान, वाढते प्रदूषण आणि त्याचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेता पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन सोलापूरच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमि त्त विजापूर रोड येथील द्वारकाधीश मंदिरात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. युवराज मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल व कॅन्सर रिसर्च सेंटर, ड्रीम फाऊंडेशन, लेवा पाटीदार बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, बसव संगम शेतकरी गट आणि विरंगुळा ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'बदलते हवामान व आरोग्यावर होणारे परिणाम' या विषयावर व्याख्यान तसेच 'कॅन्सरमुक्त भारत - कॅन्सरमुक्त महाराष्ट्र' अभियानांतर्गत सेंद्रिय शेती उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, आत्मा प्रकल्प संचालक कांतपा खोत, राजशेखर पाटील, संगीता जाधव, शिवाजी वाघमोडे, वनिता पाटील आणि पोलिस निरीक्षक दिलीप ताडकासे यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना देवकर यांनी सोलापूर शहरात एक लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.आत्मा प्रकल्प संचालक कांतपा खोत यांनी कॅन्सरसारख्या गंभीर आजारांपासून बचावासाठी सेंद्रिय शेतीचा प्रसार आणि पर्यावरणाबाबत जागरूकता नि र्माण करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात डॉ. संतोष राठोड, सुनील वाघमारे, बाळासाहेब पाटील आणि संयोजक काशिनाथ भतगुणकी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नंदकुमार टिंगरे, नागेश म्हेत्रे, अजित चव्हाण, शिरीष गोळवलकर, स्मिता देशपांडे, जितेंद्र वाघमारे आणि अनु क्षीरसागर यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन युसुफ पीरजादे यांनी केले, तर दत्तात्रय पाठक यांनी आभार मानले.

# भेसळ, अस्वच्छ आणि निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांमुळे वाढतोय आरोग्याचा धोका

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे**
**सोलापूर, दि. ६ जून-**




सकाळी चहात पडणारे दूध, दुपारच्या जेवणातील तेल, संध्याकाळी खाल्ले जाणारे फरसाण, मिठाई किंवा हॉटेलमधील पदार्थ आणि आपण दररोज जे खातो ते अन्न खरोखर सुरक्षित आहे का? हा प्रश्न आज प्रत्येक नागरिकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. कारण चांगल्या आरोग्याची सुरुवात आपल्या ताटातूनच होते आणि अनेक आजारांचाही उगम याच ताटातून होऊ शकतो.

७ जून हा दिवस जगभरात 'जागतिक अन्न सुरक्षा दिन' म्हणून साजरा केला जातो. सुरक्षित, स्वच्छ आणि पौष्टिक अन्न हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे. मात्र वाढत्या स्पर्धेच्या युगात नफ्याच्या हव्यासापोटी काही ठिकाणी अन्नपदार्थांच्या गुणवत्तेशी तडजोड होत असल्याचे चित्र दिसून येते. भेसळयुक्त दूध, कृत्रिम रंग मिसळलेल्या मिठाया, निकृष्ट दर्जाचे तेल, रासायनिक प्रक्रिया केलेली फळे-भाज्या आणि अस्वच्छ ठिकाणी तयार होणारे खाद्यपदार्थ यामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होत आहे. आज अनेक नागरिक घराबाहेरचे अन्न सेवन करतात. हॉटेल, फास्ट फूड सेंटर, बेकरी, ज्यूस सेंटर आणि रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेते यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर ग्राहकांची गर्दी असते. मात्र या ठिकाणी स्वच्छतेचे नियम कितपत पाळले जातात, वापरले जाणारे पाणी शुद्ध आहे का, अन्नपदार्थ किती दिवसांचे आहेत, तेल वारंवार वापरले जात आहे का, याची माहिती ग्राहकांना नसते. त्यामुळे अन्न सुरक्षा हा केवळ प्रशासनाचा नव्हे तर प्रत्येक नागरिकाचा चिंतेचा विषय बनला आहे.

**जागतिक अन्न सुरक्षा दिन विशेष**

अन्न व औषध प्रशासन विभाग वेळोवेळी कारवाई करत असला तरी भेसळीचे प्रकार पूर्णपणे थांबलेले नाहीत. अनेकदा सण-उत्सवांच्या काळात मिठाई, दुधजन्य पदार्थ आणि खाद्यतेलांमध्ये भेसळीच्या घटना समोर येतात. काही व्यापारी अल्पकालीन नफ्यासाठी नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करत असल्याचेही दिसून येते. त्यामुळे अन्न सुरक्षा नियमांची कठोर अंमलबजावणी करणे आणि नियमित तपासण्या करणे आवश्यक आहे. नागरिकांनीही जागरूक ग्राहक बनणे गरजेचे आहे. अन्नपदार्थ खरेदी करताना उत्पादन तारीख, कालबाह्यता तारीख, दर्जा, पॅकेजिंग आणि परवाना यांची पडताळणी करणे आवश्यक आहे. स्वस्ताच्या मोहापायी निकृष्ट दर्जाचे पदार्थ खरेदी करणे टाळले पाहिजे. अन्न ही केवळ पोट भरण्याची बाब नाही, तर ती आरोग्य, कुटुंब आणि भविष्याशी निगडित आहे. त्यामुळे 'जेवढे अन्न सुरक्षित, तेवढे जीवन सुरक्षित' हा संदेश जागतिक अन्न सुरक्षा दिनानिमित्त प्रत्येकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# विधानपरिषदेमुळे ढवळले जिल्ह्याचे राजकारण!

## ● बिनविरोधचा डाव फसल्याने पालकमंत्री जमीनपर तर शरद राष्ट्रवादीत पेटले गृहयुध्द; आता लक्ष रणनितीकडे

**सोलापूरसह राज्यात १७ विधानपरिषद जागेच्या निवडणुकांचा फड रंगला असून यापैकी केवळ ६ जागा बिनविरोध झाल्या आहेत. तर ११ जागांवर निवडणुका लागल्या असून काही जागांवर बंडखोरीमुळे मातब्बरांची अडचण झाली आहे. सोलापूर विधानपरिषदेच्या निवडणुकीमुळे सोलापूर जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले असून वातावरण कमालीचे पेटले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मिळालेल्या भरघोस यशामुळे पालकमंत्र्यांसह जिल्ह्यातील भाजपावाल्यांचा आत्मविश्वास भलताच वाढल्याचे चित्र आहे. विधानपरिषद निवडणुकीसाठी भाजपाने अनेक इच्छुकांना डावलून बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांना उमेदवारी जाहीर केली तर पुरेसे संख्याबळ नसतानाही काँग्रेसच्या नेत्यांनी सोलापूर विधानपरिषदेसाठी उमेदवार मैदानात उतरवला. सूचकाच्या बोगस स्वाक्षरीवरून काँग्रेसचे फत्तेपूरकर यांचा अर्ज निवडणुकीतून बाद झाला. भाजपाने बाजी जिंकली असे वाटत असतानाच शरद पवार राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष पंढरीचे वसंतराव देशमुख यांनी अकलूजकरांच्या साक्षीने उमेदवारी कायम ठेवल्याने भाजपाचा बिनविरोधच्या आशा मावळल्या. पण देशमुखांच्या उमेदवारीवरून शरद राष्ट्रवादीच्या चारही आमदारांनी नाराजीचा सूर लावल्याने भाजपा पुन्हा जोमात आल्याचे जाणवत आहे.**






लोकसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यातील दोनही खासदारकीच्या जागांवर विजय मिळवल्याने शरद राष्ट्रवादी आणि काँग्रेस राजकीय हवेत होती. खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माढ्याची तर खा. प्रणिती शिंदे यांनी सोलापूरच्या जागेवर दणदणीत विजय मिळवून भाजपाला जोर का झटका धिरेसे दिला होता. तर विधानसभा निवडणुकीतही जिल्ह्यातील ११ पैकी केवळ पाच जागांवरच भाजपाला विजय मिळवता आला होता. त्यानंतर झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महापालिका, जिल्हा परिषदेत एकहाती सत्ता आणून भाजपाने दोन्ही काँग्रेससह मित्रपक्ष ठाकरे शिवसेना व अजित राष्ट्रवादीला बॅकफूटवर ढकलले होते. या विजयाने भाजपाचा पर्यायाने पालकमंत्र्यांचा आत्मविश्वास दुणावला होता.

विधानपरिषद निवडणूकही बिनविरोध करण्याचा पूर्ण आत्मविश्वास पालकमंत्री यांना होता. त्यादृष्टीने त्यांनी रणनितीही आखल्याचे दिसून आले. वास्तविक पाहता विधानपरिषदेच्या निवडणुकीत विजयासाठी पुरेसे संख्याबळ असल्यामुळे भाजपा निश्चिंत असेल असे वाटत असतानाच विरोधी काँग्रेसच्या उमेदवाराचा अर्ज नाट्यमयरित्या बाद झाला. सूचकानेच शपथपत्रावर दावा केला की, सूचक म्हणून केलेली सही आपली नाही. याकारणाने काँग्रेस उमेदवाराचा अर्ज बाद झाला. काँग्रेस उमेदवारासह खासदार आणि पदाधिकाऱ्यांनी भाजपाच्या नावाने खडे फोडत अर्ज बाद करण्याचा घाणेरडा डाव खेळल्याचा आरोप केला.

दरम्यान विधानपरिषद निवडणूक बिनविरोध होणार म्हणून हवेत असलेल्या भाजपाला शरद पवार राष्ट्रवादीने झटका दिला. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख यांनी अर्ज कायम ठेवल्याने भाजपाच्या बिनविरोध आनंदावर पाणी पडले. वास्तविक शरद पवार राष्ट्रवादीने पुण्यात भाजपाच्या उमेदवाराला पाठिंबा दर्शवत उमेदवारी अर्ज मागे घेतला, मग सोलपुरातच कुठे माशी शिंकली तर ती अकलूजमध्ये शिकल्याची चर्चा रंगली. भाजपावाल्यांनी सर्व उमेदवारांना अर्ज माघारीचे साकडे घातले. देशमुख वगळता सर्वांनी ते मान्यही केले. पण भाजपावाले अकलूजपर्यंत पोहचले नसल्यामुळे देशमुखांचा अर्ज कायम राहिला आणि अखेर विधानपरिषद निवडणूक लागली.

निवडणूक जिंकण्यासाठी पुरेसे मतदार संख्याबळ असतानाही भाजपाने बिनविरोध निवडणुकीच्या धरलेल्या अट्टाहासावर अकलूजकरांनी पाणी फेरले खरे पण शरद राष्ट्रवादीच्या जिल्ह्यातील चारही आमदारांनी नाराजीचा सूर का लावला हे मात्र सोलापूरकरांना समजले नाही. कारण निवडणूक लागली आणि शप राष्ट्रवादीचा उमेदवार रिंगणात आहे म्हटल्यावर सर्व आमदारांसह पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीसाठी जोर लावणे अपेक्षित होते. पण याप्रकरणात विश्वासात घेतले नसल्याने आमदार नाराज असल्याचे सांगितले जात आहे. माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी तर थेट मोहिते-पाटलांवरच केसाने गळा कापल्याचा आरोप केला. वास्तविक पाहता जानकरांचे पुत्र तुल्यबळ उमेदवार ठरले असते का देशमुख अशीही चर्चा रंगली आहे. देशमुख उमेदवारीवर ठाम राहिले तसे इतर कोणी उमेदवार ठाम राहिले असते का? अशीही कुजबूज राजकीय वर्तुळात रंगली आहे. विधानपरिषद निवडणूक लागल्याने शरद राष्ट्रवादीतील कोणी आनंदी तर काहीजण दुखी झाल्याचे चित्र आहे. कोणाची बांधिलकी कोणाशी आहे तर कोण काय राजकारण खेळत आहे, हे राजकीय कोडे उलगडण्याचा प्रयत्न सामान्य सोलापूरकर करीत आहे. कारण भाजपाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना सांगितले होते की, निवडणूक लावणारे झारीतील शुक्राचार्य माहिती असून निवडणुकीनंतर दाखवून देवू. तर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी नाराजी व्यक्त करत विरोधकांकडे या निवडणुकीतील एकूण ६१६ मतांपैकी १६ मतदारही नसल्याचे खिजवत विजय भाजपाचा पक्का असल्याचे सांगितले होते. वास्तविक पाहता विधानपरिषद निवडणुकीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांचे मतदान असते आणि ही निवडणूक लक्ष्मी दर्शनाची असते हे यापूर्वीच्या अनेक निवडणुकांमधून चर्चीले गेले आहे. निवडणूक बिनविरोध होणार म्हणून बहुसंख्य मतदार नाराजही होते अशीही चर्चा होती. तर निवडणूक लागावी आणि लक्ष्मीदर्शन व्हावे यासाठी अनेकांनी खासगीत प्रार्थना केल्याचे ऐकिवात होते. आता निवडणूक लागली असून मैदानात उतरलेल्या उमेदवारांनी आमदारांसह मतदारांच्या गाठीभेटी सुरु केल्या आहेत. निवडणूक बिनविरोध होणार म्हणून आनंदात असलेली भाजपा आणि त्यांचे उमेदवार धावपळीत जुंपले आहेत. तर शरद राष्ट्रवादीचे उमेदवार देशमुख आणि खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी अदृश्य मतदारांवर भरोसा दाखवत मतदारांच्या गाठीभेटी वाढवून पालकमंत्र्यांचे १६ मतांचे आव्हाने स्वीकारल्याचे सांगितले जात आहे.



### हार-जीत पेक्षा विधानपरिषद निवडणूक लागल्याचाच जास्त आनंद...

सोलापूर विधानपरिषद निवडणुकीत अत्यल्प संख्याबळ असतानाही काँग्रेसने आदित्य फत्तेपूरकर या आपल्या उमेदवाराला मैदानात उतरवले. त्यांच्या अर्जावर सूचक म्हणून स्वाक्षरी केलेले पंढपूरचे नागेश भोसले यांनी आपली बोगस स्वाक्षरी असल्याचा दावा शपथपत्रावर केल्यामुळे फत्तेपूरकर यांचा अर्ज बाद झाल्याने काँग्रेसवर मोठी नामुष्की ओढावली होती. खा. प्रणिती शिंदे यांच्यासह उमेदवार आणि पदाधिकाऱ्यांनी प्रचंड त्रागा करत भाजपावर आगपाखड केली. उमेदवारी बाद झाल्यानंतर आनंदावर विरजण पडल्याने दुखी झालेल्या काँग्रेसला शरद पवार राष्ट्रवादीने उमेदवारी कायम ठेवत दिलासा दिला. वास्तविक पाहता या निवडणुकीत हार-जीत यापेक्षाही बिनविरोध न होता ही निवडणूक लागली याचाच आनंद जास्त असल्याची चर्चा आहे.




## प्रिसिजनमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्रिसिजन कॅम शाफ्ट्स लिमिटेडमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाची परंपरा जपत कंपनी परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. हरित आणि शाश्वत भविष्यासाठी वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित करत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वृक्षारोपणात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी आर. के. काशीद, व्ही. पी. रॉय, सी. एस. मुंदोडगी, एन. एन. फलटणकर, एस. व्ही. पाटील यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी वृक्षांचे संगोपन करण्याची आणि पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने योगदान देण्याची प्रतिज्ञा केली.

## सलमान सय्यद सोलापूर २ वर्षांकरीता तडीपार

**सोलापूर, दि. ६ जून-**



गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेला सलमान गुलाब सय्यद (वय-२९, रा. जुना बोरामणी नाका, रविवार पेठ, सोलापूर) यास सोलापूर शहर व जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले आहे.

सलमान सय्यदविरुध्द सन २०१८, २०२०, २०२५ व २०२६ या कालावधीत गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा करणे, सरकारी नोकरांचे कामात अडथळा निर्माण करणे, सामान्य नागरिकांना मारहाण करुन दहशत निर्माण करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे जेलरोड पोलीस ठाणेकडून त्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलिस उप-आयुक्त (परिमंडळ) प्रीतम यावलकर यांना सादर केला होता. त्या अनुषंगाने उपायुक्त प्रितम यावलकर यांनी कार्यवाही करुन सलमान सय्यद यास सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्हा येथून दोन वर्षाकरीता तडीपार केल्याबाबत ५ जून रोजी आदेश पारित केले आहेत.



## कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात शिवस्वराज्य दिन साजरा

**बार्शी दि.६ जून-**

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालय येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५२ वा शिवराज्याभिषेक सोहळा शिवस्वराज्य दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रंथालयाचे सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र नलवडे, बप्पा सुतार, सतीश पाचकुडवे, इसाक मुकेरी, बापूसाहेब कुलकर्णी, आयुब मुकेरी, ग्रंथपाल विनोद गायकवाड, आर्या लोंढे यांचेसह सभासद, वाचक आदी उपस्थित होते.



## हुच्चेश्वर नगर येथील गुन्हेगार टोळीतील ५ सदस्य दोन वर्षांकरीता तडीपार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या पाच गुन्हेगारांच्या एका टोळीला सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले आहे.

टोळीप्रमुख - राजू मोहन जमादार (वय-४१) ,कृष्णा राजु जमादार (वय-२०) , सनी राम जमादार (वय-२०), राम शंकर जमादार (वय-४३, सर्व रा. हुच्चेश्वर नगर भाग-३, कुमठा नाका, सोलापूर) आणि दिपक रामशंकर जमादार (वय-१९,रा. शिवगंगा नगर भाग-४, पारशी विहीरजवळ, कुमठा नाका, सोलापूर ) अशी तडीपार केलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत.

वरील गुन्हेगारांविरुद्ध सन २०२३, २०२४ व २०२५ या कालावधीमध्ये टोळीच्या माध्यमातून आपखुशीने दुखापत करणे, गैरकायद्याची मंडळी जमवून दंगा करणे, जीवे ठार मारण्याची धमकी देणे, घातक शस्त्र बाळगून दहशत निर्माण करणे यासारखे एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे या सर्वांविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्याकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५५ अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ) प्रीतम यावलकर यांना सादर केला होता. त्यांनी त्या अनुषंगाने कार्यवाही करुन सदर गुन्हेगारी टोळीतील पाचही जणांना सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्हा येथून दोन वर्षाकरीता तडीपार केल्याचा पारित केला आहे.




## हगलूरचा विकास पॅटर्न ठरला आदर्श

▶▶ मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात तालुक्यात प्रथम क्रमांक
▶▶ लोकसहभाग आणि प्रभावी नियोजनाची मिळाली पावती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ जून-**

उत्तर तालुक्यातील हगलूर गावाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत आयोजित तालुका स्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत विकासाच्या क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. गावातील स्वच्छता, पायाभूत सुविधा, लोकसहभाग आणि शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या जोरावर हगलूर ग्रामपंचायतीने हे यश मिळवले आहे.


गावाच्या सर्वांगीण विकासासाठी राबवलेल्या उपक्रमांची दखल घेत या स्पर्धेत हगलूरची निवड करण्यात आली. स्वच्छ व सुंदर गाव, नागरिकांच्या सहभागातून राबवलेल्या विकासकामांची गुणवत्ता, तसेच शासनाच्या विविध योजनांचा तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचलेला लाभ हे या यशामागील महत्त्वाचे घटक ठरले. या यशामध्ये ग्राम पंचायतीचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ यांचे एकत्रित योगदान महत्त्वाचे ठरले.

माजी सभापती रजनी भडकुंबे, माजी उपसभापती संभाजी भडकुंबे, शिवसेना तालुकाप्रमुख राजकुमार शिंदे, सरपंच संगीता कुमार बेळे, उपसरपंच प्रगती भडकुंबे आणि ग्रामपंचायत अधिकारी एस. आय. राठोड यांनी विकासकामांच्या नियोजनात आणि अंमलबजावणीत मोलाचे मार्गदर्शन केले.

गावातील सर्व ग्रामस्तरीय कर्मचारी आणि ग्रामस्थांनीही अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विकासाची ही वाटचाल अधिक मजबूत केली.

त्यामुळे हगलूरचे नाव संपूर्ण तालुक्यात अग्रक्रमाने घेतले जात आहे. हगलूर ग्राम पंचायतीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल उत्तर सोलापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी तसेच जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत टीमचे अभिनंदन केले आहे.

हगलूर गावाचे हे यश केवळ पुरस्कारापुरते मर्यादित नसून ग्रामीण विकासात लोकसहभाग, नियोजन आणि पारदर्शक प्रशासन यांचे महत्त्व अधोरेखित करणारे असल्याची भावना व्यक्त होत आहे. हगलूरने मिळवलेला हा मान इतर ग्रामपंचायतींसाठीही प्रेरणादायी ठरत असून, गावाच्या विकासाचा हा आदर्श पॅटर्न आता तालुकाभर चर्चेचा विषय बनला आहे.

गुरु. १८ जून सायं.७ वा. हुतात्मा स्मृती मंदिर


नेपथ्य राजन भिसे संगीत अजित परब प्रकाश शीतल तळपदे वेशभूषा मंगल केंकरे
भार्गवी चिरमुले, अभिषेक देशमुख, नेहा कुलकर्णी, गौरी महाजन, कृष्णा चतुर्भुज, नामांतर कांबळे, धनश्री दळवी, भूषण पाटील आणि आनंद इंगळे आणि वैभव मांगले
तिकीट फोन बुकींग सुरु – संपर्क : गुरु वठारे 9011474400

शनिवार २७ जून सायं. ७ वा. हुतात्मा स्मृती मंदीर
मराठी रंगभूमीवरील धुमाकूळ घालत असलेलं एकमेव हॉरर कॉमेडी आणि थ्रिलर नाटक


अनिकेत विश्वासराव, प्रियदर्शन जाधव, रसिका सुनिल, गौतमी देशपांडे
ऑनलाईन bookmyshow फोन बुकींग व प्रयोगासाठी संपर्क : शिवाजी उपरे 9623004299

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा



# १३ जूनला गुणवत्ता यादी; १६ जूनपर्यंत प्रवेश निश्चिती आवश्यक

## अकरावी प्रवेशासाठी दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर

### अर्ज पुन्हा लॉक करणे बंधनकारक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ जून -**

अकरावीच्या केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी दुसऱ्या नियमित प्रवेश फेरीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. माध्यमिक शिक्षण विभागाने जारी केलेल्या माहितीनूसार १३ जून रोजी दुसरी गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार आहे. यादीत नाव आल्यानंतर विद्यार्थ्यांना १३ ते १६ जूनदरम्यान संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

यंदाच्या प्रवेश प्रक्रियेत दुसऱ्या फेरीपूर्वी सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज अनलॉक करणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी भाग-१ आणि भाग-२ मधील माहितीची पुन्हा पडताळणी करून अर्ज लॉक करणे अनिवार्य आहे. या कालावधीत नवीन विद्यार्थ्यांनाही नोंदणीची संधी दिली आहे. ६ ते ९ जून दरम्यान नवीन नोंदणी, पसंतीक्रम भरणे आणि अर्ज लॉक करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. विद्यार्थ्यांना किमान एक आणि कमाल दहा कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविण्याची मुभा आहे. तसेच व्यवस्थापन, इन-हाऊस आणि अल्पसंख्याक कोट्यांतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी संबंधित कोटा पसंती अर्जही ऑनलाईन भरून लॉक करणे आवश्यक आहे.

यानंतर १० ते १२ जूनदरम्यान डेटा प्रोसेसिंग आणि अर्जांची पडताळणी होणार आहे. १३ जून रोजी दुसरी गुणवत्ता यादी जाहीर होईल. विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालय वाटप लॉगिनमध्ये पाहता येणार आहे. त्याची माहिती एसएमएसद्वारेही मिळणार आहे. शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, गुणवत्ता यादीत मिळालेले महाविद्यालय स्वीकारायचे असल्यास विद्यार्थ्यांनी लॉगिनमध्ये 'प्रोसीड ॲडमिशन' पर्याय निवडून संबंधित महाविद्यालयात जाऊन आवश्यक कागदपत्रांची पडताळणी व शुल्क भरून प्रवेश निश्चित करावा. १६ जूननंतर प्रवेश निश्चित न केल्यास संबंधित जागेवरील दावा संपुष्टात येण्याची शक्यता आहे.




### दुसऱ्या फेरीचे महत्त्वाचे वेळापत्रक

- **६ ते ९ जून - नवीन नोंदणी, पसंतीक्रम भरणे व अर्ज लॉक करणे**
- **१० ते १२ जून - डेटा प्रोसेसिंग व पडताळणी**
- **१३ जून - दुसरी गुणवत्ता यादी जाहीर**
- **१३ ते १६ जून - महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करणे**
- **१९ जून - रिक्त जागांचा तपशील प्रसिद्ध**

### रिक्त जागांचा तपशील पोर्टलवर प्रसिद्ध करणार

अकरावी प्रवेशासाठी १९ जून रोजी दुसऱ्या फेरीअखेर रिक्त जागांचा तपशील पोर्टलवर प्रसिद्ध करणार आहे. त्यानंतर पुढील प्रवेश फेरीचे नियोजन करणार आहे.

- **सचिन जगताप,** शिक्षणाधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग

### वेळापत्रकाचे काटेकोर पालन करणे गरजेचे

विद्यार्थी आणि पालकांनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता अर्जातील माहिती अचूक भरून वेळेत लॉक करावी, तसेच गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर प्रवेशाची प्रक्रिया मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

# बोरामणी येथे सव्वा सात लाखांचा गांजा जप्त

## विक्रीच्या तयारीतील ७ आरोपी जेरबंद; ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने बोरामणी शिवारात तिघा आरोपींना अटक करून त्यांच्याकडून पर राज्यातून विक्रीसाठी आणलेला सव्वा ७ लाखाचा सव्वा ३६ किलो गांजा जप्त केला आहे.

सचिन लक्ष्मण बनसोडे (वय ३९, रा. टाकळी सिकंदर, ता. मोहोळ) एकनाथ नामदेव लेंढवे (वय ३३, रा. मेथवडे, ता. सांगोला) आणि अनिल लक्ष्मण रोंगे (रा. खर्डी, पंढरपूर, ता. पंढरपूर) अशी आरोपींची नावे आहेत.

जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजय जगताप यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील दुय्यम अधिकारी व अंमलदार यांना कारवाईबाबत सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे तपासादरम्यान बातमीदारामार्फत बातमी मिळाली कि जगदलपुर (राज्य छत्तीसगड) येथून गांजा आणून तो विक्री करण्याकरीता काही आरोपी हैदराबाद महामार्गावरील बोरामणी शिवारातील हॉटेल वैष्णवीजवळ येणार आहेत. माहितीप्रमाणे पोलिसांनी संबंधित ठिकाणी सापळा लावला. हॉटेल वैष्णवी समोर वरील आरोपी सचिन बनसोडे व एकनाथ लेंडवे हे दोन मोठ्या बॅगांसह उभे असल्याचे दिसले. पोलिसांनी त्यांना जागीच पकडले. दोन्ही बॅगांची तपासणी केली असता २ प्लास्टिकच्या पिशवीमध्ये ३६ किलो २७० ग्रॅम वजनाचा गांजा (किंमत - ७ लाख २५ हजार ४०० रुपये) मिळून आला. याबाबत त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता सदरचा गांजा हा जगदलपूर येथून विकत आणला असून तो अनिल रोंगे यास विक्री करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी अनिल रोंगे याची माहिती काढून मोहोळ येथून त्याला अटक केली आहे. दरम्यान याप्रकरणी सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून अटक केलेल्या तीनही आरोपींना नऊ जून पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वाघ हे करीत आहेत. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांचे मार्गदर्शनाखाली ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय जगताप यांचे नेतृत्वाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानदेव वाघ, सपोनि भिमगोंडा पाटील, फौजदार ख्वाजा मुजावर, सफौ/ नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, हरिदास पांढरे, अनिश शेख, अश्विनी गोटे, अक्षय डोंगरे, चालक सतिष बुरकुल यांनी पार पाडली आहे.



# श्री विठ्ठल मूर्तीवर रासायनिक प्रक्रियेस महाराज मंडळींचा कडाडून विरोध

### संवर्धनासाठी समिती स्थापन करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ जून -**

श्री विठ्ठलाच्या मुर्तीवर वारंवार रासायनिक प्रक्रिया केल्याने मूर्तीचे नुकसान होत असल्याचा आरोप महाराज मंडळींनी केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांसमवेत आयोजित बैठकीत त्यांनी रासायनिक प्रकियेला कडाडून विरोध केला आहे. मूर्ती संवर्धनासाठी देशातील मूर्ती तज्ज्ञांसह महाराज मंडळींची समिती स्थापन करूनच निर्णय घ्यावा अशी मागणी केली.

श्री विठ्ठल व रूक्मिणीच्या मूर्तीचे जतन व संवर्धन करण्याबाबत श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीने जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्यासमवेत महाराज मंडळींच्या बैठकीचे आयोजन केले होते. यामध्ये महाराज मंडळी हे मूर्ती संवर्धनाबाबत आक्रमक झाले होते. जिल्हाधिकारी व मंदिर समिती सदस्यांबरोबर त्यांची तु तु मैं मै देखील झाली. याबाबत वारकरी पाईक संघ व इतर महाराज मंडळींनी मंदिर समितीस एक निवेदन दिले.आहे.

श्री विठ्ठलाच्या मूर्तीची वारंवार झीज होत असून या कारणास्तव महापूजा बंद केल्या आहेत. तसेच आज पर्यंत तीन वेळा इपॉक्सी अर्थात रासायनिक प्रक्रियद्वारे झीज कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र त्यालाच महाराज मंडळींनी तीव्र विरोध दर्शविला. रासायनिक लेपन प्रक्रिया कुचकामी असून यामुळेच मूर्तीचे नुकसान होत आहे. कोल्हापूर येथील मूर्तीचेही या प्रक्रियेमुळे नुकसान झाल्याचा दावा केला.

मूर्तीचे जतनासाठी वारकरी संप्रदायाची समिती स्थापन करावी. याद्वारेच देशभरातील तज्ज्ञ मूर्ती अभ्यासक निमंत्रित करुन मूर्ती लेपन तज्ज्ञांचे मत जाणून घ्यावे, सेवाधाऱ्यांची मते जाणून घ्यावीत. यानंतरच मूर्ती लेपनविषयी निर्णय घ्यावा अशी मागणी केली.

बैठकीस मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, राणा महाराज भागवत महाराज शिरवळकर, रघुनाथ महाराज कबीर, रामकृष्ण महाराज वीर, राणा महाराज वासकर,नामदेव महाराज लबडे, बापू महाराज उखळीकर, श्रीकांत महाराज टेंभुकर आदी उपस्थित होते.

**पदस्पर्श दर्शन बंद ठेवण्यासही विरोध**

श्री विठ्ठलमुर्ती संत कवनांप्रमाणे स्वयंभू आहे. तसेच ज्ञानदेवांपासून तुकोबारायांपर्यंत संतांनी याच मुर्तीच्या चरणांवर मस्तक टेकवल्याची भावना सकल वारकरी संप्रदायात आहे. त्यामुळे मूर्ती बदलणे या पर्यायाचा विचारही केला जाऊ नये. भारतामध्ये एकमेव अशी स्पर्शदर्शन मूर्ती असल्याने पदस्पर्श दर्शनही कायमस्वरुपी चालू राहणे आवश्यकच असल्याचे मत मांडले.



### आषाढीपूर्वी लेपन करण्याचा प्रयत्न

दरम्यान बैठकी नंतर बोलताना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी, महाराज मंडळींच्या मागणीनुसार इपॉक्सी करणार नसून स्टोन पावडरने मूर्तीची झीज भरून काढली जाईल. यासाठी देशभरातील उत्तम अभ्यासक, तज्ज्ञांना आमंत्रित करुन पुढील आठवड्यात मूर्ती अभ्यासकांसह महाराज मंडळींना श्री विठ्ठलाची मूर्ती दाखवून निरीक्षण करणार आहे. यानंतर आषाढीपूर्वी तीन दिवस पदस्पर्श बंद ठेवून व मुखदर्शन सुरू ठेवून मूर्तीचे स्वरूप न बदलता झीज भरून काढण्याची प्रक्रिया करणार असल्याचे सांगितले.

### ▶▶ महत्वाचे...

### खतांच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण आणण्याची मागणी

**सोलापूर, दि. ६ जून -**

सोलापूर सीड्स फर्टिलायझर अँड पेस्टिसाइड डीलर्स असोसिएशनच्या वतीने केंद्रीय रसायन व खते मंत्री मा. जे. पी. नड्डा यांना रासायनिक खतांच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण आणण्याबाबत निवेदन सादर करण्यात आले आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर १२:३२:१६, १०:२६:२६, २०:२०:०:१३, १६:२०:०:१३, १५:१५:१५ या विविध एनपीके खतांच्या किंमतींमध्ये जानेवारी-फेब्रुवारीच्या तुलनेत मोठी वाढ झाली आहे. युरिया व एसएसपी खतांच्या किमतीतही वाढ झाल्याने शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. असोसिएशनने निवेदनात नमूद केले आहे की, खतांच्या दरवाढीमुळे शेतीचा खर्च प्रचंड वाढत असून त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होत आहे. त्यामुळे केंद्र शासनाने एनपीके व इतर मिश्र खतांच्या एमआरपीवर नियंत्रण ठेवून दर स्थिर ठेवावेत. तसेच युरियाचा अतिवापर टाळण्यासाठी अमोनियम सल्फेटचा पर्याय म्हणून प्रचार व प्रसार करण्याची गरज व्यक्त केली आहे. ही माहिती सोलापूर सीड्स फर्टिलायझर अँड पेस्टिसाइड डीलर्स असोसिएशनचे सचिव बालाजी चौगुले यांनी दिली.

---

### घरनिकी येथे दारु अड्ड्यावर छापा

**मंगळवेढा, दि. ६ जून -**

घरनिकी येथे बेकायदा दारु अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून ३ हजार ६०० रुपये किंमतीची देशी दारु जप्त केली. शांतीनाथ सिध्देश्वर लेंडवे याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी पोलिस हवालदार सुखदेव गंगणे हे दि.४ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता मंगळवेढा ते मारापूर रोडवर गस्त घालीत होते. तेव्हा आरोपी शांतीनाथ लेंडवे स्वतःच्या पत्राशेडच्या पाठीमागे बेकायदा देशी दारुची विक्री करताना सापडला. परिणामी त्याच्यावर महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ ई प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान पोलीसांनी शहर व ग्रामीण भागात बेकायदा दारु विक्री करणाऱ्या अड्ड्यावर छापे टाकून तालुक्यातून दारु हद्दपार करुन अनेकांचे मोडकळीस येणारे संसार वाचवावेत अशी मागणी होत आहे.

# शिवछत्रपती रंगभवन येथील शिवस्मारकाचे रुपडे पालटणार

### पालकमंत्री जयकुमार गोरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ जून-**

शिवछत्रपती रंगभवन येथील शिवस्मारकाचे रुपडे पालटणार असून या ठिकाणाकडे सुशोभिकरण होणार असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

जि.प. माध्यमिक शिक्षण विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते. जि.प. अध्यक्ष दिपक वैद्य, महापौर विनायक कोंड्याल, उपाध्यक्ष इंद्रजित पवार, सीईओ कुशल जैन, सभापती चेतनसिंह केदार, महापालिका सभापती रंजीता चाकोते, सभापती ॲड. अमृता वाघे, सभापती रामप्पा चिवडशेट्टी, सभापती तेजस्वीनी बोराडे, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, डीसीईओ स्मिता पाटील, डीसीईओ सुर्यकांत भुजबळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, नगरसेविका रोहिणी तडवळकर, जि.प. सदस्य नेताजी खंडागळे, नगरसेवक नरेंद्र काळे, विनोद भोसले, शिक्षणाधिकारी कादर शेख प्रमुख उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. स्वराज्य गुढीचे पुजन करणेत आले. प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी केले. सूत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले. महेश कोठीवाले, सायली साठे, बापूसाहेब दळव व कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी शिवगितांचे गायन केले. पालकमंत्र्यांचा अध्यक्ष दिपक वैद्य यांनी शिवचरित्र देऊन सत्कार केला. शिक्षणधिकारी सचिन जगताप यांनी शिवचरित्र भेट देण्याची संकल्पना राबविली. अधिक्षक अनिल जगताप, अविनाश गोडसे, चेतन वाघमारे, समन्वयक अनिल पाटील, रेवणनाथ, मेहताब शेख यांनी परिश्रम घेतले.



# म्हेत्रेंबाबत सीईओंशी बोलून निर्णय; सातपुते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ जून**

समाजकल्याण विभागाचे विस्ताराधिकारी मनोज म्हेत्रे यांच्या निलंबन प्रकरणाची दखल आता जिल्हा परिषद पातळीवर घेतली गेली आहे. या विषयावर मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्याशी चर्चा करून पुढील भूमिका निश्चित केली जाईल, अशी माहिती समाजकल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी दिली आहे.

करमाळा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डॉ. अमित कदम यांनी विस्ताराधिकारी मनोज म्हेत्रे यांना वारंवार गैरहजर राहत असल्याच्या कारणावरून निलंबित केल्याची कारवाई केली आहे. या निर्णयानंतर जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान म्हेत्रे हे समाजकल्याण विभागाचे विस्ताराधिकारी असल्याने या प्रकरणाकडे समाजकल्याण समितीचेही लक्ष गेले आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना सभापती संस्कृती सातपुते यांनी सांगितले की, मनोज म्हेत्रे यांच्या निलंबनासंदर्भातील प्राथमिक माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचली आहे. मात्र, संपूर्ण वस्तुस्थिती आणि प्रशासकीय प्रक्रिया समजून घेतल्यानंतरच यावर भूमिका निश्चित केली जाईल.

या संदर्भातील सर्व बाबी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्यासमवेत चर्चा करून तपासल्या जातील. त्यानंतर नियमानुसार आणि वस्तुस्थितीच्या आधारे पुढील निर्णय घेतला जाईल,'' असे सातपुते यांनी स्पष्ट केले. संस्कृती सातपुते यांनी या प्रकरणाची दखल घेतल्याने आता हे प्रकरण काय वळण घेते याबाबत जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

# चौकशी सीईओंकडे प्रलंबित; तरीही बीडीओंकडून म्हेत्रेंचे निलंबन

### झारीतील शुक्राचार्य कोण? झेडपीत रंगू लागली चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ जून -**

समाजकल्याण विभागात प्रतिनियुक्तीवर कार्यरत मनोज म्हेत्रे आपल्या मूळ नियुक्तीवर करमाळा येथे कामकाजावर अनुपस्थित राहिल्याचा ठपका ठेवत गटविकास अधिकारी डॉ. अमित कदम यांनी त्यांना निलंबित केले. मात्र अनुपस्थितीबाबत दस्तूरखुद्द सीईओ कुशल जैन यांनी म्हेत्रेंना पाठवलेल्या खुलाशाच्या नोटीशीवर म्हेत्रेंचे उत्तर आल्यावर जैन यांच्या निर्णयाआधीच कदम यांनी म्हेत्रेंच्या निलंबनाचा आदेश काढल्याचे समोर आले आहे.

विस्ताराधिकारी मनोज म्हेत्रे यांचे निलंबन झाल्यानंतर दररोज नवीन धक्कादायक माहिती समोर येत आहे. म्हेत्रेंना करमाळा येथे कामावर अनुपस्थित असल्याबाबत नोटिसीवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी खुलासा मागविला. त्यावर म्हेत्रे यांनी खुलासा सादरही केला आहे. जैन यांनी तो मान्य केला की अमान्य हे ठरलेले नसतानाच परस्पर बीडीओ कदम यांनी निलंबनाचा आदेश काढल्याचे समोर आले आहे. वास्तविक सीईओ जैन यांच्या अधिकार क्षेत्रात हे प्रकरण असतानाही कदम यांनी अधिकाराचा गैरवापर करत हे निलंबन केल्याची बाब समोर आली आहे. यामुळे जिल्हा प्रशासनाच्या कामकाजाच्या 'झारीतील शुक्राचार्य कोण'? असा सवाल उपस्थित होत आहे.

समाज कल्याण विभागात दलितवस्ती विकास निधीचे टेबल सांभाळण्यासाठी सक्षम कर्मचारी नसल्याने करमाळा पंचायत समितीकडे बदली झालेल्या विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे यांच्याकडे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी जबाबदारी दिली. त्यासाठी प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव प्रशासनाकडे पाठविला.

पण प्रशासनाने तो मान्य केला नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे बीडिओ कदम यांनी म्हेत्रे यांना नोटिसा काढल्या.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी कदम यांना म्हेत्रे हे समाजकल्याण विभागात काम करत असल्याची कल्पना दिली. त्यानंतर काहीकाळ शांत बसून कदम यांनी म्हेत्रे यांना नोटिसा पाठवण्याचे सत्र चालूच ठेवले. इतकेच काय समाज कल्याणचे हजेरी पाठवूनही नोव्हेंबरपासून त्यांचा पगार बंद केला. यावरून या वादाला तोंड फुटल्याचे दिसून येत आहे.

EXCLUSIVE

### बीडीओ कदम हेही वादग्रस्तच

बीडीओ कदम हे करमाळ्यात वादग्रस्त ठरल्याचे सांगण्यात येत आहे. कार्यालयात ते वारंवार गैरहजर राहतात अशा तक्रारी आहेत. लोकांची कामे खोळंबू लागल्याने पंचायत समितीत बरीच ओरड झाली आहे. ते मूळचे सातारा जिल्ह्यातील असून तेथे त्यांचा खाजगी दवाखाना असल्याची करमाळा तालुक्यात चर्चा आहे. बराच वेळा ते दवाखान्याच्या कामात व्यस्त असल्याचे सांगण्यात येत आहे. मध्यंतरी त्यांनी महिनाभर रजाही काढली होती. अनेक वेळा कार्यालयाला दांडी मारणाऱ्या कदम यांच्यावर आता कारवाई कोण करणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### कदम नेमके कोणाच्या ऐकण्यात

बीडीओ कदम यांना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगूनही ते म्हेत्रे यांच्या बाबतीत दुजाभाव करत असल्याचे दिसून आले आहे. ते नेमके कोणाच्या सांगण्यावरून हे करत होते हे स्पष्ट झालेले नाही.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४६४

**देवकीया उदरीं वाहिला। यशोदा सायासें पाळिला।।**
**का शेखीं उपेगा गेला। पांडवांसी।।**

मोहग्रस्त अर्जुनाला मार्गदर्शन करुन, मोहातुन बोहर काढण्याचा व त्याला युध्दासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न श्रीकृष्ण भगवान करीत आहेत. माऊली म्हणतात की, या अर्जुनाचे भाग्य फारच थोर असले पाहिजे. कारण जगन्नाथ स्वत: याच्या रथाचे सारथ्य करीत आहेत. अर्जुनाला मागे सारुन आपण स्वत: रथ हाकण्याच्या निमित्ताने पुढे झाले आहेत. अर्जुनाला ते कर्मयोग, संन्यासयोग, कर्मयोगी, स्थितप्रज्ञ असे अनेक विषय उत्कृष्टप्रकारे समजावून सांगत आहेत. कित्येक वर्ष तपश्चर्या करणाऱ्यास या परमात्म्याचे सुख व सहवास मिळाला नाही; पण या अर्जुनाला हे सर्व प्राप्त झाले आहे. सहवासात येणाऱ्यांना तसेच भक्ति करणाऱ्यांना तर भगवंतानी एवढा ज्ञान ठेवा सांगीतलाच नाही. साक्षात आई वडीलांनाही सांगीतला नाही. हे सांगतांना माऊली म्हणतात, **देवकीया उदरीं वाहिला । यशोदा सायासें पाळिला का शेखीं।। उपेगा गेला। पांडवांसी।।** अर्थात, हातापायात बेडया असलेल्या तसेच कारागृहात



असलेल्या देवकी मातेने उदरात सांभाळले त्या मातेलाही कांही सांगीतले नाही किंवा तिच्या कोणत्याही उपयोगाला भगवंत आले नाहीत. तसेच भोळेपणाने, अत्यंत लाडाने आपले सर्वस्व अर्पन करुन यशोदा मातेने लहानाचे मोठे केले, त्या मातेच्याही उपयोगाला न येता, या पांडवांच्या म्हणजे अर्जुनाच्या उपयोगाला हा भगंवत आल्याने माऊलींना अत्यंत कौतुकाचे वाटते.

श्रीकृष्ण अर्जुनाच्या उपयोगाला आल्यामुळे अर्जुनाच्या भाग्याचे सामर्थ्य अपार असले पाहिजे असे माऊली म्हणतात. श्रीकृष्णाची प्राप्ती करुन घेण्यासाठी अर्जुनाला प्रदीर्घ तपस्या करावी लागली नाही किंवा योग्य वेळ येण्याची प्रतिक्षा करुन विनंती करण्याचे श्रम करावे लागले नाहीत. अर्थात, अर्जुनाला हा परमात्मा सहजासहजी प्राप्त झाला असुन तो अर्जुनाच्या अंकीतही झाला आहे. अर्जुन वाट्टेल तसा आपला अधिकार भगवंतावर गाजवित आहे. अर्जुनाला भगवंत अधिकार गाजवूही देत आहेत. हे सर्व पाहिल्यानंतर माऊलींना राहावले नाही. म्हणून माऊली म्हणतात की, सख्य, भक्ती असावी ती अर्जुनासारखी. अर्जुनाच्या प्रेमापोटी भगवंत सगुणरुप साकार होऊन त्याचे सारथ्य करीत आहेत. साक्षात भगवंत सारथ्य करीत असल्याने या युध्दभूमीत अर्जुनाचा रथ कोठेही अडखळणार नाही. आपल्या जीवनाचे सारथ्य करण्यासाठी किंवा संसाराचा गाडा सुखाने हाकण्यासाठी भगवंत मिळणे तर कठीण आहे, पण चांगला संत महात्मा मिळाला तरी भरपुर होईल. शोधूनही संत महात्मा सापडला नाही तर संत महात्म्यांनी लिहलेले ग्रंथ तरी आहेत. त्या ग्रंथांना गुरु मानुन रुचेल, पचेल तेवढे त्यातून घ्यावे. जे योग्य वाटते तेवढे जरी त्यातुन घेतले व आपल्या जीवनात उतरविण्याचा प्रयत्न केला तरी आपला या संसाररुपी युध्द भूमीतला रथ कोठेही अडखळणार नाही. ज्ञानामृत आनंदलहरी ही लेखमाला सुध्दा आपल्या जीवनाचे चांगल्याप्रकारे सारथ्य करु शकते. त्यासाठी पाहिजे तो आपला विश्वास आणि आपले वाचनातील सातत्य. श्रीकृष्णांचे जसे अर्जुनावर जीवापाड प्रेम आहे, तसे आपल्यावरही कोणाचे जरी जीवापाड निस्वार्थ प्रेम असेल तर आपल्यासारखा भाग्यवंत तो कोण असणार जर असा निस्वार्थ प्रेम व मार्गदर्शन करणारा कोणी नसेल तर त्याचा शोध आवश्य घ्यावा. संत महात्म्याचे विचार आचरणात आणले तरी न कळत निस्वार्थ प्रेमाची आपली अपेक्षा बऱ्याच अंशी पुर्ण होईल असे वाटते. जय राम कृष्ण हरी।


**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : रविवार,
दि. ७ जून २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - अधिक, कृ. सप्तमी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- धनिष्ठा (०७.५५)
योग - वैधृति (१०.०१)
करण - विष्टी (१५.०७)
राहू काल : रविवार
सायं. ४.३० ते ०६.००

दिनविशेष : ✼ जागतिक अन्न सुरक्षा दिन.
१८९३: महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९२९: हिंदी चित्रपटसृष्टीचे ज्येष्ठ अभिनेते आणि समाजसेवक सुनील दत्त यांचा जन्म.
१९३८: डी. सी. ४ प्रकारच्या विमानाचे प्रथम उड्डाण.
२००२: प्रसिद्ध मराठी कवयित्री, गीतकार आणि लेखिका शांता शेळके यांचे निधन झाले.



## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.६ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून केगांव सोलापूर येथील सिंहगड पब्लिक स्कूल येथे दि. ५ जून रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत वाईल्डलाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशन या संस्थेच्या वतीने चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेत ज्येष्ठ पक्षीतज्ञ शिवानंद हिरेमठ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर चिमण्यांसाठी पर्यावरणपूरक कृत्रिम घरटे निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली ज्यामध्ये संस्थेचे अजित चौहान, संतोष धाकपाडे व सुरेश शिरसागर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना चिमण्यांसाठी पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करून कृत्रिम घरटे कसे बनवायचे याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. यानंतर मुलांनी सुद्धा या प्रत्यक्षिकाचे अनुकरण करत अनेक घरटी बनवली. सिंहगड पब्लिक स्कूलचे कॅम्पस संचालक संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका शाहीन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, उपमुख्याध्यापिका निखत शेख, सहशिक्षक स्वप्नजा आराध्ये, अमीना शेख, प्रियांका गोरे, देवयानी शेलार, स्मिता कलशेट्टी, फरीना तांबोळी, प्रियांका बिराजदार, अमोल नवले, संघमित्रा कांबळे, आस्मा शेख उपस्थित होते.

# सोलापुरात शिवराज्याभिषेकाचा जल्लोष

## पालकमंत्री, महापौराच्या हस्ते महाराजांच्या मूर्तीवर अभिषेक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

सोलापूर शहरात शनिवारी सकाळी श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे राज्याभिषेक सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी शिवभक्तांची मोठी उपस्थिती लाभली असून संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

कार्यक्रमास जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वर देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, शहराध्यक्षा रोहिणी तळवळकर, स्थायी समिती अध्यक्षा रंजना चाकोते, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनीष देशमुख यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

तसेच श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्ट अध्यक्ष नाना काळे, उत्सवाध्यक्ष जयवंत सलगर, ट्रस्ट सदस्य राजन जाधव, अंबादास शेळके, बजरंग जाधव, प्रकाश ननवरे तसेच नगरसेवक विनोद भोसले, किरण भंडारी, सदाशिव पवार, विजय पुकाळे, नागेश खरात, महेश देवकर, दादा सुरवसे आदी मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले.

राज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. सकाळच्या सत्रात महाराजांच्या मूर्तीचे पुजन करून विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर जिजाऊ वंदना सादर करण्यात आली आणि दुग्धाभिषेकाचा कार्यक्रम पार पडला. याचबरोबर मध्यवर्ती महामंडळाच्या उत्सव मूर्तीचीही पूजा करण्यात आली.

## छत्रपती शिवरायांच्या आदर्श विचारांचे आचरण आवश्यक : महापौर



**सोलापूर :** शिवराज्याभिषेकदिनानिमित्त आज शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महापौर कोंड्याल यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा आदर्श समाजाने अंगीकारण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमास नगरसेवक विनोद भोसले, माजी उपमहापौर पद्माकर काळे, राजन जाधव, जयवंत सलगर, अंबादास शेळके, बजरंग जाधव, प्रकाश ननवरे, सदाशिव पवार, नागेश खरात, विजय पुकाळे, किरण भंडारी, देविदास घुले उपस्थित होते.



## मुद्रा सनसिटी येथील गंभीर नाला समस्येची महापौरांनी घेतली दखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

अक्कलकोट रोड येथील मुद्रा सन सिटी परिसरातील रहिवाशांनी नव्याने प्रस्तावित करण्यात येणारा ओपन नाला बंदिस्त स्वरूपात करण्यात यावा, या मागणीसंदर्भात दिलेल्या निवेदनाची आज महापौर विनायक कोंड्याल यांनी प्रत्यक्ष भेट देऊन दखल घेतली.

यावेळी महापौर कोंड्याल यांनी संबंधित परिसराची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला व त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. रहिवाशांनी पूर्वी ओपन नाल्यातून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे निर्माण झालेल्या दुर्गंधी, आरोग्यविषयक समस्या तसेच लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली. नागरिकांच्या मागणीची गांभीर्याने दखल घेत महापौर श्री. विनायक दादा कोंड्याल यांनी महानगरपालिका आयुक्तांशी चर्चा करून सदर नाला बंदिस्त स्वरूपात कशा प्रकारे करता येईल, याबाबत तांत्रिक व प्रशासकीय स्तरावर नियोजन करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी नागरिकांना दिले.

महापौरांनी सांगितले की, नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेला प्राधान्य देऊन या विषयाचा सकारात्मक विचार करण्यात येईल तसेच संबंधित विभागाकडून आवश्यक अहवाल मागवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.यावेळी नगरसेवक प्रथमेश कोठे, माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे, उपअभियंता प्रकाश दिवाणजी तसेच मुद्रा सन सिटी येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहरातील सर्व स्मशानभूमीत ५५०० वृक्षारोपण करणार

## मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या वाढदिवसानिमित्त विश्व हिंदू महासंघातर्फे विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या वाढदिवसानिमित्त विश्व हिंदू महासंघाच्या वतीने सोलापुरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत सोलापूर शहरातील विविध स्मशानभूमीमध्ये ५५०० वृक्षारोपण करण्यात येणार आहेत. यासह विविध सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. दरम्यान, हिंदू राष्ट्र निर्मितीसाठी विश्व हिंदू महासंघ प्रयत्नशील आहे, अशी माहिती महासंघाचे प्रदेश युवक अध्यक्ष राहुल बोहरा यांनी पत्रकार परिषदेत दिली.



उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा वाढदिवस हिंदू स्वाभिमान दिवस म्हणून साजरा केला जात आहे. या निमित्ताने सोलापुरात महासंघाच्या वतीने पंधरा दिवस विविध उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. या पत्रकार परिषदेस राष्ट्रीय संघटन महामंत्री तुषार बोहरा, नंदकुमार झंवर, सतीश आनंदकर, सुयश खानापुरे, कपिल कोळी, सागर तांबोळकर, उपेंद्र दासरी आदी उपस्थित होते.

## 'प्रत्येकाची जीवनशैली निसर्गस्नेही हवी'



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

मानव जातीचे अस्तित्व टिकविण्यासाठी व शाश्वत विकासासाठी नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन हा विषय केवळ चर्चेचा विषय न राहता तो प्रत्येकाचा जगण्याचा, आचरणाचा विषय झाला पाहिजे. प्रत्येकाची जीवनशैली निसर्गस्नेही हवी.त्यासाठी तरुणांनी पुढाकार घेतला पाहिजे असे प्रतिपादन फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलांचे, सोलापूर यांच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. एम. एम. बिडकर हे होते. तर व्यासपीठावर एफ. पी. ए.आय. सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, सदस्या प्रा. डॉ. विजया महाजन, डॉ. राजीव प्रधान, कवि मारुती कटकधोंड, भरत काटीकर व शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे वरिष्ठ गटनिदेशक मयुरी महेर, गटनिदेशक आर. एम. कंपनी, गटा निदेशक एन.एस.एस. कार्यक्रमअधिकारी श्रीमती म्हेत्रे एन. एस., बाळकृष्ण पुतळे, संकेत साखरे, अनिल मसरे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. विजया महाजन यांनी केले. तर आभार आयेशा रंगरेज यांनी मानले.

## पी. एस. स्कूलमध्ये २००१च्या बॅचचा स्नेहमेळावा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

पी. एस. इंग्लिश मिडियम हायस्कूलचा २००१ च्या बॅच चा स्नेह मेळावा संपन झाला. सर्वांनी आपल्या शाळेच्या आठवनी ताज्या केल्या. कार्यक्रमास ५२ जणांची उपस्थिती होती.

सोलापूर, पुणे, मुंबई, हैदराबाद या ठिकनाहून माजी विद्यार्थी आले होते.

यावेळी नितेश श्रीवास्तव, सुरेश सांकला, लक्ष्मीकांत मंत्री, गोविंद दायमा, संदीप मेहरवाडे, राजतिलक धांगे, स्वप्नजा मेहता, स्वप्ना कोतळी, अर्चना धोंगरे, पूजा गुरव उपस्थित होते.

सूत्रसंचालन कोमल रावती कोंडा व प्रियंका शाह यांनी केले. कार्यक्रम यशवी करण्यासाठी स्वप्नील पुंगलिया, नवल कासत, गोपाल लड्ढा, सुनील करवा, दिप्ती शहा, निशा शेटे यांनी परिश्रम केले.

## प्रश्न एका कर्मचाऱ्याचा नसतो; तो व्यवस्थेच्या विश्वासाचा असतो

सरकारी कार्यालयांमध्ये नियम, कायदे आणि शिस्त यांची चर्चा नेहमीच होत असते. मात्र एखाद्या कर्मचाऱ्यावर कारवाई झाल्यानंतरच जर नियमांची आठवण होत असेल, तर त्या कारवाईपेक्षा व्यवस्थेची अवस्था अधिक चिंताजनक मानावी लागते. सध्या जिल्हा पातळीवरील एका प्रशासकीय कारवाईनंतर नेमका हाच प्रश्न चर्चेत आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक वेगळीच कार्यपद्धती रुजलेली दिसते. एखादा कर्मचारी एका कार्यालयाच्या आस्थापनेवर असतो; पण प्रत्यक्षात तो दुसऱ्या विभागात काम करत असतो. काहींना वरिष्ठांची मौखिक मान्यता असते, काहींना लेखी आदेश असतात, तर काही जण गरजेनुसार विविध शाखांमध्ये काम पाहत असतात. ही पद्धत नवीन नाही. प्रशासनातील कामकाज सुरळीत चालावे, मनुष्यबळाची कमतरता भरून निघावी आणि तातडीची कामे मार्गी लागावीत यासाठी अनेकदा अशा व्यवस्था उभ्या राहतात. परंतु प्रश्न तेव्हा निर्माण होतो, जेव्हा अशाच व्यवस्थेत काम करणाऱ्या एखाद्या कर्मचाऱ्यावर अचानक नियमांचा बडगा उगारला जातो. मग चर्चा त्या व्यक्तीची राहत नाही; चर्चा सुरू होते ती व्यवस्थेतील समानतेची. कारण एका व्यक्तीवर लागू होणारा नियम इतरांनाही लागू झाला पाहिजे, हीच लोकशाही प्रशासनाची मूलभूत अट आहे. आज अनेक कार्यालयांमध्ये अशी परिस्थिती आहे की, मूळ नियुक्ती एका ठिकाणी आणि प्रत्यक्ष काम दुसरीकडे. काही कर्मचारी मुख्यालयात, काही विशेष प्रकल्पांमध्ये, काही योजनांच्या अंमलबजावणीत तर काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली वेगळ्या जबाबदाऱ्या सांभाळत असतात. अनेक वेळा ही व्यवस्था अधिकृत कागदोपत्री नसते, पण सर्वांना माहिती असते. काम चालत असते, बैठका होत असतात, अहवाल तयार होत असतात आणि प्रशासकीय गाडी पुढे सरकत असते. मात्र जेव्हा एखाद्या प्रकरणात कारवाईचा निर्णय घेतला जातो, तेव्हा व्यवस्थेतील दुटप्पीपणा उघड होण्याची शक्यता वाढते. कारण प्रश्न उपस्थित होतो की, जर ही पद्धत चुकीची होती, तर ती इतकी वर्षे सुरू कशी राहिली? आणि जर ती योग्य होती, तर अचानक एका व्यक्तीवरच कारवाई का? याच ठिकाणी प्रशासनाची विश्वासार्हता कसोटीवर लागते. नियमांची अंमलबजावणी निवडक स्वरूपात झाली, तर कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होतो. प्रशासनाविषयीचा विश्वास कमी होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढते. गेल्या काही वर्षांत अधिकारांचे विकेंद्रीकरण हा शब्द खूप चर्चेत आला. निर्णय प्रक्रिया जलद व्हावी, स्थानिक स्तरावर प्रश्न सोडवले जावेत आणि वरिष्ठ कार्यालयांवरील ताण कमी व्हावा, यासाठी अनेक अधिकार खालच्या स्तरावर देण्यात आले. हा निर्णय तत्त्वत: योग्य असला तरी त्याच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. अधिकार देताना जबाबदारी, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांची सांगड घालणे तितकेच आवश्यक असते. अन्यथा अधिकार हे प्रशासन सुलभ करण्याचे साधन न राहता वाद निर्माण करणारे हत्यार बनू शकतात. कर्मचाऱ्यांमध्ये सध्या याच बाबतीत चर्चा सुरू आहे. निर्णय वस्तुनिष्ठ आहेत की व्यक्तिनिष्ठ, नियम सर्वांसाठी सारखे आहेत की निवडक, आणि कारवाई प्रशासनिक गरज म्हणून होते की दबावाचे साधन म्हणून, असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या संपूर्ण घडामोडींचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे राजकीय आणि प्रशासकीय जबाबदारी. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा असतो. अनेक वेळा कामे पूर्ण करण्यासाठी लवचिकता आवश्यक असते. मात्र ही लवचिकता नियमांच्या चौकटीत राहिली पाहिजे. अन्यथा भविष्यात त्याच गोष्टी वादाचे कारण बनतात. आज गरज आहे ती व्यक्तीवर चर्चा करण्याची नाही, तर

### जिल्हा परिषदेतून



**यशवंत गुरव**
**मो. ८८८८६५०७५५**

व्यवस्थेचा आरसा पाहण्याची. एका प्रकरणाच्या निमित्ताने संपूर्ण कर्मचारी व्यवस्थापन, प्रतिनियुक्त्या, विशेष नियुक्त्या, अतिरिक्त जबाबदाऱ्या आणि अधिकारांचे विकेंद्रीकरण यांचा आढावा घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. जर खरोखरच नियमभंग झाला असेल, तर तो सर्वांसाठी समान निकषाने तपासला गेला पाहिजे. आणि जर व्यवस्थेतील त्रुटींमुळे अशी परिस्थिती निर्माण झाली असेल, तर त्या त्रुटी दुरुस्त करण्याचे धाडस प्रशासनाने दाखवले पाहिजे. कारण एखाद्या व्यक्तीवर कारवाई करून प्रश्न संपत नाहीत; अनेकदा तेथूनच खरे प्रश्न सुरू होतात. सध्या प्रशासनासमोर उभा राहिलेला सर्वात मोठा प्रश्न म्हणजे 'समान न्याय'. हा प्रश्न केवळ कर्मचाऱ्यांचा नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा आहे. नियमांचा वापर शिस्त प्रस्थापित करण्यासाठी होणार की निवडक कारवाईसाठी, याचे उत्तर आता प्रशासनालाच द्यावे लागणार आहे. एका कारवाईने अनेक फाईली उघडल्या आहेत. अनेक वर्षांपासून गृहीत धरलेल्या पद्धतींवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. आता या चर्चेतून अधिक पारदर्शक, अधिक उत्तरदायी आणि सर्वांसाठी समान नियम असलेली व्यवस्था उभी राहते की पुन्हा एकदा विषय काळाच्या पडद्याआड जातो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### पुणे रेल्वे पोलिसांच्या तत्परतेमुळे परिक्षार्थींची हरवलेली बॅग मिळाली परत

**जेऊर, दि. ६ जून-**

पुणे रेल्वे पोलिसांच्या सतर्कतेमुळे आर्मी भरती परीक्षेसाठी आलेल्या करमाळा तालुक्यातील विद्यार्थ्यांची महत्त्वाच्या कागदपत्रांची बॅग अवघ्या दोन तासांत परत मिळाली. त्यामुळे विद्यार्थ्यांना निश्चिंतपणे परीक्षा देता आली. करमाळा तालुक्यातील वरकटणे येथील ज्ञानेश्वर जगताप, संकेत गरड आणि त्यांचे दोन मित्र आर्मी भरतीच्या परीक्षेसाठी पुण्यात आले होते. परीक्षा हडपसर येथे असल्याने सकाळी सातच्या सुमारास त्यांनी पुणे रेल्वे स्थानकावरून रिक्षाने हडपसरकडे प्रस्थान केले. मात्र परीक्षा केंद्रावर पोहोचल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की प्रवेशपत्र व इतर महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग चुकून रिक्षातच राहिली आहे. रिक्षाचा क्रमांक किंवा चालकाची माहिती नसल्याने विद्यार्थ्यांची मोठी अडचण झाली. कागदपत्रांशिवाय परीक्षा देता येणे शक्य नसल्यामुळे ते तातडीने पुन्हा पुणे रेल्वे स्थानकावर आले. तेथे त्यांनी रेल्वे पोलिस दलातील पोलिस उपनिरीक्षक राजू जाधव तसेच करमाळा तालुक्यातील रेल्वे पोलिस हवालदार नवनाथ नाईकनवरे यांच्याशी संपर्क साधला. जाधव व नाईकनवरे यांनी वाहतूक विभागातील सहकारी एस. के. सावंत यांच्या मदतीने रेल्वे स्थानकाबाहेरील रिक्षा चालक व रिक्षा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधला. रिक्षाचालकांच्या व्हॉट्सअॅप समूहांवर विद्यार्थ्यांच्या हरवलेल्या बॅगेबाबत संदेश प्रसारित करून बॅग परत करण्याचे आवाहन करण्यात आले.



### अखिल भारतीय शिवाचार्य संस्थेतर्फे मुख्यमंत्री शिवकुमार यांचा सत्कार

**सोलापूर, दि.६ जून-**

अखिल भारतीय शिवाचार्य संस्थेच्यावतीने कर्नाटकाचे नूतन मुख्यमंत्री डी.के.शिवकुमार यांचा सत्कार करण्यात आला. अखिल भारतीय शिवाचार्य संस्थेचे अध्यक्ष सिंदगी सारंग मठाचे मठाधिपती डॉ प्रभू सारंग देव शिवाचार्य महास्वामीजी, उपाध्यक्ष नागणसूर मठाचे मठाधिपती श्री श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी, हुक्केरी मठाचे मठाधिपती श्री चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी, बेंगळुरू मठाचे मठाधिपती महांतलिंग शिवाचार्य महास्वामीजी, शहापूर मठाचे मठाधिपती सुगुरेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्यासह अन्य मठाचे मठाधिपती, अखिल भारतीय वीरशैव महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा मंत्री ईश्वर खंड्रे, इलकलचे आमदार काशपनवरु, कलबुर्गी जिल्हा अध्यक्ष शरणू मोदी उपस्थित होते.



### एकता महिला मंचतर्फे वृक्षारोपण

**वैराग, दि. ६ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून एकता महिला मंच शाखा जामगांव (आ), (ता. बार्शी) यांच्या वतीने मंचच्या सर्व सदस्यांनी एकत्र येत आपल्या घरासमोरील मोकळ्या जागेत आणि परिसरात विविध वृक्षांचे रोपण केले. यावेळी सरिता कुलकर्णी, शामबाला सुतार, स्नेहल तळेकर, स्वाती सुतार, उषा ठाकूर यांच्यासह गावातील इतर प्रमुख पदाधिकारी व महिला सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



### महापालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ६ जून-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस उपायुक्त सोनाली यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय अधिकारी श्रीमती सुनीता हिबारे, मध्यवर्ती शिवजन्मोउत्सव ट्रस्टचे अध्यक्ष पद्माकर काळे, नगरसेवक विनोद भोसले , अंबादास शेळके, प्रकाश ननावरे, अंबादास सपकाळ विजय पोकळे, दादा सुरवसे, संदीप साळुंखे तसेच कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, माऊली पवार, श्रीनिवास रामगल, अजय क्षीरसागर, चंद्रकात दोतुल, माने जयप्रकाश आमनगी, श्रीकांत घोलप, विशाल जाकंनदर, भास्कर सामलेटी सिद्धू तिमीगार उपस्थित होते.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी वृक्षारोपण करुन संगोपनाची घेतली शपथ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत जिल्ह्यातील विविध संस्था, संघटनांतर्फे ठिकठिकाणी वृक्षारापेण करुन पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. केवळ औपचारिकता म्हणून वृक्षारोपण न करता, झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला आहे. यावेळी वृक्षारोपण करून घेतली संगोपनाची सामूहिक शपथ घेतली. केवळ वृक्षारोपण न करता लावण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षाचे संगोपन आणि संवर्धन करण्याचा निर्धारही यावेळी करण्यात आला.

## विविध संस्था, संघटनांतर्फे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा

### १ हजार वृक्ष लागवड करणार; बार्शी शहर पोलिसांचा संकल्प



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत बार्शी शहर पोलीस ठाण्याच्यावतीने शुक्रवार, दि. ५ जून रोजी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संरक्षण, हरित शहर निर्मिती आणि सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बार्शी शहरातील व्ही. के. मार्ट परिसरातील मोकळ्या जागेत विविध प्रजातींच्या १५ वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरणाचे रक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून, वृक्षसंवर्धनाशिवाय हरित भविष्याची कल्पना अशक्य असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

**बार्शी शहरासाठी १ हजार वृक्षांचा संकल्प**

आजच्या प्रातिनिधिक वृक्षारोपण कार्यक्रमासोबतच बार्शी शहर पोलीस ठाण्याने आगामी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प जाहीर केला आहे. पावसाळा सुरु झाल्यानंतर बार्शी शहर व परिसरात सुमारे १ हजार वृक्षांची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले असून, पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

कार्यक्रमास वृक्ष संवर्धन समितीचे पदाधिकारी, व्ही. के. मार्टचे संचालक, बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार उपस्थित होते.



### निसर्ग लोकसंचलित साधन केंद्र, मंद्रुप

महिला आर्थिक विकास महामंडळ सोलापूर अंतर्गत नवतेजस्वीनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमाअंतर्गत, निसर्ग लोकसंचालित साधन केंद्र मंद्रूपमार्फत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मंद्रूप, अकोले मंद्रूप, बसवनगर, माळकवठे येथे वृक्षारोपण, हवामान बदल प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी १०० झाडे लावून जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. यावेळी महिला आर्थिक विकास महामंडळ सोलापूरचे सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी दिपक टेकाळे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महिलांना रोपे वाटप करण्यात आली. वृक्षारोपण करण्यात आला. यावेळी व्यवस्थापिका रेखा कदम, लेखापाल स्वाती घेरडे, विनायक ख्याडे सहयोगीनी अनिता कोरे, यशोदा पुजारी, अर्चना शिंदे, सविता टिंगरे, मनिषा केवटे व बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एकता महिला मंच, पांगरी



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून बार्शी तालुक्यातील पांगरी येथे एकता महिला मंचच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. पांगरी येथील एकता महिला मंचच्या सदस्यांनी आपापल्या घरासमोरील मोकळ्या परिसरात विविध प्रकारच्या पर्यावरणपूरक झाडांची लागवड केली. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि वसुंधरेचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगवणे गरजेचे आहे, असा संदेश या माध्यमातून देण्यात आला. वृक्षारोपणानंतर उपस्थित सर्व महिलांनी लावलेल्या झाडांच्या नियमित संगोपनाची सामूहिक शपथ घेतली. यावेळी सोनाली बगाडे, सारिका काळे, अश्विनी गाढवे, सुवर्णा वासकर, पल्लवी राऊत, प्रतिभा वासकर, लक्ष्मी पवार उपस्थित होते.



### तरटगावं-शिंगोली येथे वृक्षारोपण

पृथ्वीचे रक्षण करायचे असेल तर आणि पुढच्या पिढीचे भविष्य सुरक्षित करायचे असेल तर झाडे लावून जोपासणे आणि वाढवणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन भाजपा महिला मोर्चा मोहोळ दक्षिण मंडलाच्या सरचिटणीस दिपाली कोरे यांनी केले. पर्यावरण दिनानिमित्त मोहोळ तालुक्यातील तरटगांव - शिंगोली येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. दिपाली कोरे भाजपा सरचिटणीस महिला मोर्चा (दक्षिण मंडल)यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावर्षी जांभूळ, वड आणि पिंपळ, नारळ, प्रजातीची झाडे लावण्यात आली. या उपक्रमाचे हे सलग ४थे वर्ष असून आत्तापर्यंत दहा झाडे जगविण्यात आली आहेत.

यासाठी भाजप दक्षिण मंडळाचे अध्यक्ष रमेश माने, जिल्हा चिटणीस आणि विधानसभा प्रमुख महेश सोवनी आणि जिल्हा सदस्य अविनाश पांढरे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी मंजुळा बिराजदार, अनुसया वाघमारे, मीनाक्षी अधटराव, छाया वाघमारे, विद्या बसाटे, पुतळाबाई वाघमारे, कमल कोरे उपस्थित होत्या. मंडळ अध्यक्ष रमेश माने यांचे मार्गदर्शन लाभले.

### कुंभारी ग्रामपंचायत




जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कुंभारी ग्राम पंचायतीच्या वतीने विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. सरपंच श्रुती निकंबे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा पार पडली. यावेळी पंचायत समिती सदस्य सुरज पाटील, माजी सरपंच गेनसिद्ध भोरगुंडे, माजी उपसरपंच विजयकुमार शबाशे, महानगरपालिकेचे सेवानिवृत्त अधिकारी सुभाष निकंबे, नागनाथ निकंबे, प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या डॉ. मंगरुळे, ग्रामपंचायत कर्मचारी महादेव माळी, शशिकांत बिराजदार, जेटप्पा नाटेकर, राजकुमार पट्टणशेट्टी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या श्रुती भोरगुंडे, सरपंच श्रुतीताई निकंबे, ग्रामविकास अधिकारी प्रेमदास पवार यांनी पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती करताना सांगितले की, 'पर्यावरणाचे संरक्षण ही काळाची गरज असून प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. स्वच्छता, वृक्षसंवर्धन आणि प्लास्टिकमुक्त जीवनशैलीचा स्वीकार केल्याशिवाय निरोगी व शाश्वत भविष्य घडू शकत नाही. ग्रामसभेत 'स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू' या संकल्पनेवर चर्चा करण्यात आली. केंद्र शासनाच्या मिशन लाईफ उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी, घनकचरा व्यवस्थापन, ओला व सुका कचरा वेगळा संकलित करण्याची आवश्यकता तसेच सिंगल युज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामसभेनंतर ग्रामपंचायत आवारात वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. उपस्थित मान्यवरांनी विविध वृक्षांची लागवड करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.

### रेल्वे रुग्णालय



मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातर्फे डॉ. कोटणीस मेमोरियल रेल्वे रुग्णालय येथे औषधी वनस्पती प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनात औषधी वनस्पतींच्या सुमारे ५५ विविध प्रकारांचा समावेश होता, ज्याद्वारे अभ्यागतांना आयुर्वेदिक/औषधी वनस्पतींचा समृद्ध वारसा आणि पर्यावरण संवर्धन यांबाबत मोलाची माहिती मिळाली. प्रत्येक वनस्पतीसोबत तिचे शास्त्रीय नाव, औषधी गुणधर्म आणि आरोग्यासाठी होणारे फायदे यांची माहिती देणारे फलक लावण्यात आले होते, ज्यामुळे अभ्यागतांना त्यांचे महत्त्व सविस्तरपणे समजण्यास मदत झाली. हे प्रदर्शन दिवसभर अभ्यागतांसाठी खुले ठेवण्यात आले होते. यावेळी अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक, मुख्य वैद्यकीय अधीक्षक आणि सहाय्यक मुख्य वैद्यकीय अधीक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

## माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष कर्जमाफीकडे

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ६ जून-**

विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्ज माफी करण्याचे आश्वासन दिले होते. त्या दृष्टीने सरकारने सध्या पाऊल उचलले आहे .सरकारने ३१ मार्च २०१९ ते मार्च २०२५ पर्यंत घेतलेले व ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या खातेदारांना दोन लाखापर्यंतची कर्ज माफी देण्यात येणार आहे. तर दोन लाखाच्या वर असणारी रक्कम शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत भरावयाची आहे.

सदरची रक्कम भरल्याशिवाय त्या शेतकऱ्यांना कर्ज माफीचा लाभ मिळणार नाही.सोलापूर जिल्ह्यात सध्य परिस्थिती नियमीत कर्ज भरणारयांची संख्या मोठी आहे.तर राजमाता अहिल्यादेवी होळकर कर्ज माफी सध्याच्या आकडेवारीनुसार दोन लाखापर्यंत कर्ज माफ होणारांची संख्या आठ हजार तर प्रोत्साहन पर अनुदानाचा लाभ जवळपास ८५ हजार शेतकऱ्यांना होणार आहे. सध्या सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक व सोसायटया यांच्याकडील माहीतीच उपलब्ध आहे. इतर बँकांची माहीती अद्यापपर्यंत उपलब्ध नाही. माळशिरस तालुक्यात निकषात ११०९ तर नियमीतपणे कर्ज भरणारे १७६८९ एवढे खातेदार आहेत. मात्र इतर सर्व बँकांची माहीती मिळाल्यानंतर ही आकडेवारी बदलेल. पण सध्या शासनाने जाहीर केलेल्या कर्ज माफीची संपूर्ण प्रकिया समोर आली आहे. सरकारने ३० जूनपूर्वी कर्ज माफी करणार असल्याचे सांगीतले होते.

मात्र कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी ३१ मे रोजी चौंडी येथील अहिल्यादेवी होळकर जयंती कार्यक्रमात दहाच दिवसांत शेतकऱ्यांची कर्ज माफी करणार असल्याचे स्पष्ट संकेत दिल्यामुळे शेतकऱ्यांचे लक्ष सध्या केवळ आणी केवळ कर्ज माफीकडे लागले आहे .पण याची अंमलबजावणी होऊन प्रत्यक्ष लाभ केव्हा मिळणार. तर या कर्ज माफी संबंधित शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या अध्यक्षतेखालील समीती नेमली आहे. ही समिती कर्जमाफीची प्रत्यक्ष अंमलबजावणी व रूपरेषा स्पष्ट करणार आहे. तर या कर्ज माफीत कर्ज न भरणारांना मोठा म्हणजे दोन लाखाचा लाभ तर व्याजाने काढून किंवा उसनवारी करुन नियमीत कर्ज भरणाऱ्यांना मात्र फक्त ५० हजारांचा लाभ यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी नाराजी आहे. पण या निकषात शासन काही बदल करेल असे अजिबात वाटत नाही. शासनाने तसा आदेश काढला आहे तसेच मंत्रीमंडळानेही याला अंतिम मंजुरी दिली आहे. काही असो पण जो काही असेल तो लाभ कधी मिळतोय याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



### यशवंतनगर सावित्रीबाई फुले लोकसंचलित साधन केंद्र, अकलूज

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), सोलापूर अंतर्गत नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण प्रकल्प अंतर्गत, कार्यरत सावित्रीबाई फुले लोकसंचलित साधन केंद्र, यशवंतनगर यांच्या वतीने यशवंतनगर-अर्जुननगर येथे विविध पर्यावरणपूरक कार्यक्रमाचे आयोजन करून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी माळिशरस वन विभागाचे विजय काळे व दिघे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.त्यांनी पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन तसेच पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.तसेच सीएमआरसीचे उपजीविका विकास सल्लागार आकाश लोंढे यांनी पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक सहभागाचे महत्त्व उपस्थितांना पटवून देत मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते शंभर विविध वृक्षांचे वाटप करण्यात आले. तसेच या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेऊन वृक्ष लागवड व संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास लेखापाल सविता क्षीरसागर, मनीषा गवळी, गौरी माने-देशमुख तसेच विविध बचत गटांच्या अध्यक्षा, सचिव व गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे नियोजन सावित्रीबाई फुले लोकसंचलित साधन केंद्राच्या व्यवस्थापक तनुजा पाटील यांनी केले.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तांबेवाडी तांड्यात ३५ टन अवैध लाकूडसाठा जप्त; १२ ते १३ शेतकऱ्यांवर गुन्हे



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ६ जून -**

बार्शी तालुक्यातील तांबेवाडी तांडा येथे वनविभागाने एक मोठी कारवाई केली आहे. विनापरवाना आणि बेकायदेशीरपणे तोडलेला सुमारे ३० ते ३५ टन लाकडाचा साठा वनविभागाच्या पथकाने जप्त केला आहे. १२ ते १३ शेतकऱ्यांवर 'महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) अधिनियम १९६४' अंतर्गत वन गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी वनविभागाने ३ जून रोजी तांबेवाडी तांडा येथील काही शेतकऱ्यांनी आपल्या मालकीच्या शेतक्षेत्रात आणि घराच्या आसपासच्या परिसरात कोणत्याही प्रकारची कायदेशीर परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड केली आहे, अशी गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर वनविभागाच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला. धडक कारवाईमुळे परिसरात अवैध वृक्षतोड करणाऱ्या लाकूडमाफियांचे आणि संबधितांचे धाबे दणाणले आहेत.

ही कारवाई सोलापूरचे उपवनसंरक्षक कुलराज सिंह आणि सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो) अजित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. बार्शीचे वनपरिक्षेत्र अधिकारी एस. एस. बडे, वनपाल: डी. बी. शिदोडकर, ए. आर. पिरजादे, वनरक्षक: बालाजी धुमाळ, सचिन पुरी, करामत अली शेख, सुलतान शेख, पूजा खेणे, वनमजूर: आशा अन्सारी, वाहन चालक: सिद्धेश्वर जाधव आणि शाबाज मुल्ला आदींनी पार पाडली.

## महत्त्वाचे...



### शिवराज्याभिषेक दिनानिमित्त संपर्क प्रमुख खा. धैर्यशील माने यांच्यावतीने अभिवादन

**सोलापूर, दि. ६ जून-**

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवसेनेचे संपर्क प्रमुख खा. धैर्यशील माने हे सोलापूर दौऱ्यादरम्यान असताना शिवस्मारक, स्टँड चौक, निराळे वस्ती तसेच जय भोलेनाथ मंडळ येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जय भोलेनाथ मंडळ येथे आयोजित रक्तदान शिबिरास भेट देऊन रक्तदात्यांचे व आयोजकांचे कौतुक केले. यावेळी खासदार डॉ.ज्योती वाघमारे, नगरसेवक अमोल शिंदे, ज्ञानेश्वर सपाटे, साईनाथ अभंगराव, अमर पाटील, मनीष काळजे, श्रीकांत गाडेकर, रवी गोणे, रियाज मुलानी, किरण पाटील, ब्रह्मदेव गायकवाड उपस्थित होते.



### संभाजी आरमारतर्फे शिवराज्याभिषेक दिन साजरा

**सोलापूर, दि. ६ जून-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपती रंगभवन चौक येथे संभाजी आरमारने अभिवादन कार्यक्रम केला. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे व कार्याध्यक्ष नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांच्या हस्ते शिवरायांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करण्यात आला. शिवरायांच्या मूर्तीवर पुष्पवृष्टी करत मावळ्यांच्या शिवघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी सरचिटणीस गजानन जमदाडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, प्रदेश संघटक प्रकाश डांगे, शहरप्रमुख सागर ढगे, जिल्हा संघटक अमीत कदम, अर्जुन शिवसिंगवाले, शहर संघटक राज जगताप, रेवण कोळी, महिला आघाडीच्या शहरप्रमुख संध्या हेब्बाळकर, जिल्हा संघटक ॲड. गीता पवार, उमा रजपूत, शोभा घंटे, जानव्ही पतंगे, कोमल कोलकुंदी उपस्थित होते.



### राष्ट्रतेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेच्यावतीने वृक्षारोपण

**सोलापूर, दि. ६ जून-**

राष्ट्रतेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, दहिटणे, सोलापूर यांच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित वृक्षारोपण कार्यक्रम आमदार विजय देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत अधिकाधिक वृक्ष लागवड व संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येक नागरिकाने या चळवळीत सहभागी व्हावे, असे मत आमदार विजय देशमुख यांनी व्यक्त केले. यावेळी संस्थेचे ट्रस्टी अध्यक्ष सुरेश बिराजदार, नगरसेवक अविनाश पाटील, ज्ञानेश्वर कारभारी, बसवराज इटकळे, संजय कणके, राजेश दिड्डी, सतीश भरमशेट्टी उपस्थित होते.

### एकाला मारहाण; सहा जणांवर गुन्हा

**मोहोळ, दि. ६ जून-**

तू भाजपमध्ये राहून आमचे विरुद्ध काम केला, तुला आज खल्लास करून टाकतो तुला लय मस्ती आली आहे, असे म्हणत रॉड, बांबू, लाथाबुक्याने मारहाण केली म्हणून ६ जणांवर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मोहोळ येथील बागवाननगर मध्ये राहणारे अकबर फरास यांची पत्नी दूध आणण्यासाठी गेली असता त्यांच्या घरासमोर राहणारे रफिक शेख यांनी तुझ्या मुलींनी माझे अंगावर तीन दिवसांपूर्वी पाणी शिंपडले होते, असे म्हणून शिवीगाळ केली. याबाबत त्यांनी पतीला सांगितल्यावर फिर्यादी अकबर फरास हे जाब विचारण्यासाठी गेले. तेव्हा रफिक उर्फ इमाम शेख, अक्रम इमाम शेख यांनी तू आज बरा सापडला, तुला आज खल्लासच करतो. तू बीजेपीमध्ये राहून आमचे विरुद्ध काम केला. तुला मस्ती आली, असे म्हणत फोन करून जीब्राइल शेख, बिलाल शेख व अनोळखी दोन लोकांना बोलावून घेतले. रॉड, बांबू आणि लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली. फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून घेत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. दगड डोक्यात मारले. पत्नी हिना कौशल व शेजारील महिला सोडवण्यास आल्या असताना त्यांनाही लाथाबुक्याने मारहाण, शिवीगाळ दमदाटी केली. याबाबत मोहोळ पोलीस ठाण्यात रफिक उर्फ इमाम शेख, जिब्राईल बाबाजान शेख, अक्रम इमाम शेख, बिलाल बाबाजान शेख

# आषाढी यात्रेसाठी यंदा सुविधेत दीडपट वाढ

- पालखी सोहळा प्रमुखांनी सुचविलेली ८० टक्के कामे पूर्णत्वाकडे
- पालखी सोहळा प्रमुखांच्या सर्व सूचनांची वारीपूर्वी अंमलबजावणी
- पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वाहनांना मार्गावर डिझेल, पेट्रोलची मुबलकता

### जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.; पालखी मार्ग व तळांवर व्यवस्था



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ जून-**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै रोजी होणार असून, आषाढी यात्रेसाठी पूर्वीच पालखी मार्ग, तळ आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पालखी सोहळा प्रमुख, विश्वस्तांकडून काही मागण्या व सूचना केलेल्या होत्या. त्यांची अंमलबजावणी सुरू केली असून ८० टक्के कामे पूर्णत्वाकडे येत आहेत. भाविकांना तात्काळ सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पालखी मार्ग व तळांच्या ठिकाणी तसेच पंढरपूरमध्ये गतवर्षीपेक्षा दीडपट अधिक सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी सांगितले.

आषाढी यात्रेच्या पूर्वतयारीबाबत केबीपी कॉलेज, पंढरपूर येथे दहा मानाच्या पालख्यांचे विश्वस्त व सोहळा प्रमुख यांच्या सोबत बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. म्हणाले, आषाढी वारीच्या अनुषंगाने वारकरी भाविकांना सोयी-सुविधा देण्यासाठी प्रशासनाकडून विविध कामे करतात. विधानपरिषद निवडणुकीची आचारसंहिता असल्याने काही कामांच्या निविदाबाबत निवडणूक आयोगाकडून परवानगी मिळालेली आहे. त्यामुळे आवश्यक सर्व कामे पालखी सोहळे जिल्ह्यात दाखल होण्यापूर्वी करणार आहेत.

पालखी तळाच्या ठिकाणी मुरमीकरण करणार आहे. वाढीव पालखी तळाबाबत आवश्यक कार्यवाही करत आहे. पालखी मार्गावर व तळांवर सुलभ शौचालय, स्नानगृह, वॉटरप्रूफ मंडप, रुग्णवाहिका आदींची संख्या वाढविणार आहे. पालखी मार्गावरील पेट्रोल पंपांवर सोहळ्यासोबत येणाऱ्या वाहनांना पेट्रोल/डिझेल उपलब्ध होण्यासाठी संबंधितांना तात्काळ सूचना देणार आहे. गॅसचा पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घेण्यात येईल. भाविकांच्या सुरक्षेसाठी आपत्ती व्यवस्थापन आराखड्यानुसार नियोजन करणार असल्याचेही जिल्हाधिकारी म्हणाले.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन म्हणाले, पालखी मार्ग व तळांच्या ठिकाणी जर्मन हँगरच्या सुविधेत वाढ करणार आहे. पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या बैलजोडी तसेच घोडे यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करण्यात येईल. पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून देणार आहे. पालखी सोहळे मुक्कामाच्या ठिकाणावरून पुढे गेल्यानंतर तात्काळ स्वच्छता करणार आहे.

गोपाळकाला झाल्यानंतर सर्व मानाच्या पालख्या पूर्णिमेला श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दाखल होतात आणि सर्व संतांच्या पादुका विठ्ठल दर्शनासाठी नेण्यात येतात. यावेळी संत देव भेट सोहळ्याला होणारी गर्दी लक्षात घेऊन प्रथा-परंपरेनुसार योग्य नियोजन करण्यात येणार असल्याचे मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले. गतवर्षीच्या पालखी सोहळ्यासाठी पालखी मार्गावर, तळांवर तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी प्रशासनाकडून करण्यात आलेल्या सोयी-सुविधांबाबत पालखी सोहळा प्रमुखांनी समाधान व्यक्त केले.

#### पालख्यांचे विश्वस्त व सोहळा प्रमुखांच्या सूचना

पालखी सोहळ्यासोबत दिवसेंदिवस दिंड्यांची संख्या वाढत असल्याने काही ठिकाणी पालखी तळ कमी पडत आहेत; त्यामुळे ते तळ वाढवून द्यावेत. पालखी सोहळ्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा. टँकरची संख्या वाढवावी. पालखी सोहळे पालखी मार्गावरून जात असताना वाहतुकीचे नियोजन करणवे. पालखी तळांवर मुरमीकरण करावे.

## औराद महसूल मंडळात अवैध मुरूम उपशाचा धुमाकूळ?

### शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडतोय; मंडल अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ६ जून-**

औराद महसूल मंडळाच्या कार्यक्षेत्रातील बंकलगी, सांजवाड आणि राजूर शिवारात मोठ्या प्रमाणावर अवैध मुरूम उपसा सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असतानाही संबंधित यंत्रणा आणि मंडल अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याची चर्चा परिसरात रंगली असून, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

औराद मंडल अधिकारी कार्यक्षेत्रातील अनेक ठिकाणी सर्वसाढवळ्या मुरूम उपसा सुरू आहे. विशेषतः बंकलगी व राजूर शिवारातील रस्त्यालगतच्या शेतांमध्ये मोठमोठे खड्डे पडलेले दिसून येत आहेत. काही वाहनांद्वारे दररोज मोठ्या प्रमाणावर मुरूम वाहतूक होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, या प्रकाराकडे महसूल प्रशासनाकडून अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, कोणत्याही प्रकारची रॉयल्टी न भरता आणि शासनाचा महसूल बुडवून मुरूम उपसा सुरू असताना कारवाई होत नाही. उलट घरबांधणी किंवा शेतीच्या कामासाठी मुरूम टाकणाऱ्या सामान्य नागरिकांवर दंडात्मक कारवाई केली जाते, अशी भावना परिसरात व्यक्त होत आहे. त्यामुळे महसूल विभागाच्या कारभाराबाबत दुजाभावाची भावना निर्माण झाल्याचे नागरिक सांगत आहेत.

या संदर्भात मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयाकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. अवैध मुरूम उपसा सुरू ठेवण्यासाठी काही व्यक्ती प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या संपर्कात असल्याचीही चर्चा सुरू असून, यामुळे संशय अधिकच बळावला आहे. तसेच अवैध मुरूम उपशाविरोधात आवाज उठविणाऱ्या नागरिकांवर दबाव टाकला जात असल्याचे आरोपही समोर येत आहेत. तक्रारदारांशी अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचेही सांगण्यात येत आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून महसूल विभागातील संबंधित अधिकारी व अवैध उपशास मदत करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

#### उपोषणाचा इशारा

अवैध मुरूम उपसा रोखण्यासाठी तसेच महसूल विभागातील कथित अनियमिततेची चौकशी करण्यासाठी तातडीने कारवाई न झाल्यास मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयासमोर उपोषण आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे प्रशासन कोणत्या भूमिकेतून पाहते, याकडे आता परिसराचे लक्ष लागले आहे.

#### तहसीलदारांवर वॉच ठेवणाऱ्यांवर कारवाई कधी?

तहसील कार्यालयामधील अधिकाऱ्यांशी अर्थपूर्ण संबंध ठेऊन व मंद्रूप तहसीलदारांवर वॉच ठेवून दररोज शेकडो ब्रास अवैद्य मुरूम सुरू आहे. अधिकाऱ्यांवर वॉच ठेऊन व शासनाची रॉयल्टी बुडवून मुरूम उपशास सहकार्य करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई कधी होणार ? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

## साखर कारखान्यांतील कोट्यवधींच्या फसवणुकीवर डिजिटल उपाय

### वाहतूकदार, मुकादम आणि तोडणी कामगारांच्या व्यवहारात पारदर्शकता आणणारे स्मार्ट सॉफ्टवेअर चर्चेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून-**

ऊस उद्योगातील वाहतूकदार, मुकादम आणि ऊसतोडणी कामगारांकडून होणारी आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी बीडस्थित गँगमेन टेक्नॉलॉजीज प्रा.लि. या कंपनीने एक स्मार्ट डिजिटल सोल्युशन विकसित केल्याचा दावा केला आहे. या तंत्रज्ञानामुळे साखर कारखान्यांची दरवर्षी ५ ते ६ कोटी रुपयांपर्यंत बचत होऊ शकते, असा दावा कंपनीचे सीईओ महादेव मुरकुटे यांनी केला आहे.




गँगमेन टेक्नॉलॉजीजने सोलापुरात हॉटेल द फर्न येथे पत्रकार परिषद घेत साखर कारखान्यांची होणारी फसवणूक आणि नुकसानीची माहिती दिली. या पत्रकार परिषदेस अक्कलकोटच्या वनिता खेडगी यांची प्रमुख उपस्थिती होती. साखर उद्योगात ऊसतोडणी कामगार, मुकादम, वाहतूकदार आणि गटप्रमुख यांच्या स्तरावर होणाऱ्या गैरव्यवहारांमुळे कारखान्यांना मोठा आर्थिक फटका बसतो. अनेक कारखान्यांमध्ये प्रतिवर्षी ३ ते ५ कोटी रुपयांपर्यंत फसवणूक होत असल्याचा अंदाज कंपनीने व्यक्त केला आहे. याशिवाय लेबर चेकिंगसाठी स्वतंत्र पथके, स्लिप प्रिंटिंगचा खर्च आणि पारंपरिक व्यवस्थापनातील त्रुटींमुळे कारखान्यांचा खर्च वाढत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

गँगमेन टेक्नॉलॉजीजने साखर कारखानदारांना हे सॉफ्टवेअर वापरण्याचे आवाहन केले असून, चालू हंगामातील वाहतूकदार, मुकादम आणि कामगारांची नोंद त्यांच्या ॲपवर करण्याची विनंती केली आहे.

साखर उद्योगातील पारदर्शकता आणि खर्च नियंत्रणासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढत असताना गँगमेन टेक्नॉलॉजीजच्या या दाव्याकडे साखर कारखानदारांचे लक्ष लागले आहे.

#### प्रशासनिक खर्चात ३० टक्क्यांपर्यंत बचत

गँगमेन टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या म्हणण्यानुसार, विकसित करण्यात आलेल्या स्मार्ट सॉफ्टवेअर आणि मोबाईल ॲपच्या माध्यमातून प्रत्येक ऊसतोडणी मजूर, मुकादम आणि वाहतूकदारांची डिजिटल नोंद ठेवली जाईल.आधार पडताळणी आणि डिजिटल ट्रॅकिंगमुळे बनावट नोंदी, मजुरांची संख्या वाढवून दाखवणे आणि इतर प्रकारच्या फसवणुकींना आळा बसू शकतो. या प्रणालीमुळे प्रशासनिक खर्चात ३० टक्क्यांपर्यंत बचत होण्याबरोबरच कारखान्यांना अतिरिक्त मजूर भरतीची गरजही कमी होईल, असा दावा कंपनीने केला आहे.

## सहकारमहर्षि साखर कारखान्यात शिवराज्याभिषेक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ जून-**

सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यातर्फे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५३ वा शिवराज्याभिषेक दिन शनिवार दि. ६ जून रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ९:०० वाजता श्री शिवपार्वती देवालय, शंकरनगर येथील छत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण केला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या घोषणा देऊन जल्लोष करण्यात आला. फटाक्यांची आतषबाजीही करण्यात आली. कार्यक्रमासाठी संचालक लक्ष्मण शिंदे, नानासाहेब मुंडफणे, विराज निंबाळकर, डॉ. सुभाष कटके, रामचंद्र ठवरे तसेच शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, अशोक पताळे, कार्यकारी संचालक सुहास यादव व खातेप्रमुख, अधिकारी, पत्रकार, कार्यलक्षी संचालक जयवंत माने-देशमुख, कामगार व शिवप्रेमी नागरीक उपस्थित होते.

